





श्री महाराष्ट्र शारदा

[भाग दुसरा]



प्रल्हाद केशव अत्रे

REFBK-0004240

१९३०

किंमत १॥ रुपया

प्रकाशक

प्रल्हाद केशव अत्रे,

४८१ नारायण पेठ, पुणें नं. २.

मुद्रक

अनंत सखाराम गोखले,

'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें नं. २.

[या पुस्तकासंबंधींचे सर्व हक्क संपादकांनीं स्वतःकडे राखून ठेविले आहेत.]

संपादकीय

'महाराष्ट्र-शारदे'चा पहिला भाग माझे कविमित्र श्री० दिनकर गंगाधर केळकर (अज्ञातवासी) यांनीं संपादून प्रसिद्ध केला त्यास सहासात वर्षें होत आलीं. त्यानंतर दुसरा भाग प्रसिद्ध करण्याचें माझ्या मनांत येऊन त्याप्रमाणें गेल्या व जुलै महिन्यांत मीं महाराष्ट्रांतील कवि-कवयित्रींना जाहीर विनंति केली. ह्या विनंतीस मान देऊन अदमासें १५० कवि-कवयित्रींना आपापल्या कविता मजकडे पाठविल्या; त्यांपैकीं ८१ कवींच्या निवडक कवितांचा सदर भागांत मीं अंतर्भाव केलेला आहे. निवडलेल्या कवींच्या सर्वच कविता घेण्याचें मीं ठरविलें असतें तर प्रस्तुत संग्रहाचा आकार तिपटीनें अधिक वाढला असता. तथापि कवितांचें पुस्तक व 'कोश' यांच्या आकारांतील अंतराची मला जाणीव असल्यानें निवडीचें काम हात आंखडूनच करावें लागलें.

गेल्या दोन तपांत महाराष्ट्रांत जे नामांकित कवि होऊन गेले त्यांपैकीं बहुतेकांची कविता पहिल्या भागांत आली असल्यानें सदरील भागांत मला उदयोन्मुख तरुण कवि-कवयित्रींवरच अवलंबून राहावें लागलें. तथापि पहिल्या भागांतून नजरचुकीनें राहिलेल्या कांहीं प्रसिद्ध कवींच्या कविता मला या भागासाठीं मिळवितां आल्या ही समाधानाची गोष्ट आहे. पहिल्या भागाशीं तुलना करितांना सदर भाग कदाचित् रसिकांच्या तितका पसंतीस उतरणार नाहीं अशी मला भीति वाटत आहे. तथापि त्याला नाइलाज आहे. त्याच त्या सुप्रसिद्ध कवींच्या कविता फिरून फिरून देण्यापेक्षां प्रस्तुत कालच्या प्रमुख कवींचा प्रातिनिधिक स्वरूपाचा संग्रह रसिकांपुढें मांडण्याचा माझा हेतु होता व तो पुष्कळ अंशीं सफळ झालेला आहे असें मला वाटतें. महाराष्ट्र शारदेचें वैभव आगामी काळांत वाढविण्याचें ज्यांच्या कवितेंत सामर्थ्य येऊं शकेल अशा बऱ्याचशा प्रतिभावंत कवींचा या संग्रहांत समावेश झालेल आहे असा मला विश्वास वाटतो. मागील भागाच्या संपादकाचें सांपत्तिक सामर्थ्य

मजमध्यें नसल्यानें मला कवींकडून छपाईचा खर्च गोळा करावा लागला. नाहीं तर वास्तविक हा कर कवींवर लादण्याची माझी इच्छा नव्हती. छपाईखर्च देण्यांचें सामर्थ्य नसलेल्या कांहीं चांगल्या कवींची कविता या कारणामुळें मला घेतां आली नाहीं याबद्दल मला फार दिलगिरी वाटते.

सर्वच कवींकडून विनंतीप्रमाणें जन्म–तारखा व चरित्रें आलीं नाहींत. त्यामुळें कांहीं कवींसंबंधीं फारच त्रुटित माहिती द्यावी लागली. वयवारीनें कवींचा क्रम लाविलेला आहे. तो दोनतीन ठिकाणींच चुकलेला आहे. कांहीं कवितांमधून प्रसंगानुसार क्वचित् एखाद्या दुसऱ्या ओळीपुरता, कधीं शब्दापुरतां मीं फरक केलेल आहे. संपादकीय अधिकाराचा फायदा घेण्यापेक्षां कवितेचा बांधेसूदपणा सुधारण्याच्याच प्रामाणिक बुद्धीनें मी तसें केलेलें आहे. कवि-मित्रांनीं त्याबद्दल कृपा करून रागावूं नये. आरंभीं छपाईबद्दलचा मीं माझ्या कल्पनेप्रमाणें ठरविलेला अंदाज अनुभवांतीं अपुरा पडल्यानें तेवढ्यासाठीं पानामागें थोडासा आकार अधिक वाढविणें भाग पडलें. व्यक्तिशः कवींना मी त्याबद्दल कळवीत आहेंच.

प्रस्तुत संग्रह प्रसिद्ध होण्यास अपेक्षेपेक्षां बराच उशीर होत आहे. तथापि तो अपरिहार्य होता. निरनिराळ्या कवींकडून कविता येणें, त्यांची निवड होणें, चरित्रविषयक माहिती गोळा करणें, मुद्रणासाठीं प्रत तयार करणें, मुद्रितें तपासणें इतक्या अनेक गोष्टी घाईघाईनें होणें शक्य नसतें. या विलंबामुळें बाहेरगांवच्या कवींना बराचसा मानसिक त्रास झाला याची मला जाणीव आहे. या कामीं माझे कविमित्र रा• दिनकर विनायक देव यांनीं परिश्रमपूर्वक मला मदत केली नसती तर या प्रकाशनास पुष्कळच अधिक अवधि लागला असता. त्यांनीं आरंभापासून आत्मीयत्वानें केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. 'विजय प्रेस'चे मालक श्री० आप्पासाहेब गोखले यांनीं पुस्तक आकर्षक रीतीनें छापून दिल्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतों.

४८१ नारायण पेठ,
पुणें, २।१०।३०

प्रल्हाद केशव अत्रे

अनुक्रमणिका

	कवि	पृष्ठें
१	**केशव गणेश खारकर**	१–५
	(१) मरणाच्या दारांत, (२) चित्राची छबी.	
२	**बाळकृष्ण रामचंद्र बोकील, एम्. ए.**	६–१०
	(१) आर्त जीवाची विनवणी, (२) भक्तिवश देवा ! कळलें मनीं ! !, (३) कोकिळेस ! (४) माय तूं वात्सल्याची खनी !	
३	**कृष्णाजी बाबाजी कुळकर्णी, कल्लोळकर** ...	११–१५
	(१) शुष्क निर्झरास—, (२) अकालीं वर्षणाऱ्या मेघास—, (३) मदांध धनाढ्यास—.	
४	**वसन्त-विहार**	१६–१९
	(१) प्रतिभे, (२) वीर पृथुराज, (३) दीनसंभावना.	
५	**विनायक जनार्दन सहस्रबुद्धे**	२०–२४
	(१) बालकास—, (२) सुवर्णभूमि, (३) शारदेस—, (४) कधिं न करावा निज धिक्कार.	
६	**विनायक हरि देशपांडे**	२५–२६
	(१) बालप्रश्न !, (२) झांकलेली मूठ !	
७	**सौ० राधाबाई साठये**	२७–३०
	(१) सदाफुली, (२) कु० मिलर हिंदूकरण.	
८	**केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर**	३१
	(१) भरतभूमि स्तोत्र.	
९	**आनंदीआनंद**	३२–३४
	(१) अंगाई गीत, (२) श्रीगणेशा.	
१०	**श्री० गिरिजाबाई विंचूरकर**	३५–३७
	(१) दिव्यता, (२) त्रिदळ, (३) दीन-वाणी, (४) ऐक्य.	

	कवि	पृष्ठें
११	**रामदीक्षित**	३८–४१
	(१) तरुण-शिवाजी.	
१२	**विठ्ठल जगन्नाथ कामत**	४२–४३
	(१) प्रेम, (२) वसंत.	
१३	**विनायक गोविंद साठये**	४४–४६
	(१) चिमणा वासुदेव, (२) चौघडा.	
१४	**सखाराम गोविंद विरकुड**, बी. ए. ...	४७–५१
	(१) महाराष्ट्र-साहित्यास—, (२) साहित्याचें कोरें पान, (३) अखिल भारतीय शिवस्मारक.	
१५	**काव्यविहारी**	५२–५३
	(१) दसरा.	
१६	**अरविंद**	५४–५६
	(१) कृष्णाघोडी.	
१७	**मनोहर**	५७–५९
	(१) वीर-वंदन, (२) विरहगीत, (३) भालतिलक.	
१८	**विश्वनाथ नारायण कोल्हारकर**	६०
	(१) रणभेरी.	
१९	**वामन गोपाळ चिंचणीकर**	६१–६२
	(१) मोगरीची माळ.	
२०	**गजानन विश्वनाथ केतकर**, बी. ए., एल्एल्. बी.	६३–६५
	(१) मातृभूमिवंदन.	
२१	**कुमार**	६६–७०
	(१) उदास उत्कंठा, (२) अरण्यरोदन, (३) भगवा झेंडा एकच हा !	
२२	**काव्यशेखर**	७१–७३
	(१) कुंकू लाव, (२) तिच्या मुखावर, (३) हृदयांबुज.	
२३	**विपिनविहारी**	७४–७६
	(१) प्रीति आणि कर्तव्य, (२) परिवर्तन.	

	कवि	पृष्ठें
२४	**आनंद** ... ... (१) पूर्ततेची हुरहूर, (२) चकवा, (३) वनकरी, (४) प्रत्येकाचा स्वानुभव.	७७–८२
२५	**अज्ञातवासी** ... ... (१) मैना, (२) कमला, (३) प्रतापराव, (४) मी तर गोदातटीं—.	८३–८५
२६	**कृष्णाजी रामचंद्र परांजपे** ... ... (१) एका मुग्ध बालिकेस पाहून—.	८६–८७
२७	**नारायण रामचंद्र मोरे** ... ... (१) प्रभात आणि कवि, (२) स्फूर्ति, (३) सांत्वन.	८८–९०
२८	**वनराज** ... ... (१) विश्वाचा लेश न बंध, (२) कुठें लपलासी.	९१–९३
२९	**श्रीकृष्ण वामन गाडगीळ** ... . (१) मर्मकथन, (२) बापूंची खानावळ.	९४–९६
३०	**वासुदेव नारायण फडणीस** ... ... (१) महाराष्ट्र-वाङ्मयमहती, (२) दुष्यंतास विज्ञप्ति.	९७–९८
३१	**विहारी** ... . (१) भावगीत, (२) स्मृतिशेष, (३) भावदृश्य.	९९–१०१
३२	**कुमुद** ... ... (१) काव्यनिर्मिति, (२) विखुरली सुमन-माला, (३) ?.	१०२–१०३
३३	**गजानन गोविंद तानवडे** ... ... (१) अजिंक्यतारा पाहून—, (२) देहाची ढाल.	१०४–१०६
३४	**रघुनाथ दत्तात्रेय सरंजामे,** बी. ए., एल्एल्. बी. (१) आईवेगळ्या मुलास पाहून—, (२) मायभूमीची हांक, (३) झिम्मा.	१०७–११२

	कवि	पृष्ठें
३५	**रामकृष्ण वासुदेव कामत**	११३–११४
	(१) त्वरा करी राधिके, कृष्णजी कुंजवनीं आला !, (२) अपुरी कविता.	
३६	**वासुदेवाग्रज**	११५–११७
	(१) श्रीवाग्देवतास्तवन.	
३७	**बळवंत हणमंत पळशीकर,** बी. ए., एल्एल्. बी.	११८–१२२
	(१) वात्सल्य, (२) एक प्रश्न, (३) शारदा-सूक्त, (४) तारकेस—.	
३८	**किशोर**	१२३–१२७
	(१) लावण्यकलिके, (२) कापसाचें शेत, (३) तारापतन.	
३९	**कुसुमाकर**	१२८–१२९
	(१) महाराष्ट्र शारदेस—, (२) फूलपांखरें ! (३) काव्यमय सृष्टि.	
४०	**पं. मा. कामतकर,** बी. ए.	१३०–१३१
	(१) जा सगळें विसरून, (२) निवेदन.	
४१	**विनायक सदाशिव सुखटणकर**	१३२–१३४
	(१) पुष्पविकसन करी प्रभो ! (२) बाडोली-विजयाचा सुवर्णदिन.	
४२	**शांताबाई हेबळीकर**	१३५–१३६
	(१) तुझी कृपा म्हणजेच सुख, (२) वेणु नाद.	
४३	**दिनकर विनायक देव**	१३७–१३९
	(१) पौर्णिमेचा चंद्र, (२) रांगोळी विकणारीस—.	
४४	**नागेश पांडुरंग फडके**	१४०–१४१
	(१) तेव्हां आणि आतां, (२) किती दीस...!	
४५	**देवीदास विनायक अडावदकर**	१४२–१४३
	(१) सौदामिनी, (२) चंद्रकलेस—.	

	कवि	पृष्ठें
४६	**के. नारायणं काळे**, बी. ए.	१४४–१४७
	(१) विरोधाभास—?, (२) एका आसन्नमरण बाल-विधवेची मृत्यूची मार्गप्रतीक्षा, (३) सांत्वन.	
४७	**अनंत काणेकर**, बी. ए., एल्एल्. बी.	१४८–१५२
	(१) रानगीत, (२) चांदरातीं खाडीच्या किनाऱ्यावर—, (३) सांवल्यांचें गाणें, (४) वेगमेच्या विरहगीताला शिवाजीचें उत्तर.	
४८	**मुकुंद मोरेश्वर लोंढे**	१५३–१५५
	(१) कुंजविहारी, (२) असें कां तींच ही भूमी ?, (३) चांदोबा.	
४९	**भालचंद्र वासुदेव केळुसकर**	१५६
	(१) डांकवाल्यास—	
५०	**विष्णु भिकाजी कोलते**, बी. ए.	१५७–१५९
	(१) आशेस—, (२) कौतुक कोण करी ?, (३) संगमोत्सुक.	
५१	**ना. मा. संत**	१६०–१६१
	(१) प्रीतीचीं कवनें, (२) बोलाविते मजला कुणी !	
५२	**कमलाकर**	१६२–१६३
	(१) तो सज्जनगड ढांसळला	
५३	**दामोदर अच्युत कारे**	१६४–१६५
	(१) दर्शन, (२) गोमन्त देवी.	
५४	**गजानन लक्ष्मण ठोकळ**	१६६–१७१
	(१) एकटी, (२) मोटेवरलं गाणं, (३) भिकारीण, (४) बंदिवान.	
५५	**सदाशिव रघुनाथ पंतसचीव**, बी. ए. ...	१७२–१७४
	(१) गवाक्षांतील सुंदरीस !, (२) हृदयार्पण, (३) वर्तुलवर्तन.	
५६	**सौ० सरोजिनीबाई पंतसचीव**	१७५–१७६
	(१) धांवा, (२) आळवणी.	

	कवि	पृष्ठें
५७	**वा. भा. पाठक**, बी. ए.	१७७–१७९
	(१) हे दीप लागले चोहिंकडे, (२) तूं आणि लोकभ्रम, (३) स्त्री आणि पुरुष.	
५८	**चंद्रकेतु**	१८०–१८२
	(१) शब्द !, (२) गोफणगुंडा.	
५९	**सिद्धेश्वर वासुदेव कुलकर्णी**	१८३–१८७
	(१) विनोद लहरी, (२) स्मृति.	
६०	**गोदातनय**	१८६–१८८
	(१) '—स'साठीं (२) फुलती कलिका.	
६१	**धनाजी गोपाळ गायकवाड**	१८८–१९०
	(१) चंडोल, (२) लतिका.	
६२	**मधुप**	१९१–१९३
	(१) कुणाचें काव्य, (२) तापीवर्णना.	
६३	**दामोदर महादेव गोवित्रीकर**	१९४–१९५
	(१) अमावास्या.	
६४	**भवानीशंकर श्रीधर पंडित**, बी. ए.... ...	१९६–१९९
	(१) हंगामांत, (२) तारूं, (३) प्रबोधन.	
६५	**गणेश हरि पाटील**	२००–२०२
	(१) कल्पिलेला कल्पांत, (२) एकच, (३) मंदिल.	
६६	**दत्तात्रेय कृष्ण हेबाळकर**, बी. एस्सी. ...	२०३–२०४
	(१) त्या गोष्टि काव्यांतल्या ! !, (२) कोडें, (३) एक शंका.	
६७	**दत्तात्रेय गणेश जयवंत**	२०५–२०६
	(१) आर्यभूमीस—, (२) हाय ! हाय आई गेली.	
६८	**मोहन**	२०७–२०९
	(१) बाळाची शाळा, (२) गानमुग्धेस !	
६९	**शालीनदात्त शिंदोरे**, बी. ए.	२१०–२१३
	(१) प्रेम कीं कर्तव्य ?	

	कवि	पृष्ठें
७०	**मंजुमाधव**	२१२–२१५
	(१) कोकिळेस, (२) जादुगिरी, (३) मन असें कासया गाहिंवरतें.	
७१	**कुसुमाग्रज**	२१६–२१७
	(१) विरही श्यामला, (२) रानवासिनी.	
७२	**चक्रवाक**	२१८–२२२
	(१) रम्य काय ! (२) चंडोलाप्रत—	
७३	**गांगेय**	२२३–२२५
	(१) वाटाड्यास, (२) खिन्नवापी, (३) दीप.	
७४	**व्यंकटेश नी. पंडित**	२२६–२२७
	(१) केवळ स्वप्न, (२) श्रावणांतील झड, (३) वाटाड्यास.	
७५	**कल्लूरकर**	२२८–२३०
	(१) फुलें हीं देशिल कां फेंकून ? (२) अंगाई.	
७६	**दयानन्द जिवाजीराव पटवर्धन**	२३१–२३२
	(१) चित्रपटावलेखन, (२) ध्येयदृष्टि.	
७७	**माधव व्यंकटेश मंगसुळीकर**	२३३–२३४
	(१) दांपत्यविनोद, (२) हंसरें फूल !	
७८	**गंगाधर काशीनाथ आगरकर**	२३५–२३३
	(१) कला आणि अनुभूति, (२) 'सर्व हें उगाच !' (३) प्रीतिकराचें गाणें.	
७९	**रामचंद्र के. मानवी**	२३७–२३८
	(१) काव्योद्गम, (२) तोडुं कसें मी !	
८०	**ज्ञानेश्वर तुकाराम देशपांडे**	२३९–२४१
	(१) रम्यता आणि प्रेम, (२) ओघ आणि मित्रप्रेम, (३) एक भयानक दृश्य	
८१	**राजस**	२४२–२४५
	(१) स्वामिभक्त हिरोजी, (२) कांटा, (३) बाळा वसंता—.	
८२	**आनंदी**	२४६
	(१) अंगाई.	

श्रीयुत दिनकर गंगाधर केळकर

यांच्या

समग्र कवितांचा संग्रह

आणि

चीनचे दगड

हें त्यांच्या विनोदी लेखांचें पुस्तक लौकरच

प्रसिद्ध होईल.

महाराष्ट्र-शारदा

भाग तिसरा

श्रीयुत **गोपाळ गोविंद अधिकारी**

यांच्या संपादकत्वाखालीं प्रकाशित होईल.

यांत फक्त कवयित्रींच्याच

कविता येतील.

महाराष्ट्र-शारदा

भाग दुसरा

४२४०

१. केशव गणेश खारकर

[जन्म इ० सन १८७२. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालें असून, पुष्कळ वर्षे विजापूर, पुणें इ० स्थळीं सरकारी नोकर होते. घुळें येथें हेडअकौंटंट असतांना पेन्शन घेउन हल्लीं तेथेंच रहात असतात. यांची 'स्वागत' ही पहिली कविता इ० सन १८९४ मध्यें 'आर्यशुक' मासिकांत प्रसिद्ध झालेली असून त्यांच्या इतर कविता करमणूक, मनोरंजन, वाग्विलास, महाराष्ट्र साहित्य, कायस्थबंधु इ० नियतकालिकांत 'विद्याविहारी', 'वामनसहोदर', 'केशव' या टोपण नांवांनीं प्रसिद्ध झालेली आहे. पुष्कळशी कविता अमुद्रित आहे.]

१. मरणाच्या दारांत

[पहांटेच्या समयीं नदीवर जीव देण्याकरितां गेलेल्या एका गतभर्तृकेचे उद्गार.]

[चाल—नृपममता रामावरती०]

त्रासुनी जगाला आलें । वानिं घोर; जिवावरि उठलें ॥
या क्षणीं ॥
ती निष्ठुर भारी जनता । परि निसर्ग दावी ममता ॥
या क्षणीं ॥
आकाश समयिं या द्रवुनी । दंवबिंदू गाळी नयनीं ॥
या क्षणीं ॥

पाहुनी । एकली बनीं । उभे राहुनी ।
गिरी वेथिल ते । किति उदासता वरिती ते ॥
या क्षणीं ॥ १

वृत्तिनें तटस्थ तयांच्या । हृदयाचें पाणी झालें ॥
या क्षणीं ॥

नदिरूप धरुनियां मग तें । शोकें जल वेगें झरलें ॥
या क्षणीं ॥

दुःखद स्थिती मम बघुनी । ना द्रवे परी जन कोणी ॥
या क्षणीं ॥

वेदांत । शुष्क वदतात । दया हृदयांत ।
लेश ना वसते । कृति एक अंतरीं भलतें ॥
राहतें ॥ २

पशुपक्षि विविध जातीचे । निर्वैर राहती साचे ॥
या स्थलीं ॥

प्रेमानें कुसुमित वेली । राहती तरूंच्या जवळीं ॥
या स्थलीं ॥

त्या उच्चनीच भेदातें । अणुमात्र वसति ना मिळते ॥
या स्थलीं ॥

पाहुनी । स्नेह काननीं । येइ मन्मनीं ।
विरम पावावें । परि दुर्जन विन्मुख व्हावें ॥
या स्थलीं ॥ ३

स्वकरानें शशि मज बाही । स्वर्गीं ये लौकरि बाई ॥
चल झणीं ॥

तारा गृहिं गमना निघती । ये ये मज आग्रह करिती ॥
चल झणीं ॥

खळबळुनि अंतरीं सरिता । सांगे ये उदरीं आतां ॥
चल झणीं ॥

वादांत । सुज्ञ रमतात । न्याय ना देत ।

दीन विधवांना । मृत्यूविण मार्ग दिसेना ॥
त्यां मुळीं ॥ ४
वाढतें प्रेम प्रेमानें । जगिं देणें तैसें घेणें ॥
न्याय हा ॥
हें तत्त्व विसरतां साची । मग कुठुनि आस सौख्याची ॥
या जगीं ॥
या स्थलीं द्वैत ना भासे । अद्वैतिं सर्व रमलेंसें ॥
वाटतें ॥
कां तरी । जगाभीतरीं । जिवा हुरहुरी ।
लावुनी घ्यावी । पंचत्वीं तनु लोटावी ॥
या क्षणीं ॥ ५

---

२. चित्राची छवी

[चाल—उद्यां बघ जातें०]

मनोहर भारी । चित्राची छबि मम न्यारी ॥
सुबक कुंचलें हातीं घेउनि ।
नाना रंग मनोहर मिसळुनि ।
बसलें स्थिर मानस लावोनी ।
काढायाला । माझिया बालचित्राला ॥ १
बालपणींचें चित्र चिमुकलें ।
अवयव नाजुक तेंहि चिमुकले ।
मस्तकिं कुरळे केश विखुरले ।
हंसे गालांत । खेळतें ब्रह्म जगतांत ॥ २
क्षुल्लक वस्तू सुखवि मनाला ।
माणिक-मोतीं मोल न त्याला ।
देवच सगळा खेळ चिमुकला ।
मनोहर भारी । चित्राची छबि मम न्यारी ॥ ३

मायबाप ना याविण परतें ।
जगांत दुसरें कांहिं न दिसतें ।
मोह लोभ ना ठावें परि तें ।
मुग्ध चित्राला । पुढतीं मी भरि रंगाला ॥ ४

मुग्धचि कलिका मुग्ध बालिका ।
स्थिर तेजाची रम्य तारका ।
गुंग करुनि जी टाकी रसिका ।
चित्र खरें तें । जगतांत सरी ना ज्यातें ॥ ५

निर्मल तेजस्वी रंगाची ।
छटा वाढत्या सौंदर्याची ।
कमान चढत्या चंद्रकलेची ।
सुंदर भारी । चित्राची छबि मम न्यारी ॥ ६

प्रौढ चित्र मग रेखित बसलें ।
मनोराज्य तें खुदकन् हंसलें ।
जिकडे तिकडे चंचल दिसलें ।
रंग मिसळोनी । कितिक मी सुबकता आणी ॥ ७

अवयव गोंडस मुख वाटोळें ।
अर्धोन्मीलित ओष्ठ उघडले ।
जशीं उघडतीं मिटलीं कमलें ।
तेज नयनांचें । गगनांत वीज जणुं नाचे ॥ ८

कुंदकळ्यांसम दंत चमकती ।
गाल गुलाबी लाल शोभती ।
केशभार शिरिं, वरि पुष्पें तीं ।
खुलविती भारी । चित्राची छबि मम न्यारी ॥ ९

हस्त कटिवरी ठेवुनि बसलें ।
प्रतिमा बघतां भान विसरलें ।
अवचित तिकडुनि येणें झालें ।
हळुच मागोनी । घेतलें चित्र उचलोनी ॥ १०

लगबगिनें मी चटकन उठलें ।
दूर लाजुनी उभी राहिलें ।
काय बाइ हें आपण केलें ।
वदे " द्या मजला । माझिया चारुचित्राला ॥" ११

याच्यासाठीं तरि आजवरी ।
फिरुनि भागला हा मधु भ्रमरी ।
निधान ऐसें मिळतां स्वकरीं ।
फिरुनि ना देती । ही वदति जगाची रीती ॥ १२

या योगानें सांगे निशिदिनिं ।
प्रीति प्रियकरा संगें फिरुनी ।
माझ्या चित्रा " द्या द्या " म्हणुनी ।
मनोहर भारी । चित्राची छबि मम न्यारी ॥ १३

२. बाळकृष्ण रामचंद्र बोकील, एम्. ए.

[जन्म संवत् १९३३. हे ऋग्वेदी, आश्वलायन देशस्थ ब्राह्मण. यांना बाळपणापासूनच कविता करण्याचा नाद असे. आपल्या वयाच्या विसाव्या वर्षी ह्यांनीं अलाहाबाद विश्वविद्यालयाची बी. ए.ची परीक्षा दिली. या परीक्षेंत 'फारसी' भाषा हा यांचा ऐच्छिक विषय होता. पुढें एम्. ए. झाल्यावर हे आपल्या गुणानें व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वामुळें वाढत जाऊन लवकरच ग्वाल्हेर संस्थानांतील व्हिक्टोरिया कॉलेजांत इंग्लिश भाषेचे सीनियर प्रोफेसर नेमण्यांत आलें. इंग्रजी काव्य आणि शेक्स्पियरचीं नाटकें हे फार मार्मिक रीतीनें शिकवितात अशी ह्यांची ख्याति आहे. यांच्या कांहीं कविता 'करमणूक' व 'मनोरंजना'दि मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. यांनीं कांहीं मराठी व उर्दू नाटकें ('कमलिनी', 'रुक्मांगद-मोहिनी', 'जफेरनेकी' वगैरे) रचिलीं आहेत. नाट्यविनोद नाटक मंडळी व नूतन संगीत नाटक मंडळी यांचीं नाटकें करीत असतात.]

१. आर्त जीवाची विनवणी !

मी असो कशी परि तुज विकलें ॥
हें काय मोहना तुज न कळें ॥ ध्रु० ॥
तुमची राधा ही, मनमोहन ।
धुंडित फिरते तुजला वणवण ।
करुणा येई परि तुज लेश न ।
कां मजविषयीं मन विटलें ? ॥ १
विस्मरलें तव चरणा म्हणुनी ।
रुसलासी सखया गुणखानी ।
चुकलें जरि, परि तुमची राणी ॥
नेणिसि काय न हें सगळें ? ॥ २
क्षण येथिल मज लळा लागला ।
त्या योगें तव रूपा अमला ।
विस्मरलें, फसलें, मोहाला ।

वेडी मी काशि बळि पडलें ! ॥ ३
तूंच सखा मत्प्राण विसावा ।
तुजविण कोणि न नाथा ! जीवा ।
आळवुं किति तुज सांग, माधवा !
क्षमा एकदां करि ! चुकलें ! । ४
त्रिविध ताप हा वणवा मजला ।
दाहतसे ! ये धांवुनि, अमला !
वर्षुनिया झणिं करुणासलिला ।
शांतवि ! रे, चुकलें ! चुकलें ! ! ॥ ५

---

२. भक्तिवश देवा ! कळलें मनीं ! !

विशालनयना शशांकवदना राधा एके दिनीं
चालली हरिभेटीलागुनी ।
हृदय-सागरीं विमल भक्तिजल उचंबळे त्या क्षणीं
दाटलें प्रेमनीर लोचनीं ।
नयनमनोहर श्यामल सुंदर मूर्ति मनीं ध्याउनी,
पातली कुंजवनीं, गुणखनी ।
न च दिसता तिज वनमाळी । त्या स्थळीं ।
बावरली, दुःखित झाली, । तापली: ।
शोधिता श्रांत गुणशाली । जाहली ।
मुकुंद आनंदित मनिं होई, सघन लतेमागुनी ।
तियेचा विमल भाव पाहुनी ॥ १
सघन कुंजवनिं कुंदरदनि श्रीरंगा बहु शोधुनी
शिणली दुःखित झाली मनीं ।
अति श्रांत होउनी बैसली लतेतळीं जाउनी,
लोटलें प्रेमनीर लोचनीं ।
सुनम्र वचनें गद्गद होउनि श्रीरंगालागुनी,
आळवी साश्रुनयन, स्फुंदुनी !

" करुणेशा ! देवा ! नाथा ! । श्रीहरी !
बहु शिणली ही बघ आतां । किंकरी !
किती अंत बघसि गुणवंता ? । झडकरीं
पददर्शन देउनी पुनित करि ! करुणा नच ये मनीं ! !
हेंच का ब्रीद तुझें, या जनीं ? ॥ २

" भक्तिनिर्झरीं बहु क्रीडलें देहभान विसरुनी,
धवल यशगुणगण तव गाउनी ।
भक्तिसुधारस आधीं देवा ! प्रेमानें पाजुनी;
देसि कां दूर अतां लोटुनी ? ।
" देव भक्तिवश असे " ! वदति कवि कसें कळें नच मनीं !
दिधलें ब्रीदचि कीं टाकुनी ? ।
मजवरिची प्रीतिच सारी । श्रीवरा ।
लोपली काय कंसारी ? । सुंदरा ।
जगदीशा हृदय-विहारी । सुखकरा ।
भक्ताविषयीं कठोरता ही कैंवि ठेविशी मनीं ?
मिळविशी काय असें वागुनी ? ॥ ३

ऐशापरि राधिका सुंदरा साश्रु वदे स्फुंदुनी
परिसतां द्रवला माधव मनीं ।
लीले मागुनि येउनि स्वकरें नयनांतें झांकुनी
हांसला ! भावें वश होउनी !
" कोण ? देव मम ? " पुसे सुंदरी, वदे हरी, " भामिनी
दास तव भक्तीचा, गुणखनि ! " ।
विधुवदना पुलकित काया । सुंदरा ।
हळु फिरवि वदन निरखाया । श्रीधरा ।
तत्पदीं मिठी माराया । निज करां ।
सुनम्रभावें पसरुनि वदली प्रमुदित मृदु हांसुनी
" भक्तिवश असशी, कळलें मनीं " ॥ ४

३. कोकिळेस !

ऐकुनिया गायना ॥ बहु मोद होईगे या मना ॥ ध्रु० ॥

आम्रासवपानीं रत राहसि,
आम्रतरुशिखीं विश्रम घेसी,
'कुऊ' 'कुऊ' गायन करिशी,
हर्ष मनीं माइना ॥ १

आनंदाची मूर्तिच केवळ !
कीं प्रतिमा प्रेमाची निर्मल !
दुःख शोक भय विरहानल छल,
तुज ठावे लेश ना ॥ २

शिकवि गडे मज मंजुलगायन ।
टाकितसे जें मन वेडावुन !
गाइन आनंदें तें अनुदिन !
सुख न मना त्याविना ॥ ३

असते जरि मज पंख उडाया,
येतों त्यागुनिया जगता या,
आनंदें तुजसह विहराया
सेवाया उपवना ॥ ४

मन्मन उत्साहें तुजमागुनि
धांवें ! परि जडदेहबंधनीं
सांपडलें ! तळमळतें अनुदिनिं
भोगितसे यातना ॥ ५

दुःखपूर्ण गे जग सारें हें
तापवि चित्ता, सुख लव नोहे !
खलजन-छल पलही नच साहे ।
बाई ! अतां या मना ॥ ६

सखी असशि तूं वनदेवीची !
मुक्त सदा ! भाग्यवान साची !
शक्ति नसे मज तोडायाची
संस्कृतिच्या बंधना ॥ ७

---

४. " माय तूं वात्सल्याची खनी !! "

दैवत केवळ जनीं ! माउली ! वात्सल्याची खनी ॥ ध्रु० ॥

दुड दुड दुड दुड धांवत येतां,
नूपुररव मृदु कानीं पडतां,
मधुर हास्य शिशुवदनिं खेळतां,
हरखित होई मनीं ! १

धांवत असतां पडतां पाहुनि,
बालकास घे कडिये उचलुनि,
चुंबुनि, प्रेमरसें त्या न्हाणुनि,
घेई कवटाळुनी ! २

विश्वाचीं तूं प्रेमल जननी,
अशीच असशिल पाहत वरुनी
अमुच्या लीला, मुदित होउनी !
दक्ष सदा रक्षणीं ! ३

हिंद-पुत्र आम्ही, भगवंता,
तुझे ! माय तूं ! मग कां. चिंता ?
राखशील निज ब्रीद अनंता !
संकट झणिं वारुनी ! ४

३. कृष्णाजी बाबाजी कुळकर्णी, कल्लोळकर

[यांचा जन्म ता. ५।१०।१८८० रोजीं कल्लोळ येथें झाला. यांचा प्राथमिक शिक्षणक्रम कल्लोळ, मिरज व पुणें या तीन ठिकाणीं पार पडला. यांचें 'शिशु-बोधामृत' काव्य तयार आहे. 'काव्यामृत-कल्लोळ' या नांवाचें यांच्या व यांच्या कुटुंबांतील· इतर कवींच्या कवितांच्या वेंच्यांचें पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल. यांच्या कविता 'मनोरंजन' 'चित्रमयजगत्' 'नवयुग', 'काव्यरत्नावलि', 'ज्ञानांजन' 'प्रभात', 'प्रमोद', गोरक्षण', 'करमणूक', लोकमित्र' इ० प्रमुख मासिकें व वृत्त-पत्रें यांमधून प्रसिद्ध झाल्या आहेत.]

१. शुष्क निर्झरास

[अंजनीगीत]

माझें सारें वैभव गेलें
सर्वांहि जीवन शुष्क जहालें
मजवर मोठें संकट आलें
माझ्या दुर्दैवें ॥ १

वैभवांत जे माझ्या भोंवतिं
श्रान्त पान्थ वा पशु खग जमती
माझें जल सेवुनि आतृप्ति
मज हर्षें स्तविती ॥ २

पण मम वैभव लयास जातां
कोणी ढुंकुनि बघति न आतां
कुणिही नाहीं मजला त्राता
देवाविण जगतीं ! ॥ ३

भाग्यि सभोंवतिं जमती बहुजन
तन्नाशीं ते करिति पलायन !
विपत्तींतही जाती सोडुन ।
कोण जगीं ऐसे ? ॥ ४

नको करूं तूं खेद असा रे !
जगतीं चंचल वैभव सारें
असें शीघ्रगति जणुं तें वाटें
संतत जें भ्रमतें ! ॥ ५

खर्च होय जें परोपकारीं
वैभव लागे तव सत्कार्यीं
तेणें झाले किती सुखी हे
बहुत आर्त जीव ! ॥ ६

म्हणुनि न कष्टी होई लवही ।
जीवित-सार्थक झालें पाहीं ॥
परोपकारासम जगिं नाहीं ।
दुसरें सत्कृत्य ! ॥ ७

इतर जनांनीं न जरी ध्यानीं
घेउनि तव गुरु सत्कृति त्यांनीं
भलें न म्हटलें तरिही मानी
विषाद न मुळींही ! ॥ ८

नव मेघांची सुंदर माला
जेव्हां व्यापिल सर्व नभाला
अमृतवृष्टिनें अखिल जगाला
अतिशय सुखवील ॥ ९

अमृतलाभ तुज तेव्हां होइल
तुझी खिन्नता सारी जाइल
तूतें अतिशय बळ येईल
फिरुनी सत्कार्या ॥ १०

वैभव कालीं मत्त न व्हावें
हृदय संकटें खचूं न द्यावें
उन्नत्यवनतिमधें असावें
पूर्ण शांतवृत्ति ॥ ११

जलयंत्राच्या चक्रीं नेमें
घट भरती, बनतीहि रिकामे
उच्चा नीचा स्थिति या नियमें
होई प्राण्यांची ॥ १२

म्हणुनि न भाग्यीं गर्व वहावा
विपत्तींतहि न शोक करावा
सत्कार्याचा मार्ग धरावा ।
परमेशा स्मरुनी ॥ १३

---

२. अकालीं वर्षणाऱ्या मेघास

कां वृथा अवेळीं घना ! वृष्टि तूं करिशी ?
तुज वेड लागलें काय सांग रे ! मजशी ?
पाहिजे असे भरपूर वृष्टि ज्या वेळीं
तूं हटातटानें फुगुनि अलपहि न केली !
तव दयायाचना किति केली जीवांनीं !
पण त्यांची विनति न आणलीस तूं ध्यानीं ! !
या अविचारें तव पिकें बुडालीं पार !
कित्येक गुरें तीं हाय ! जाहलीं ठार !
तुज दया यावया हवीं मूक जीवांची
पण न कळे मज, ती कशी न ये तुज साची !
कितितरी जनांनीं हाल बहुत सोसूनी
केलेंच गमन शेवटीं दूर येथूनी !
जो निष्ठुरतेचा डाग लागला तुजला
तो जाइल कैसा या वृष्टीनें धुतला ?
जर योग्य वेळिं तूं केली असती वृष्टी
तर जीव मुळींहि न झाले असते कष्टी !

भरपूर पिकें येऊन जाहली असती
धन-धान्य-समृद्धी; सौख्य नांदतें जगतीं.
पण अविवेकानें तूं जो केला प्रलय
या वृथा वृष्टिनें कसा नष्ट तो होय?
जल अपार मेघा! वर्षिलेंस जरि आतां
'बुंदसे गये सो नही हौदसे आतां'!!

---

३. मदांध धनाढ्यास—

द्रव्यमदाच्या योगें झाले धुंद नेत्र तव पुरे
धनाढ्या! विचार तव मनिं नुरे!
त्यासाठीं तुज गमे 'जगीं या मीच थोर काय तो'
तुला नच अन्य मान्य वाटतो!
आत्मप्रौढी-गान-श्रवणीं दंग सदा राहसी!
टाकुनी दीन जनां बोलसी!
पण तुझें कृत्य हें अतिशय अनुचित असे
चांचल्य भयंकर लक्ष्मीमध्यें वसें
भरवसा क्षणाचा खुद्धां न तिचा असे
क्षणांत तुज ती सोडुनि जाइल, पूर्ण दीन होशिल
कसा मग दीन जनां हसशिल?
श्रीपरमेशें तुझ्या एकट्याकरितां अगणित धन
दिलें हें असें न तुजलागुन
तुझा तसा इतरांचा व्हावा सदुपयोग त्यामुळें
प्रभूनें म्हणुनि तुला धन दिलें
त्या जगदीशाची इच्छा अवमानुनी
उधळिशी बहुत धन तूं भलत्या कारणीं
तूं देशी लवहि न धन दीनांलागुनी

सर्व शक्तिमज्जगत्प्रभूची इच्छा अवमानितां
कसें तव होइल हित तत्त्वतां ?
सावध होई म्हणुनी मित्रा ! धरी मार्ग चांगला
मानिं तूं दीनांला आपुला !
तत्पर राहीं साह्य कराया सतत दीन मानवां
जाइल मोद मिळत तुज नवा;
जा खर्च करित धन दीनांच्या कारणीं
घे त्यांचे आशीर्वाद बहुत मिळवुनी
बहु भूतदया राहुं दे सदा तव मनीं
थोर अशा पुण्याईचा हा मार्ग धरुनि चांगला
होइ तूं या जगतीं बहु भला.

४. वसन्त-विहार

[श्री० शंकर दत्तात्रेय जोशी, जन्म सन १८८८. हे सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय कवि आहेत. यांची कविता बहुतेक सर्व प्रसिद्ध मासिकांतून येत असते. यांची स्फुट कविता विपुल असून सरस असते. मानिनी, स्वराज्यबोध, जनाचे श्लोक, लो० टिळकविरह, जालियनवाला, केवळ स्वराज्यासाठीं, महिषासुरमथन, आर्य-भूमीचा अमीर, नरवीर नेताजी पालकर, शृंगारशतपदी व गीतगोविंद, संजय-प्रबोधन आणि वाघाची शिकार अशीं बारा खंडकाव्यें यांनीं स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलेलीं आहेत. यांचें 'गीतांजली'चें भाषांतर अप्रसिद्ध आहे. कै० फडके-बवेंकृत 'स्वामी रामतीर्थ यांच्या समग्र ग्रंथां'तील कविता यांच्याच आहेत. हे दादरच्या 'कवि-मित्रमंडळा'चे सन्मान्य सभासद आहेत.]

१. प्रतिभे !

[वृत्त—सुवर्णसानु]

तूं कवण रूपिणी मोलानें अनुपमा ?
जागती ज्योत आदित्यमंडलीं रमा !
मंदारमाळ कंठांत येसि गजगमा,
तव वीणयावरती हात। करितसे मात। माधुरी भारी,
संगीतसुधा स्रवतसे उदात्तविकारीं. १

तूं विविधाकारा घेसी शून्यांतुनी,
लहरींत वागसी बाळपणींच्या गुणीं !
तूं दिव्यसुखाची पुतळी सौदामिनी !
उच्छ्वास तुझा सुंदरी। सुगंधित करी। धरा ही सारी,
पावित्र्यें उसळे हृदयांबुधिचें वारी. २

तूं ज्वलदात्म्याची भाषागुणगर्भिणी,
तूं मधुर-निसर्गध्वन्यर्थविलासिनी,
तूं प्रगूढ गीतें गासी निजलक्षणीं,

भामिनी मर्म त्यांतलें। कुणाला कळे। किती व्यवहारीं,
किती 'नेति नेति' वदति गे प्रबुध पदधारी! ३.
तूं वाजिव मधु बांसरी सहज सुंदरी,
भावना कलपना विचार यांच्या सरी
चंद्राच्या किरणांसवें फेंक भूवरी!
अंबरीं घुमूं दे वरी। लकेरी पुरी। हृदय सुखकारी,
शाहिर "वसन्तविहार" तुझे आधारीं! ४.

---

२. वीर पृथुराज

[गझल]

उमद्यांमधें उमदा युवा दिलदारही महशूर हा
रजपूत जे रणधीर त्यांमधिं वीर कीं पहिला अहा!
नव वारु त्याचा चारु अवलख पांखरूं गगनीं उडे
समशेर ती सहचारिणी सहवास तत्कटिला घडे!
छाती कुणाची त्याकडे बघण्यास तो जरि एकटा
जरि निष्कवच तो केसरी मृगपाद कांपति लटलटा!
उल्लंघिले गिरिमार्ग सारे ये तसा यमुनातटा
युद्धामधें सिंहप्रभा प्रेमीं पतंगाची छटा;
झाला न पूर्वी यापरी पुढतीं न हो पृथ्वीवरी
राजा पुन्हा पृथुराजसा क्षात्रामधें नरकेसरी १.
वार्ता जशी श्रवणीं पडे आहे स्वयंवर तें उद्यां
पोहूनिया तो पार हो पाहे न कीं नाले नद्या!
थांबे न तो न्याहारिला विश्रांतिला तळही न दे.
एक्या दमीं आला पहा राजे जिथें जमले मुदें!
जागा न त्या नृपमंडलीं आहूत हा होता जरी.
कन्या न लाभो या नृपा बापाचिया हें अंतरीं
जर कां जरा पृथुराजया होतां विलंब निघावया
मग पद्मिनी जातीच कीं अन्याचिया हत! आलया;

मिळतीच ती अतिनीरसा प्रीतींत, भीरुस संगरीं
जर कां तिथें नसतां अहो ! पृथुराज हा नरकेसरी ! २

आली सभेमधिं चांदणी संयोगिता सालंकृता
पाहे कुठें पृथुराज तो हृदयांबरीं विधु शोभता;
सखियांसवें गजगामिनी सौदामिनी नृपमंडलीं
धरुनी करीं सुममालिका आशेवरी परि हिंडली !
न दिसे परी तो दिलरुबा नव गोड गीतें रंजवी
दैवास टोंचुनि बोलतां आशा पुन्हा चमके नवी !
कोणी सखी श्रवणीं वदे कीं चल गडे जाऊं तरी
पाहूं कुणाचा तो असे पुतळा उभा द्वारावरी !
मैना खुले मौनावली वेगामधें ये सुंदरी
अश्वासवें तेथें उभा पृथुराज तों नरकेसरी ! ३

मागें पिता तिज दापितां परि हो तशीच पुढें सुता
पुतळ्याचिया घाली गळां माळा मुदें संयोगिता !
माळा गळां पडतां क्षणीं झाला पुढें नरवीर हा
दृष्टीस दृष्टी प्रेमला मिळतां खुले कलिका अहा !
खालीं बघे लाजूनियां सोडी उसासा वर तसा,
गालीं मधु स्मित तें तिच्या ये अश्रु नयनीं पर तसा
कोणी सख्या मनिंचे मनीं लोण्यापरी विरल्या तशा
"आम्हांस कसला लाभ हा आम्ही कुठें भाग्यें तशा !"
तो स्पर्श एक तिच्या करा श्रवणांत शब्दहि सत्वरीं
अश्वावरी पुष्पापरी झोंकी तिला नरकेसरी ! ४

मारी उडी बसला पुढें संयोगितेच्या झटदिशीं,
वाटे मृगावर अंबरीं घे रोहिणी चाले शशी
चौफेर घोडा सोडिला जातांक्षणीं वच बोलला,
"कन्या तुझी मीं परिणिली भ्याडा, तुझा पण जिंकिला !"
गेलों पहा आम्ही असे सीमा तुझी उल्लंघिली
सेना तुझी ती येउं दे रणभूमि आहे रंगली !

राठोड अन्यहि धावले पृथुराजया धरण्याप्रती
जंबूक सारे व्यर्थ ते वेढावया हरि पाहती !
प्रेमामधें ध्रुवसा तसा विक्राळ काळच संगरीं
काव्यीं " वसंतविहार " हा पृथुराज गर्जवि केसरी ५

---

३. दीनसंभावना

प्रश्न हा मी विचारूं कुणाला कसा ?
कोकिळेच्या गुणा लावुं कैसा कसा ?
कोकिळे ! हे ! तुझें गान कां थांबलें ?
अर्धवेड्या मना त्वां गुणें बांधिलें १
चालुं दे गे ! " कुहू-कू-कुहू " गोडसें
गान माझ्या मनीं या पुरें तें ठसे !
कोण दावील मातें म्हणुनी तसें
गान वा सूर सारे जसेच्या तसे २
वेड गीतामुळें कोकिळे ? या क्षणा
मीहि कोकीळ व्हावें गमे या मना !
चालुं दे गे ! " कुहू-कू-कुहू " गोडसें
एक चित्तावरी त्या रसाचे ठसे ३
गोष्ट सांगूं कुणा ती पटे ही कुणा
श्रोतृवर्गामधें कोण घे सद्गुणा ?
चालुं दे गे ! " कुहू-कू-कुहू " गोडसें
शांतवी आर्तवृंदास त्या सद्रसें ! ४
घे प्रशंसाधनें दीनसंभावना
प्रीतिची जागती ही मनीं भावना
कोकिळे ! हे ! तुझें गान कां थांबलें
चालुं दे गे ! " कुहू-कू कुहू " मंजुळे ! ५

५. विनायक जनार्दन सहस्रबुद्धे

[जन्म सन १८९०सालीं मिरज येथें झाला. मराठी सात इयत्तांपर्यंत शिक्षण शाळेंत झालें असून संस्कृतचा अभ्यास घरीं थोडा बहुत केलेला आहे. कविता करण्याचा व्यासंग सन १९११।१२ सालापासून चालू आहे. यांच्या कविता काव्यरत्नावली, व्यायाम, किर्लोस्करखबर, ज्ञानप्रकाश, वगैरेंतून प्रसिद्ध झाल्या आहेत. बहुतेक सर्व कविता स्फुट आहेत. हे मिरजस्टेटमध्यें नोकरींत आहेत.]

१. बालकास

[चाल—गझल]

सारेंच रे करणें तुझें माझ्या जिवा सुखवीतसे
मुद्रा सुहास्य जशी प्रिया रागेजणें रुचतें तसें
खेळून खेळ धुळींत वा सुस्नात घेउनि ये तनू
आलिंगितां मज सारखा आनंद हो, न उणा अणू
मानापमान तुझ्या पुढें नाहींच वागत अंतरीं
संबोधिलें मजशीं " अरे बाबा " तुवां खपते तरी
अंकावरी बसुनी मम मिशा माझ्या धरून विचारणें
आहे जगीं अधिकार हा अन्या कुणास तुझ्याविणें ?
भाषा तुझी जरि बोबडी माधुर्य तींतचि नांदतें
शब्दास केवळ पाहती ना अर्थ त्यांत म्हणोत ते !
भाषा असे तव ही स्वयं-संवेद्य गूढ खरोखरी,
त्यालाच तो कळणें सुत-प्रेमा यदीय हृदंतरीं !
बाहेरुनी कितिही श्रमी होऊनि ये सदनीं पण
तत्काळ शीण हरूनि तो उत्साह दे तव दर्शन
जादू तुझ्या नजरेमधें कांहीं विलक्षण वाटते
प्रेमांध ही करि डोळसा मोहूनिया मज टाकते !

कोणापुढें करणें नको केव्हां जरी मज याचना
'पापा' तुला परि मागतां वाटे न लेश कमीपणा
शोभा जशीं विपिना फुलें रत्नें तशीं गृहिचीं मुलें
आनंद मूर्तिचि तूं, मला कांहीं उणें न तुझ्यामुळें !

---

२. सुवर्णभूमी

[चाल—गझल]

होती सुवर्णभूमी। आतां नुरेचि तैशी
ऐसें म्हणूं नका हो। हा बोल एकदेशी
आतां नसेल तैशी। संपन्न संपदेनें
पावे विपन्नतेला। हें साच एकपरिनें
पोटास आज पुरतें। नाहीं तसेंचि वस्त्र
दारिद्र्य नित्य वाढे। संपन्न नाम मात्र !
परि अर्थ-दृष्टिनेंची। अभिधान-सार्थतेचा
वाटे विचार करणें,। हा दृष्टि-दोष साचा
संपन्नभूमि असुनी। नाहीं तदीय महती
नसतील वीर-रत्नें। तेथें जरी खरीं तीं
गुण एकही न अंगीं। त्याच्या सु-वर्णतेला
बुध कोण आदरील ?। नलगे वदावयाला
माती जशी तनू ही। नसतां तिच्यांत प्राण
तैशीच वीर-रत्नाविण। हेम-भू असून !
धन-संपदेहुनी या। नर-रत्न-संपदेचें
वैपुल्य दाखवीतें। हें नाम आर्यभूचें
पूर्वेतिहास बघतां। वीर-प्रसू म्हणून
विख्यात आर्यभू ही। आहे तशी अजून
" नाहीं सुवर्णभूमी "। वच हें म्हणूं खरेंच
म्हटल्यास रत्नभूमी। होईल सार्थ तेंच;

शिशिरें किती झडूं दे,। वठला न आम्रतरु तों
येतां वसंत फिरुनी। सुफलें समृद्ध हो तो
ठावा न चक्र-नेमी। क्रम काय हो तुम्हाला
सरुनी विपन्निशा ही। उगवे 'सुवर्ण'-वेला
नर--वीर-संततीला। नाहींच खंड पडला
भाग्योदयीं म्हणूनी। आशा असे कवीला !

---

३. शारदेस

स्फूर्ति दे, मजसि शारदे, दास हा पाही
वांछितो करावी वाङ्मयसेवा कांहीं;
मानवी, यत्न चालवी, परी मम कविता
ना प्रसन्न अजुनी करि रसिकाच्या चित्ता !
वसवुनी, वृत्त-बंधनीं, शब्द ते नुसते
कशि येइल पदवी सत्काव्याची त्यातें ?
अर्थतः, छंद हा वृथा, असे व्यवहारीं
परि तुझ्या कृपेस्तव निष्ठेनें स्वीकारी.
विदित ना, तवाराधना-रीत ती केवीं
भावड्या भक्तिनें भजतों येइल तेवीं
योग्यता, काय ? पाहतां, नसे अणुमात्र
येईल सहज परि कृपेस होतां पात्र !
वदविती, तूं सरस्वती, मर्ला सत्कविता
शब्दास ना तरी कुठली ये रसवत्ता ?
त्यांत मी, स्वभावें कमी, बुद्धिशक्तीनें
केलास तरी तूं प्रसाद कांहीं होणें !
जो वठे, तोहि तरु फुटे, देइ फलभार
त्यावरी सुधेचे पडतां चार तुषार !

त्याहुनी, तुझा शतगुणीं, कृपामृतमहिमा
आगळा; तयाला नसेच जगतीं उपमा !
त्वत्पदा, मुदें अर्पितां, कवनसुमराजी
हो आयुःसद्व्यय तुझिया सेवेमाजीं
निशिदिनीं, वागते मनीं, आस ही माझी
पुरवावी देवी विनवी चरण-सरोजीं !

---

४. कधिं न करावा निज धिक्कार

कधिं न करावा निज-धिक्कार ॥ ध्रु० ॥
घेशि कल्पना करुनी खोटी
क्षुद्र जीव मी कोणी जगतीं
पर्वतापुढ अणुचा गणता
काय होय ती तशी अवस्था समजुनि निज साचार १
परि न आणलें ऐसें चित्तीं
गिरिराजाची कसली महती
अणु अणु मिळुनी होता भरती
गिरिप्राय हा संचय त्यांचा झाला भव्याकार २
गर्वें गर्जों सागर कितिही
नसे थोरवी त्याची कांहीं
केला मोठा त्या क्षुद्रांहीं
जलबिंदूंनीं संघशक्तिनें अगाध अपरंपार ३
घटकांनीं जर असें ठरविलें
विभक्त होऊं आपण सगळे
सानथोरपण कोणा कुठलें
सापेक्षचि तें आहे साचें बघ अन्योन्याधार ४
खरें पाहतां पामर कपि ते
साह्य तयांचें परंतु नसतें

सीतापतिचें कार्यचि नडतें
कपिकृत सेतूवरुनी झाला राघव सागरपार ! ५
गोपाळांनीं हात लाविला
गोवर्धन गिरि तदा उचलला
प्रकट करुनि हे सकल जनाला
श्रीकृष्णानें काय शिकविलें कर्मयोगिचें सार ! ६
नांवगांवही ज्यांचें नकळे
इतिहासाला माहित नसलें
असे मावळे पायीं खपले
स्वराज्य-मंदिर म्हणुनि उभारे पावे दिव्याकार ! ७
प्रत्येकाच्या कर्तव्याची
आवश्यकता समान साची
बाह्य दृष्टिनें कित्येकांची
जरी बढाई ना दिसली तरि क्षुद्र तो न ठरणार ! ८
नसशिल तूं जरि राजा कोणी
मोठा पंडित वा वीराग्रणि
मुत्सद्दी कवि प्रसिद्ध म्हणुनी
नको आपुलें उगाच मानूं जीवित हें निःसार ९
सहाय हो प्रभु यत्न-प्रवणा
आत्मा लभ्य नसे बलहीना
तसा बने नर जेंवि भावना
'स्वयं ब्रह्म मी' असें जाण मनिं, ना जड देहाकार १०
'नावसादयेत् आत्मानं' हें
भगवद्वाणी सांगत आहे
यास्तव धैर्यें तूं उत्साहें
जगीं वागुनी करून दावी अन्वर्थक 'सं-सार' ११

६. विनायक हरि देशपांडे, बी. ए.

[जन्म १८९० हे मुंबईच्या मराठा हायस्कूलचे मुख्य अध्यापक आहेत. त्यांनीं 'शियांगचा बंदिवान्' हें छोटें काव्य १९२४ त प्रसिद्ध केलें असून दादरच्या कवि-मित्रमंडळाचे ते एक कार्यकारी सभासद आहेत.]

१. बाल प्रश्न !

" गणरायाच्या या दिवशीं । कां गे आई खिन्न अशी ?
झडति चौघडे पहा कसे । सूर काढे सनई खासे !
झांजा वाजति एकसरी । मृदंग ठेका ताल धरी,
आपण आणूं गजानना । प्रसाद देऊं सकल जनां;
करिन आरती मी आई । 'हळदी-कुंकू' तूं वाही !
गेल्या वर्षींचा थाट । आठवतो मजला नीट " ॥
माय-मनाचा धीर सुटे । गहिंवर बहु कंठीं दाटे ॥
धरि बाळा हृदयाजवळीं । स्फुंदस्फुंदुनी त्या कवळी !

---

२. झांकलेली मूठ !

[गोविंदाग्रजांची 'झांकली मूठ' ही कविता वाचून सुचलेले विचार.]

झांक रे घट्ट । उघडसी कशाला मूठ ॥ ध्रु० ॥
विवंचनेचा सागर फुटला
जो तो काढी बेसुर अपुला
'जीवन' 'जीवन' करुनी थकला
सुकले ओंठ ॥ उघडसी० ॥
भीषण हास्याची ही उकळी
अंतःकरणीं मजला पोळी

दुःखाश्रू हे तव ना गाळी
होइ रे धीट ॥ उघडसी०॥ २

नव लाखांची आली तूट
दिवाळखोरांची ही जूट
दुर्लभ येथें मिळणें सूट
येइ रे वीट ॥ उघडसी०॥ ३

जो तो हें रडगाणें गाई
'समान तूंही मीही भाई'
एकच ओझें सकलां डोईं
बुडवि डोहांत ॥ उघडसी०॥ ४

नवरंगाचा हा बाजार
करि जीवाला बहु बेजार
कुठेंहि जगतीं हा शेजार
करी गोंगाट ॥ उघडसी०॥ ५

जगतामधली उरली खोंट
भरून काढिल कांठोकाठ
" सव्वा लाखाची ही मूठ "
सारी तूट ॥ उघडसी०॥ ६

७. सौ० राधाबाई साठये

[जन्म सन १८९१. या सुप्रसिद्ध महाराष्ट्रकवि व ग्रंथकार प्रो० लक्ष्मण-शास्त्री लेले यांच्या कन्या होत. यांचे पति रा० रा० गोपाळ दामोदर साठये, बी. ए., एल्एल्. बी. हे मुंबई इलाख्याच्या पोलिसखात्यांत प्रॉसिक्यूटर आहेत. या कवयित्रींचा जुने व नवे मराठी कवि यांचे काव्यग्रंथांशीं परिचय असून गुजराथी, संस्कृत व इंग्रजी याही भाषांशीं परिचय आहे. काव्यप्रदेशांत यांचा प्रथमप्रवेश सन १९२३ सालीं झाला व यांची 'उषा' ही पहिली कविता "अभिनव काव्य-माला भाग ४ था" यांत प्रसिद्ध झाली. ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार वगैरे ठिकाणींही यानंतर यांची कांहीं कविता प्रसिद्ध झाली आहे. सन १९२५ सालीं पुणें येथील वसंत व्याख्यानमालेंत 'कवि आणि समाज' या विषयावर यांनीं एक निबंध वाचिला होता.]

१. सदाफुली

दिंडी— स्वयें उद्यानीं सदाफुलीला मी
लावुनीयां सिंचिलें उदक नामी
फुलें सत्वर लागलीं यावयाला
बघुनि मजला मानसीं मोद झाला १

वंशस्थ— सदाफुली संतत शोभती फुलें
तुला तुझें नांव यथार्थ जाहलें
व्यापी तुझा पांडुरवर्ण या वना
जणों वनश्री हंसते गमे मना २

दिंडी— फुलें जाईचीं, मालती-जुईचीं
सायलीचीं, गुलनार चमेलीचीं
बकुळ-चंपक-मोतिया गुलाबांची
सुमें कोमल मधु पारिजातकाचीं ३
डुले डौलानें झोंकदार गेंद
वायुलहरी येउनी मंद मंद

सूर्यकमलें शेवती श्वेत कुंद
शुभ्र तगरी आरक्त जासवंद ४
अमित हंसरीं पाहिलीं फुलें येथें
खिन्न दिससी परि तूंचि एक मातें
काय म्हणुनी तव मना खेद झाला
सांग बाई ! या तुझ्या मैत्रिणीला ५
मधुर पुष्पांचा दरवळे सुगंध
गान करिती मधु सेवुनी मिलिंद
मधुप येईना तुजकडे कदाही
म्हणुनि बाई का दुःख मना होई ? ६
काय चिन्ता लागली तव मनाला
सांग संकोचा त्यजुनि या जनाला
रसिक येतिल तुजकडे केंवि भृंग
नसे गंध, न मधु तेंवि लोल रंग ७

वंशस्थ—

कलंक देहावरि चंद्रमा धरी !
तरी सुधासिंचन भूवरी करी
धरी उरीं श्रीहरि वत्सलांछन
तयासि तें होइल केंवि दूषण ८
अव्यंग विश्वांत नसे फुला कुणी
पूर्णत्व लाभेल तुलाचि कोठुनी ?
गुणांसवें दोषहि राहती जनीं
भुजंग जेवीं वसतात चंदनीं ९

दिंडी—

फुलें कांहीं विकसती वसंतांत
किती एकां ग्रीष्मांत बहर येत
कांहिं वर्षा-ऋतुमधें विकसतात
शिशिर हेमंतीं कांहिं उमलतात ! १०
शरत्कालीं उदयासि येति कांहीं
अशा रीतीनें होति मोददायी !

परी देवें लघु आयु दिलें त्यांस
म्हणुनि त्यांना जगिं घडे अल्पवास ११
राहि रंगीं तव सत्त्वगुणचि भावें
चंडकिरणीं म्लानता तनु न पावे
तुजसि देखुनियां युक्त या गुणानें
आयु दिधलें कीं दीर्घ विधात्यानें १२
रूपरंगांना मान जगीं थोर
मधुर गंधाला भुलति रसिक फार !
तुझ्या जवळी यांतोनि नसे कांहीं
भक्ति देवीं परि तुझी अढळ राही १३

द्रुतविलंबित— जनिं न आदरिलें तुजला जरी
तदपि राजसि ईशपदावरी
सफल जन्म तुझा म्हणुनी जनीं
तुज न वानुत, वानुत वा कुणी ! १४

---

२. कु० मिलर हिंदूकरण

इंद्रवज्रा— गंगापुर क्षेत्र जुनें प्रसिद्ध;
संशुद्धि-संभार तयांत सिद्ध.
ये तेथ गोदा-परिपूततीरीं
श्रीमंदिराच्या जवळीं कुमारी.

मालिनी— श्रुतिविहित विशुद्धि श्रीसमक्ष द्विजांनीं
करुनि तिजसि केलें धन्य आशीर्वचांनीं.
हरिखुनि मनिं टाळी वाजवीली जनांनीं;
समुचित वहु केला मान हिंदु स्त्रियांनीं.

शालिनी— वस्त्रें ल्याली, कंकणेंही करांत,
तेजस्वी ती मुद्रिका अंगुलींत.

लावीयेलें कुंकुमातें कपाळीं,
हिंदुत्वानें शोभली फार बाळी.
स्रग्विणी— वंदियेलें तिनें श्रीपदां आदरें,
देउनी दक्षिणा विप्र संतर्पिले.
श्रीफल श्री तिला अर्पिती प्रीतिनें
कुंकुमें चर्चिलीं अंबरें, भूषणें.
इंद्रवज्रा— गीता दिली रौप्यकरंडकांत
अत्यादरें घेउनि ती करांत
श्रीनां तिनें नम्रपणें प्रणाम
केला. दिसे तैं परिपूर्णकाम.
दिंडी— हिंदुधर्माचें विमल दिव्य रूप
प्रकट झालें हा लाभ हो अमूप !
मिलर शर्मिष्ठा आजि अहा झाली !
म्हणुनि तत्कीर्ती मुखालागिं आली.
वदे शर्मिष्ठा हिंदुबांधवांना !
" असति देशीं माझिया ग्रंथ नाना;
परी त्यांमधिं एकही नचि उदार
हिंदुधर्मासारिखा परम थोर.
" जगद्गुरुही अनुकूल मला झाले;
भाग्य तेणें उदयासि आजि आलें.
असे तेजस्वी धर्मवीर जेथें
खचित विजय-श्री-नीति सर्व तेथें ! "
हिंदु होण्याचें धैर्य दावियेलें,
भगिनि ! हें त्वां मोठेंचि कार्य केलें !
श्रीहि झाले त्याच्यांत तुज सहाय;
म्हणुनि त्यांचे वदितें पूज्य पाय.

८. केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर

[अहमदनगरनजीक भिंगार गांवीं यांचा जन्म सन १८९१ सालीं झाला. हे हल्लीं नगर जिल्ह्यांत संगमनेर येथील हायस्कुलांत शिक्षक आहेत. यांचीं 'बकुळीचीं फुलें', 'बालकवीस बाष्पाञ्जली', 'पुरुषार्थशतक' हीं काव्यपुस्तकें प्रसिद्ध आहेत.]

१. भरतभूमिस्तोत्र

जय जय जय भरतभूमि ! क्षितिभूषण माते !
श्रेष्ठ जैंवि गगनिं तरणि । तेंवि असिस भुवनिं जननि !
प्रभुकृतशुभवैभवमणि । गमसि तूंच मातें !
शशिशेखर गौरीहर । हिमगिरिवरि करि विहार
पापतापहारि नीर । तेथुनीच येतें.
पुण्यतपोवन पावन । शांतिसदन नंदनवन
सृष्टिश्रीक्रीडांगण । असिस तूंच माते !
विश्वसरसि कमल दिससि । मोहनमुरली गमसी
अवतारस्थल अससी । भाग्य तुझें मोठें !
कुसुमित तव हरितचीर । हर्षवि जाशि चंद्रकोर
होइ मुदित मनमयूर । करित नर्तनातें !
तव प्रतिभेचा प्रकाश । करि गगनीं चिद्विलास
आत्मबोध दे जगास । वैभव तव मोठें !
सत्यधर्मजीवनघट । देई प्रभु तव करांत
विश्वतरुसि घालिसि नित । जीवन तें वाटे.
माते ! तव वाग्विलास । करि मानवह्रद्विकास
देई प्रभुपदिं निवास । निःश्रेयस होतें.
" धन्य धन्य मातृभूमि । जय जय जय भरतभूमि "
वदतां ये प्रेमोर्मी । नयनिं नीर लोटे !

९. आनंदीआनंद

[श्री० बाबूराव विठ्ठल कडू. जन्म सन १८९४. हे कवि त्वष्टा ज्ञातीचे असून न्यू पूना कॉलेजमध्यें कांहीं दिवस शिक्षण घेतल्यानंतर त्यांनीं नोकरी धरिली. ते उत्तम लघुकथालेखक असून त्यांच्या गोष्टी 'विठ्ठलात्मज' या नांवानें 'मधुकरां'त प्रसिद्ध झाल्या आहेत. ते 'यौवनयाचना' नांवाचें नाटक लिहीत आहेत. हल्लीं ते सातान्यास असतात.]

१. अंगाईगीत

[चाल—पाळण्याची०]

जो जो रे बाळा, लडिवाळा, नीज सुखें या काळा ॥ ध्रु०॥
हलवुं नको वाळा, वेल्हाळा, सोडि क्षणीं या चाळां
लावुनियां डोळा, निजतनुला,-दे क्षण विश्रांतीला
करितें विनतीला,-मी तुजला, थांबवि या तव लीला
पाहसि काय मला,-अबलेला, तव सुख सुखवी जीला?
करिसी हास्याला, काय तुला,-झोंप न या समयाला?
दिसति पहा मजला, अवनितलां, कितितरी ह्या जनमाला
घेती त्या सकला,-सुशीला, स्वीकारुनि शांतीला
होता बाग मुला,-हा अपुला, हिंदभूमिचा सगळा
तेजानें भरला,-सुमंगला, हिरवा हिरवा फुलला
कां परि हा सुकला,-मुळि याला, तेजोलव ना उरला?
पाहुनि हा असला,-पाचोळा, शिण हो बहु हृदयाला!
हा श्रीमान भला,-श्री विफला, कवटाळुनिया निजला
याच्या नयनांला,-ना दिसला,-काय मायभू पुतळा?
काळ कठिण आला,-तिज नुरला, अन्नलेशही कसला!
धड नेसायाला,-बघ तिजला-वाण पडे वस्त्राला
प्रसंग हा भूला,-जरि असला, खल धरि हा कां श्रीला?
हा धीमान भला, धी विफला,-लावी परसेवेला!
याच्या हृदयाला,-ना आला, मायभूमि-कनवाळा!!

हा बलवान भला, आत्मबला,–विसरुनि घे सौख्याला
याच्या देहाला,–वाढविला, सोसुनियां कष्टांला
ऐशा मातेला,–विस्मरला; तिच्या सेवे मुकला !
तरि माझ्या बाळा, सुकोमला, नीज कां न ये तुजला ?

झडकरि निज विमला, या काळा, पाहसि काय जगाला ?
आतांच्या काळा, रे बाळा, झोंपच घेणें तुजला
येइल तव वेळा, मग कुठला,–स्वर मम ऐकायाला ?
धरिसि पुढें श्रीला, कीं धीला, जरि बल तव भाग्याला—

लावी कार्याला –त्या अखिला, वेंचुनि निज प्राणांला
सांगे ही अबला,–जरि अबला, हृदयिं धरी या बोलां

---

२. श्रीगणेशा—

[१]

'श्रीगणेशा'चा तो पाठ घेई बाळ, । सुखाचा तो काळ जाई वेगें ॥
शुद्ध तेव्हां देह, शुद्ध तेव्हां मन, । जैसें शुद्धपण गणेशाचें ॥
हंसणें, खेळणें, सर्वही सुखानें । बोलणें, रुसणें, सौख्यपूर्ण ॥
'आनंदी–आनंद' सर्व गेला कोठें ? । नवल हें वाटे श्रीगणेशा ! ॥

[२]

'श्रीगणेशा'चा तो सुमंगल पाठ–। गुरु-हस्तें नीट घेवोनीया,–॥
दिलें पूर्ण लक्ष दक्ष सदा चित्तीं–। देवी सरस्वती आराधीली ॥
जनीं म्हणीतलें, 'विद्वान् जाहला' ! । मोद हो मनाला कोटी गूणें ॥
'आनंदी–आनंद' परि आतां कोठें ? । कोडें हेंच मोठें, श्रीगणेशा ॥

[३]

'श्रीगणेशा'चा तो पाठ आतां गेला, । क्षुद्रसा भासला मानसाला ॥
प्रणय–कथांच्या वाचनीं हे मती– ।धरी बहु प्रीती, रंगे रंगीं ॥

निर्व्याज, निर्मळ, दृष्टी आतां नाहीं, । पापपूर्ण पाही, नेत्र झाले ॥
'आनंदी-आनंद' ऐशा चेष्टांमाजी- । वाटे बहु आजी, श्रीगणेशा ! ॥

[४]

'श्रीगणेशा'चा तो पाठ त्यागी चित्त, । ताठा अंगीं नित्य आला तेणें ॥
मद चढे अंगीं, येई अंधपण, । ईशागुरुजन क्षुद्र लेखी ॥
अनाथ, पीडित, जनांसी धिक्कारी । हास्य वरी करी निर्दय तो ॥
'आनंदी-आनंद' मानोनिया यांत- । पावे अधःपात, श्रीगणेशा ! ॥

[५]

'श्रीगणेशा'चा तो पाठ मंगलसा- । वाटतें मानसा घ्यावा पुन्हा ॥
पावित्र्य देहाचें गेलें यावें पुन्हां, । निर्मल या मना बल तैसें ॥
कृपें देवा, तुझ्या मिळावी विश्रांती- । देहा, मना, किती आळवावें ? ॥
'आनंदी-आनंद' सकल जगतीं- । व्हावी सुख-शांती, श्रीगणेशा ! ॥

१०. श्री० गिरिजाबाई विंचूरकर

[इतिहाससुप्रसिद्ध विंचूरकर घराण्यापैकीं या कवयित्री आहेत. दुर्दैवानें वैधव्याची दारुण आपत्ति यांच्यावर पडल्यानें आतां उर्वरित आयुष्य ईश्वरभक्ति व वाङ्मयसेवा यांमध्यें या घालवीत आहेत. यांच्या स्फुट कविता 'यशवंत' 'मनोरमा' इ० मासिकांतून येत असून त्यांच्या कवितांचा निवडक संग्रह 'त्रिदल' या काव्यगुच्छांत आलेला आहे हें सुप्रसिद्धच आहे.]

१. दिव्यता !

कांहिं नच रुचे,
काव्य नच सुचे,
मन्मनांत होत कांहिं-बोलुं कां वचें ?
भ्रांति कां असे ?
समजुं कां पिसें ?
अन्तरिंच्या अन्तरांत दिव्य येतसे !
बघ घनान्तरीं
प्रीतिच्या सरी
रवि-आत्मा त्यांत वसे; दिव्यता खरी !
गे हृदन्तरीं
प्रेमनिर्झरी,
दिव्य-मूर्ति आंत वसे ! कैंवि वदुं तरी ?

---

२. त्रिदळ

[चाल:—उद्धवा शांतवन०]

बैसलें काव्य करण्याला, परि अंत:स्फूर्ती नाहीं.
गगनांत चांदण्या जमल्या, परि चंद्र उगवला नाहीं.

नभ आक्रमिलें मेघांनीं, परि चपला चमकत नाहीं;
कमलिनी सरोवरिं फुलल्या, परि षट्पद गुंगत नाहीं !
मधु पुष्पगंध केतकिचा, परि तक्षक डोलत नाहीं,
शारदा छेडिते तारा, परि मयूर नाचत नाहीं.
चित्रार्थ जमविले रंग, परि कल्पक तेथें नाहीं.
प्रत्यूषीं स्तोत्रा म्हणतें,–परि सुस्वर कंठचि नाहीं;
पूजितें नित्य देवाला, परि भक्ती लेशहि नाहीं.
आभरणीं वनिता नटली, परि भालीं कुंकुम नाहीं.
सम्राट् तिन्ही जगतांचा, परि भूषण बालक नाहीं,
गुंफिलें त्रिदळ काव्याचें, परि शंकर भूवरि नाहीं !!

---

३. दीन-वाणी

[चाल—हरिची भगिनी म्हणे सुभद्रा०]

सहज विनोदें अति प्रेमानें बोलुनि गेलें प्रियनाथा।
क्षमा मागतें, पदर पसरतें, विनयवती मी तव कान्ता ॥ध्रु०॥

राग कशास्तव आजि हा धरिला ?
प्रेमा अपुला लोपुनि गेला !
विसरहि माझा म्हणुनी पडला
" असासि लाडके ! प्रिय माझी तूं " ऐशी वदली तव वाणी,
आणावचनें कितितरि झालीं, मति बदले ही केंवि झणीं ?॥१॥

कालाधिन दिन किती ते गेले
वाट पाहुनी नेत्रहि शिणले
नको नकोसें जीवन झालें
सुरलोकींचा सहज सोहळा सेवित सुखवित सुरांगना
संग तयांचा दंग तयांमधि, भूवरची स्मृति हो न मना ॥२॥

अमृत कीं अधरामृत मिळतें
लाभे स्वर्गीं सुरांगनांतें
नृत्यगान तें नित्य चालतें.
मोहिनिनें मन मोहुनि जातें, भान न उरतें अपणातें
स्पर्शसुखानें शान्ति-सुखातें, दीप्ति तयांना किति येते ॥३॥

पाश तयाचा सोडुनि सखया !
सत्वरि धावुनि ये या समया
विनती करिते मी तव पाया.
सहज विनोदें अति प्रेमानें बोलुनि गेलें प्रिय नाथा
क्षमा मागतें, पदर पसरतें, विनयवती मी तव कान्ता ॥४॥

---

४. ऐक्य.

तूं जरि जाशील प्रभो ।सोडुनिया आतां ।
मी नच सोडीन तुला । धरिन भक्ति-पंथा ॥ ध्रु० ॥
मानुं जरी मनुज तुला । होइन तव छाया ।
मानुं जरि शशांक तुला । मानि चंद्रिका या ॥ १ ॥
मानुं जरी चाप तुला । होइ रज्जु बाला ।
मानुं जरि सगूण तुला । मानि धवल कीर्ति मला ॥२॥
मानुं जरी ब्रह्म तुला । होइन तव माया ।
स्वामीपद येइ तुला । धरित दासि पाया ॥ ३ ॥
नयन जरी योजुं तुला । मज मानी दृष्टीला ।
हृत्सारस मानुं तुला । मानी मन-हंस मला ॥४॥

११. रामदीक्षित

[श्री० रामचंद्र नारायण दीक्षित. यांचा जन्म सन १८६६ मध्यें झाला. ते ओतूर जिल्हा पुणें येथें वैद्यकी करीत असतात. त्यांची कविता जुन्या वळणाची पण प्रसादयुक्त असते.]

१. तरुण शिवाजी

दया, न्याय, नीति, क्षमेचाहि गंध ।
नसे अंतरीं, भूप ऐसे अविंध ॥
प्रजा पीडुनी धेनु-संहार रोजीं ॥
करूं लागले जन्मला तैं शिवाजी ॥ १

घडे जन्म त्या भोसल्यांच्या कुलांत ।
मनोल्हादकामोद जैसा फुलांत ॥
जिजाई सुमाता, पिता तो शहाजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ २

जधीं माय मांडीवरी बालकासी ।
बसे घेउनी विप्र-गो-पालकासी ॥
रमे भृंगसें चित्त तैं तन्मुखाब्जीं ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ ३

तडित्तेज चांचल्य अंगीं विराजे ।
कराया हवें शत्रुसी संगरा जें ॥
सहस्रांशु हा शत्रु-नक्षत्र-पुंजीं ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ ४

जहाला न जों बाल षड् वत्सरांचा ।
वमे तुंड-कुंडांतुनी मत्सराचा ॥
प्रचंडाग्नि जो म्लेंच्छ-चित्तास भाजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ ५

पर्थीं क्रीडतां सिंहसा तो कुमार ।
म्हणे म्लेंच्छ-बाळांस हे रंकु मार ॥
स्वयें दे. कुणी दापितांही न मोजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ ६

जयश्रीस शत्रूकडे चाललीला ।
वराया पुढें तो करी बाललीला ॥
धराधीश होई मुलांच्या समाजीं ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ ७

शहाजीचिया जाय वृत्तान्त कानीं ।
म्हणे ऐकतां हिंदु-धर्मांतकांनीं ॥
कळेना दशा काय होईल माझी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ ८

न व्हावा स्ववंशावरी भूप-कोप ।
म्हणूनी स्व-पत्नीस धाडी निरोप ॥
सुतातें सदा बोध-पीयूष पाजीं ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ ९

जिजाई करी मान्य आज्ञा पतीची ।
न चिद्वृत्ति नेणे कवी त्या सतीची ॥
सुधा ती न पाजी कुमारास कांजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ १०

म्हणे बाळका ! सांगतें ऐक हें तूं ।
पित्याचा सदा पुत्र-कल्याण-हेतू ॥
नमीं भूप तो त्वत्पिता ज्या सभा जी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ ११

तदा क्रुद्ध होऊनि तो शुद्ध-भावें ।
म्हणे माउली ! म्यां तुलाची नमावें ॥
न वंदीन मी भूप कीं वीर काजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ १२

मला तूंचि गंगा मला तूंचि काशी ।
मला देव तूं देवता अंबिकाशी ॥
असे त्वत्पदीं भावना सर्व माझी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ १३

तदा माय ती बाळका शांतवून ।
म्हणे बा ! वरी थंड हो आंत ऊन ॥
रहा. तूं पहा भूपतीची सभा जी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ १४

पुढें ने पिता म्लेंच्छ भूपासमीप ।
प्रभा स्पष्ट दावी महाराष्ट्र-दीप ॥
उभा नीट तो थीट राहे स्व-तेजीं ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ १५

तदा न्याहळूनी तया भूप पाहे ।
म्हणे बाल अद्यापि अज्ञान आहे ॥
भयग्रस्त झाला परंतू शहाजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ १६

लवावें, स्तवावें, वसावें, उठावें ।
कसें तें नसे या कुमारास ठावें ॥
असें भूप बोले न अन्याय मोजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ १७

गृहीं येउनी दादुजी कोंडदेवा ।
शहाजी म्हणे पुत्र हा म्लेंच्छ-हेवा ॥
करी यास बोधूनि कांहीं पहा जी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ १८

परी नायके तो करी हट्ट नाना ।
स्वयें ग्राम धुंडी पुरां पट्टनांना ॥
अरण्यांत हिंडे बघे दुर्ग-राजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ १९

पुढें त्रस्त लोकांसवें स्नेह जोडी ।
न जिव्हा मनातें परी स्वैर सोडी ॥
तयांच्या शिरे भृंगसा हृत्सरोजीं ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ २०
वया लोटलीं जों न वर्षेंहि सोळा ।
करी धीर तो मावळे वीर गोळा ॥
तयांच्या सवें होय रूक्षान्न-भोजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ २१
सवें घेउनी सौंगडी हेर झुंडी ।
न पाहे निशा तो दिशा सर्व धुंडी ।
सदा मेळवी माहिती नित्य ताजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ २२
वया लागतां वर्ष एकूणवीस ।
प्रतापें बघे लोपवूं तो रवीस ॥
त्वरें वेंघला पाहुनी भव्य वाजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ २३
करीं खड्ग घे नाम ठेवी भवानी ।
जिच्या तीक्ष्ण तेजासि भूलोक वानी ॥
महा उग्र जी शत्रु-संहार-काजीं ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ २४
पुढें पाहतां शत्रु दोर्दंड ठोकी ।
क्षणार्धांत त्या पाठवी स्वर्ग-लोकीं ॥
भवानीस तैं शत्रु-रक्तांबु पाजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ २५
अहो तोरणा दुर्ग घेतांच हातीं ।
जगीं विस्मयें लोक सारे पहाती ॥
कसा बोलती जन्मला वीर गाजी ।
अहा धन्य तो धन्य राजा शिवाजी ॥ २६

१२. विठ्ठल जगन्नाथ कामत

[यांचा जन्म सन १८९१ सालीं झाला. यांच्या कविता प्रचलित मासिक पुस्तकांत येत असतात. यांची कविता स्वतंत्र विचाराची असून थोडी जुन्या वळणावर आहे. हे तळें, जि. कुलाबा येथें इंग्रजी शिक्षक आहेत.]

१. प्रेम.

प्रेमें जीव जगें, जगीं नच दुजें प्रेमाविणें बंधन ।
प्रेमें वाढति जीव सर्व जगतीं श्रीमंत वा निर्धन ॥
प्रेमें ये जगता अहा ! विविधता सौंदर्य नानापरी ।
प्रेमें लाभतसे हरी, खरि वसे प्रेमामधें माधुरी ॥ १

२. वसंत

आला वसंत बहु रम्य निसर्गराज ।
आनंदली सकल सृष्टि नितांत आज ॥
चौफेर चारुतर ही फुलली वन-श्री ।
झाली प्रमोदित तशी जनता-मुख-श्री १
हे आम्रवृक्ष नटले नवमञ्जरींनीं ।
वेली अहा ! डवरल्या हंसऱ्या फुलांनीं ॥
गुंजारवीं मधुप-संघ नितांत गुंग ।
आनंद-रंगिं जणुं सर्व निसर्ग दंग २
कोकील हा करित मंजुल गायनातें ।
काढीतसे शुक अहा ! मधुर-स्वनातें ॥
स्वातंत्र्य-गीत जणुं गाति वनीं विहंग ।
आनंद-रंगिं जणुं सर्व निसर्ग दंग ३
उद्यानिं वा उपवनीं नव सृष्टि झाली ।
शोभायमान दिसतेहि वसंत-कालीं ॥

आनंद पाहुनि तिला सकलां जनांना ।
होई, कितीतरि तसा प्रिय बालकांता ४
कंठांत घालिति मुलें नव-पुष्प-हार ॥
हस्तीं धरूनि फिरतीं सुम-गुच्छ-भार ॥
वैचित्र्यपूर्ण गजरे रचुनी मुली या ।
वेणींत खोंवुनि विभूषविती स्वकाया ५
हे सान थोर जमलेहि वनस्थलींत ।
वेंचोनि वन्य कुसुमें किति आणितात ॥
बाला अहा ! सजविताति वसंत-देवी ।
ती हौस कॅवितरि या कवनांत गावी ६
वासंतिकोत्सव तदा करितात मोदें ।
दिक्प्रांत हा दुमदुमे मधु-मोद-नादें ॥
हे बाल मारिति उड्या, फुगड्या मुलींच्या ।
या चालल्याहि, खुलल्या जन-वृत्ति साच्या ७
दोल्यांवरी बसुनि सुंदर वल्लरींच्या ।
या चालल्या मधुर गीति मुलांमुलींच्या ॥
चोहींकडे पसरला मधु तान्निनाद ।
बालांस नन्दन-वनासम होइ मोद ८
आला वसंत हंसवीत मुलांस आला ।
झाला प्रमोद बघुनी वनदेवतेला ॥
प्रेमें अहा ! उधळिलीं सुमनें तियेनें ।
सर्वत्र तीं विखुरलीं नव दिव्यतेनें ९
तीं हीं पहा विलसतीं सुमनें नभांत ।
तीं तींच शोभति पहा अपुल्या गृहांत ॥
उद्यानिं तींच सुमनें मधुगंधशाली ।
तीं हींच काव्य-सुमनें कविला मिळालीं १०

१३. विनायक गोविंद साठये.

[जन्म सन १८९३. हल्लीं मेढे येथें सब-पोस्टमास्तर आहेत. बालपणापासून कविता करण्याचा नाद. प्रसिद्ध कवि व संशोधक कै० गु. वासुदेवशास्त्री खरे यांच्या प्रोत्साहनानें तो नाद वाढीस लागला. यांच्या कांहीं निवडक कवितांच्या 'श्रीनूपुर' नांवाच्या संग्रहास डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रा०सो०पुणें, कडून बक्षिस मिळालें आहे. अद्यापि अमुद्रित अशा यांच्या तीन ऐतिहासिक पोवाड्यांस 'तरुण भारत मित्र मंडळ' नाशिक कडून चांदीचीं पदकें मिळालीं आहेत. यांच्या "संजीवनी-हरण" या अप्रसिद्ध सप्तसर्गात्मक काव्याचा ३ रा सर्ग १२ वें महाराष्ट्र साहित्य संमेलन अहवालांत प्रसिद्ध झाला आहे.]

१. चिमणा वासुदेव

[एका दुपारीं शेजारचा दोनअडीच वर्षांचा वासुदेव नामक मुलगा माझ्या-कडे मोठ्यानें हंसत येऊन बोबड्या बोलानें कांहीं सांगूं लागला.]

[चाल—कठिण कठिण कठिण किती०—ताल–दादरा]

हास असा हासचि रे, वासुदेव वाळा।
भर दिवसां देचि मला चंद्रिकासुखाला ॥ ध्रु०॥
हनुवटिची चंद्रकोर काय मुरडली
तव गालीं नच सुन्दर ही खुले खळी!
अधरीं किति लाललाल सांज रंगली!
हे डोळे गुरुशुक्रचि उदित संधिकाळीं! १
स्फटिकोज्ज्वल चान्द्रण्याचि काय, अम्बरीं
विलसति नच दन्तकण्या तव मुखोदरीं
लोल खळे नच रसना स्वर्णदी खरी!
हास्यनाद पवन जसा स्वैर मांडि खेळा! २
स्वैर हास्यलहरीसह बोल बोबडे
गळति न शशिवदनामृतकणचि रोकडे!

त्या वरल्यावर झेलूं हांवरे खडे
हे चकोर होति न मम कर्ण घडिघडीला ! ३
हंसहंसून ओंठाला ओंठ मिळविसी
मिळविसि नच तोंड त्यासि दूर सारिसी
सहज घडे हें तव तरि मदिय मानसीं
तारास्तोदय गमेचि होय प्रतिपळाला ! ४
बालवासुदेव मुखीं नंदसती पाही
अस्तोदयमयचि जगच्चक्र फिरत राही !
मजहि तेंचि दाविलेंसि पटविलेंसि तूंही !
मिथ्या जग एक सत्य वासुदेव ठेला ! ५

---

२. चौघडा

[देवतादारीं चौघडे हे झडायचेच त्याप्रमाणें ते भारतमातेच्याही दारीं झडत आहेत. मात्र श्रोत्यांची उणीव आहे. त्यांची झोंप कधीं सरतें हेंच पाहणें आहे.]

चाल—चल सख्या जिवा रे० (गोविंदाग्रज वाग्वैजयन्ती.)

झडतसे चौघडा घडोघडी । द्या कान त्याकडे वीर गडी ! ॥ध्रु०॥
'अज्ञ मुला मज कसा मिळे प्रभु ?'
ध्रुवा न कोडें पडे कदा । तो सविक्रमें घे अढळपदा ! ॥ १
आठहि वर्षें वय नसतांना ।
राम राखि मुनि मखा सुखें । तो उदंड दैत्या वधूं शके ।। २
" कसा सर्व सुख विमुख जन्म हा ।
करूं पित्यास्तव ? " मना असें । नवयुवाहि भीष्म न मुळीं पुसे । ३
बाळ अनुभवें वयें मी कुठें !
द्रोणाद्रि कुठें रणपटु हे ! । अभिमन्युसि शंका शिवे न हे ! ॥ ४
कृतांत-काळाचि अफझुलखां तो !
पोर कोवळें शिवराया । तरि अभय झुजे घे अतुल जया ! ॥ ५

धैर्यमेरुचा न ढळे कणही !
धर्मवीर तो अभिमानी । अरिहतहि शंभु हो अमर गुणी ! ॥ ६

अबला राणी लक्ष्मीबाई
प्रबळाहि करी गर्भागिळ ! । निजतेजें वीजचि जणु चपळ ! ७

पुरुषार्थाच्या प्रतिमा असल्या
पुराणीं तशा इतिहासीं । किति अमर भारतीं गुणराशि ! ॥ ८

ध्येय-शेखरीं निजकरणीनें
चढल्या वीरांचे झडती । किति सुयशोदुंदुभि दिग्प्रांतीं ! ॥ ९

पण ते ऐकूं येत असूनहि !
केविं भारता, तूं सुप्त ? । जग उभें नवल हें आजि करित ! ॥ १०

१४. सखाराम गोविंद विरकुड, बी. ए.

[जन्म सन १८९४. हे मूळचे मुरूडचे. चौकळशी माळी ज्ञातींत यांचा जन्म झाला. हे विल्सन कॉलेजमधून बी. ए. झाले. माजी 'महाराष्ट्र-साहित्य' मासिकाचे हे संपादक होते. हल्लीं कोल्हापूर येथें राजाराम हायस्कूलमध्यें शिक्षक आहेत. राष्ट्रीय वृत्तीचे प्रतिभावान् कवि या नात्यानें त्यांचें नांव महाराष्ट्रांत सुप्रसिद्ध आहे. कर्मवीर तानाजी मालुसरे, महाराष्ट्र शाहीर गोविंदाग्रज, महाराष्ट्राची सवाई थर्मोपिली व शुक्लपक्षांतील अमावास्या अशीं यांचीं चार खंडकाव्यें सुप्रसिद्ध आहेत. स्फुट कविता ही विपुल व सरस आहे.]

१. महाराष्ट्रसाहित्यास

[गज्जल]

तुझी ती जादुची आतां। फुलूं दे वाटिका पुरती
पताका शब्द-सृष्टीची। झुलूं दे कल्पनेवरतीं
खुमारी ती तुझी न्यारी। पडूं दे आज जगताला
सभा ही तिष्ठली भारी। भरारी मार गगनाला
सुधेच्या काव्यमकरंदीं। भरूं दे भारतीं प्याला
वरूं दे स्वर्गसुंदरता! तुझ्या या आर्यजननीला
मनाच्या भावना साऱ्या। जनांच्या चेतवी हृदयीं
निराशा दुःख खेदाचा। नुरावा वास या ठायीं
अभावीं भाव शून्याची। उभारी सृष्टि तव बोल
सुखाच्या श्वास निश्वासें। जगांचे नाचवी गोल
जनीं दे जन्म ईशाला। अशांची काव्य-चित्-शक्ती
खऱ्या स्वातंत्र्यसूर्याची। प्रभा ती फांकवी जगतीं
करीं घे विश्वविजयी त्या। कवींच्या कीर्तिध्वज पदरा
तुझ्या या गायका करुं दे। सदाचा शाहिरी मुजरा

?????????

हे साहित्याचे तेरे पन्थ

देवी शारद! ऊठ राहलिं पान रचि त्याला
अभिनव शब्दे सजबुनि गाढी प्रेम रसविला
अपि कविते, अर्जि सोड गोड तव गूढ समाधीला
तरल कल्पना-तरग लोके दे साहत्यिाला.

पान नसे हा सान चत्रिपट तवे क्रीडेसाठीं
वशिद होउ दे जगास जें जें वध्रियाच्या पोटीं
नीलनभाच्या पानावरि तो ईशाचा हात
रोज रंगवी कालोदरचिी चंदेरी रात
श्रीरामांनीं सीतेसाठी भवभूती-ओष्टीं
आठवतें ना रंगवलिल्या रानांतलि गोष्टी?
शाकुंतलेचे वशिद कराया रहस्य हृदयाचें
कमलदलावरि कलम फरिवितो कवकिुलगुरू साचे [१]
त्रकिालमंडति त्रखिंडवंदति तत्त्वज्ञानाचे
श्रीतुकथाचे पान पोहलें ललि इंद्रायणचि!
आणि लाडक्या कवि रामाचे तें पपिळपान
कसें हालले तरल तुझ्या त्या सात्त्वकि ध्यासानं?
इतहिासाच्या पानावरतीं शौर्यचेतनेचीं
असंख्य चत्रिे तूंच दावलिीं भडक भावनेची.
आणकि जें जें जगी राहलिें चरिंजीव आज
ताखपटावरि तुझ्या कुंचल्याचा चढबुनि साज;
आज रुष्टता परी पसरली कोमल भावांत
म्हधुनि राहते पान रति कां तव साहत्यिांत!
आवाहन आजचे स्वीकरीं देवि! अपत्याचे
वात्सल्याचे सहप्रेमाचे उन्मुरक भा:वाचें-

दृष्टिला दृष्टि जैं लागे । मोहिनी
तेधवां । धन्य ! या जिवा । मानि माधवा !
किती सांगूं मी । किती सांगूं मी । श्रीहरी ॥ ३

निरखुनी परी लपलासी । कां तरी ?
चुकवुनी असा कां जाशी ? श्रीहरी !
कां त्याजिसि दीन दासीशीं । यापरी
शोधितें । कुंज धुंडितें । सकल हुडकितें
कसा लपलासी । कसा लपलासी । कुणिकडे ॥ ४

मांडिला असा कां दावा ! । श्रीहरी !
अपराध पोटिं घालावा । श्रीहरी !
चरणाशिं ठाव मज द्यावा । श्रीहरी !
ही एक । घालि रे भीक । धांव, दे हांक
दया येऊं दे । दया येऊं दे । श्रीहरी ! ॥ ५

किति गाउं कन्हय्या धांवा । सांग तूं !
आळवूं किती या जीवा । सांग तूं !
किति अंत पाहसी देवा । सांग तूं !
जिवलगा । असा कां उगा । देउनी दगा
कुठें लपलासी ? । कुठें लपलासी ? । श्रीहरी ! ! ॥ ६

२९. श्रीकृष्ण वामन गाडगीळ

[हे निजामसागर येथें बँकेंत नोकर आहेत. यांनीं 'माझीं फुलें' नामक काव्यसंग्रह प्रसिद्ध केलेला आहे.]

१. मर्मकथन

["काव्याकडे मनःप्रवृत्ति कशी वळली ?" असें कोणी एकानें विचारल्यावरून—]

करस्पर्श होतां । लाजाळू लाजे ती,
सुमें गंध देती । मोगरीचीं.
आकाशीं भराऱ्या । मारितो गरूड,
गाई गान गोड । कोकिळा ती.
नाचोनी मयूर । तोषवी नेत्रांसी
मधुर जिव्हेसी । इक्षुदंड.
रजनीच्या पोटीं । तारे उगवती
सुमांची संतति । वल्लरींना.
कस्तुरी संभवे । मृगाच्चिया नाभीं,
मुक्ता शुक्तिगर्भीं । जन्म पावे.
इंद्रधनुमध्यें । रंगाचा संभव
विजेचा उद्भव । मेघामाजीं.
पूर्ण चंद्रामुळें । सागर हेलावे
किंवा द्रव पावे । चंद्रकांत
वर्तावें या मार्गें । कोण त्या शिकवी,
आम्हांस पढवी । काव्य तोचि !
काय सांगूं सुज्ञा । गावें कां आम्हीं
मर्मीं ना कळतें । केधवांही.

ईशें आम्हां दिला। काव्यमनोधर्म
जाण हें तूं मर्म। कवनाचें.
शिकोनीच आलों। उदरीं मातेच्या
गावें हा आमुचा। स्वभावचि !

---

२. बापूंची खानावळ

[कविता वाचून वाचकांनीं कृपा करून माझ्याविरुद्ध बापूंचे कान भरूं नयेत. कारण, तसें केल्यास खाल्ल्या घरचे वांसे मोजण्याच्या अपराधाचें माप बापू माझ्या पदरीं घालतील !]

[विद्युन्माला वृत्ताचे चालीवर]

" दहा वाजले बापू, आतां;। उशीर नाहीं झाला म्हणतां !
शाळेची ती होइल घंटा। मास्तर घेतिल हातीं सोटा
अभ्यासाचा होइल तोटा;। सारे म्हणतिल मज मग 'गोटा'
झटपट घाला अमुच्या पोटा। नाहींतर हो होइल तंटा !
उशीर होतां घाई मोठी। उडते; उठतों अर्ध्या पोटीं !"

* * *

" जिकीर जोशी, फारच तुमचो। खानावळ ही एक न अमुची !
पुण्यामधें या रस्तोरस्तीं। खानावळि हो कितितरि असती
तुम्हांस आहे वाट मोकळी। कशास करितां कटकट असली !"
कडक विडीचे झुरके घेउनि। बापू मालक वदती कोपुनि
तोंच भोगले-बंधू आले,। परांजपे, घारेही शिरले
'मेंवर' सारे झटपट जमले। बापुहि घाई करिते झाले !

* * *

" पाट मांड रे पटपट रामा !। उशीर कां तूं करिशी कामा ?
ताटें धुतलीं का गंगीनें ?। मांड लौकरी जा ओळीनें !
गोप्या ! तांब्ये आण भरोनी !"। बापू मालक ऐसें वदुनी
वाढायातें अपुल्या हातीं। भात, आमटी, चटणी घेती

पानामध्यें उसळ वाढिती । भोजनास 'मेंबर'ही बसती
'पोळीवाले' त्यांतचि आले । 'भाक्रीचे'ही त्यांतचि बसले

* * *

बुडी मारिली तरिही कोणा । आमटींतला न मिळे दाणा !
घृतधारेचें वर्णन सगळें । " केशवसुत " कवि करिते झाले
भात लागतो नित्य बुडीला । मीठ न मुळिं तें कधिं भाजीला !
अर्धें कच्चें अन्न सदाही ! । खानावळ ती असली राही
विद्यार्थीगण हाय, आमुचा । अर्ध्या पोटीं उठतो साचा
धन्य परी खानावळवाले; । पुण्यामधें हो गबरचि झाले !
हात पाय कोणीहि न धुतले, । सदऱ्यासह कित्येकचि बसले !
सात पुटींचा मुकटा मळका । ओकारी जो आणी लोकां
पिढीजात ठेवण बापूंची । सदा नेसते स्वारी त्यांची !

* * *

गलक्यामध्यें भोजन चाले । हास्यरसानें 'गृह' दणदणलें !
'भाजी वाढा' वदती कोणी; । 'पाणी आणा' म्हणती कोणी
संतत असली दंगल चाले । धन्य धन्य खानावळ-वाले !
ताज्या खबरा अष्ट दिशांच्या । कानीं पडती येथें साच्या !
वाङ्मयचर्चा संतत चाले, । राजकारणहि येथें उसळे !
व्यापारांतिल तेजी-मंदी । येथें येई वादविवादीं !
नाट्यकला, ती चित्रकलाही । येती साऱ्या ललितकलाही !
मानवतेचे अजब मासले । अवलोकानिं हो येती सगळे
धन्य धन्य ही भोजनसंस्था । अल्प लाभ परि तिचा गृहस्था !*

---

*घरांत राहणारा, अर्थात् ज्यास आई, बहीण अथवा असेंच कोणी " दुसरें माणूस " असल्यामुळें खानावळींत कदाचितच जावें लागतें तो.

३०. वासुदेव नारायण फडणीस

[हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. जन्म सन १८९९ मेडिकल स्कूलचा कोर्स घरच्या अडचणीमुळें सोडून द्यावा लागला. त्यानंतर सन १९२३ सालापासून स्वतःच्या बाबजी स्टीम प्रिंटिंग प्रेसची व्यवस्था पाहात आहेत. शिवाय, 'काव्यरत्नावलि' व 'प्रबोधचंद्रिका' साप्ताहिकांचें सहसंपादकत्व यांचेकडेच आहे. यांची अगदीं पहिली कविता 'चिमुकली फौज' ही 'व्यायाम' मासिकांत प्रसिद्ध झाली. त्यानंतर नवयुग, मनोरंजन, चित्रमयजगत्, उद्यान वगैरे मासिकांतून व काव्यकौमुदी, विदर्भ-वीणा वगैरे काव्यसंग्रहांतून यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. गेल्या सालीं कविवर्य रा० बळवंतराव पळशीकर व यांनीं मिळून 'चंद्रशेखर-मंडळ' स्थापन केलें. त्या मंडळाचे हे दुय्यम चिटणीस असून विदर्भ-साहित्य-संघाच्या खानदेश विभागाचे चिटणीस आहेत.]

१. महाराष्ट्रवाङ्मयमहती

वाङ्मय-मुक्ताहारीं ग्रंथ ज्ञानेश्वरी असामान्य
निर्मियला तो ज्यानें बुद्धी त्याची असे असामान्य १
श्रीरामदास यांचा ओजस्वी दासबोध हीरकसा
वाङ्मय भूषवि जर हा कां न म्हणावें तयास हीरकसा ? २
श्रीतुकयाची गाथा सुबोधवचनें सुरत्न जडलेली
पाहुनि वाटे ऐसें कीं ही वाङ्मयवधूच नटलेली ! ३
प्रत्यक्ष श्रीभगवान् खपला ज्याच्या गृहांत सेवकसा
त्या एकनाथ गुरुचा काव्यरसास्वाद हो न सेव्य कसा ? ४
मुक्तेश्वरकृत भारत प्राकृत असलें तरी अहो, त्यांत—
स्निग्ध फुलांसम ज्यांच्या वृत्ती ते रसिक लुब्ध होतात ! ५
कवि मधु सुधेस मानिति परि तीहुनही असे जया गोडी
त्या श्रीमयूरकविच्या कवितेसम आजला अती थोडी ६

वामनपंडित कविचा मान्य असे श्लोक सान-थोरांना
मोरोपंतासम कवि डुलविति काव्या बघूनिया माना ७
दावियलें इतरांना या प्रतिभापूर्ण वाङ्मयाकरवीं
ह्या नररत्नांनीं कीं भारति वसती अनेक दिव्य रवी ८

---

२. दुष्यंतास विज्ञप्ति

आर्यश्रेष्ठा ! अनाथनाथा ! करुणासागर ! भूपाला !
विज्ञप्ती तव चरणीं माझी श्रवण करी मद्वचनाला १
उदारचरिता प्रेमळहृदया कुसुमकोमला शाकुन्तला
तव हृत्सिंहासनराज्ञी ही विस्मरलासी कोवीं हिला? २
निसर्गनिर्मित लतिकेहुनि ही तनू जियेची मनोहरा
स्त्रीरत्नाप्रति ऐशा कैसा टाकिसि करुनी अविचारा ३
मूर्तिमंतसा पवित्रतेचा वास जियेच्या हृदयीं असे
पृथ्वीपति तूं असुनी तिजशीं कपट करावें कसें असें? ४
प्रीति-वेल जी वनीं वाढली तिच्यावरी तूं हा घाला—
घालुनि दुःखित केलें तिचिया निसर्गकोमल हृदयाला ! ५
प्रणयसुधेविण निराधार ती वेल तगावी कशी बरें
स्त्रीचें जगणें नाथावांचुनि जगतीं होतें विफल खरें ! ६
" नितान्त माधुरि सुधेहुनीही हीच्या ओष्ठीं भरलेली
रूपगुणयुता असे तरी ही सदाहि विनयें लवलेली ! ७
हिचा सुधेसम गिरा परिसुनी मदनदूतिका मूक बने
प्रेमरसानें हिनें जिंकिलीं चराचरांचीं पहा मनें ! " ८
ऐसें वर्णन जीचें भूपा ! केलें तेव्हां तूं स्वसुखें
आतां कैसा सिद्ध असा तूं हीतें टाकायास सुखें? ९
मेघा चपला, चंद्रा ज्योत्स्ना जाइल कधिं का त्यजुनि दुरी?
शक्य न जगणें तुजविण हिजला यास्तव घेई हिज पदरीं १०

---

३१. विहारी

[रा० श्रीनिवास नारायण पाटील. जन्म १८९९. तेरदळ, संस्थान सांगली. यांनीं कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्यें दुय्यम शिक्षण पुरें होण्याच्या ऐन संधींत असहकारितेमध्यें शिक्षण सोडलें. हे इ० सन १९१४ पासून वृत्तपत्रांमध्यें बातमी देण्याचें व अल्प-स्वल्प लिहिण्याचें काम करीत. हे हल्लीं संस्थानी राजकारणांत प्रामुख्यानें भाग घेत असून शिवाय वेदान्ताचे विद्यार्थी आहेत. यांचीं 'भावनिनाद' आणि 'भावलहरी' हीं पुस्तकें लवकरच प्रसिद्ध होतील. "आत्म निरीक्षण" नांवानें अर्धें अधिक लिहून झालेलें आत्मचरित्र हे प्रसिद्ध करणार आहेत.]

१. भाव-गीत

प्रेमाचें गीत-स्रवतसे मधु मांगल्यांत.

सुरेल तो सूर-भिने या हृदयीं साचार.
प्रतिध्वनि त्यांत-निनादे विशाल विश्वांत.
अंबरही भरलें-तयाच्या नादें सुखवटलें.
अमूर्त तें गगन-रूप धरि गाणें आयकुन.
चराचरहि नादें-साथ दे त्यांतें आमोदें.
प्रेमानें पवन-उधळितो दिगंतरीं गान.
खुलत्या त्या लहरी-ऐकुनी गाणें मधु भारी.
सर्व शान्त झाले-ऐकण्या प्रेम-पाठ सगळे.
करी शांतता ती-राज्य जणुं तेथें नवरीती.
सुरेल तो सूर-नांदतो प्रेमाचा स्वैर.
ऐकाया पाठ-थाटली सभा सर्व धीट.
उच्छ्वास न उठले-नादब्रह्म एकवटलें.
अवघ्यांही जीवा-समाधी लागे त्या ठाया.
मानवसुरभेद-तिथें नच ऐकुनि तो नाद.
पशुपक्ष्यांनाही-लाधली सहजा स्थिति तेवी.

ताना घेउनिया-मोहवी समाधिस्थ जीवा.
चढला चौफेर-सूर तो; होइ न बेसूर.
अदृश्यीं नटला-घेउनी अणु अणु रूपाला.
भारुनि अवघ्याला-पुनरपी आत्मरूपिं विरला
वृक्ष लता सुमनें-ढाळिती ऐकुनि तें गाणें.
पूजिती अवघ्याला-मीपणीं घालुनियां घाला.
अहह, दृश्य असलें-पहाया कुठें कुणा न मिळे.
केवळ या वसती-निरंतर प्रेमी हृदयान्तीं.

---

२ स्मृतिशेष.

कीर कुठें बाई गेला-मोकळा पिंजरा दिसला ॥ ध्रु०॥
आशेचें भूषण ल्याला
साम्राज्य हृदयिंचें ज्याला
प्रेमामृत अहरह त्याला
केविं आज परि नादवला-कीर कुठें बाई गेला? १
जीवाची करुनी चोरी
निबिड वनीं काय विहारी
वा गगनीं मारि भरारी
न कळे हें कांहीं मजला-कीर कुठें बाई गेला? २
अस्फुटशी ज्याची वाणी
निःश्वासें भुलवी अवनी
मोहवीत मुरलीवाणी,
जन आज तिला अंतरिला-कीर कुठें बाई गेला? ३

---

३. भाव-दृश्य

राहे श्रीहरि अंतरीं म्हणुनि तें अस्तित्व जीवाप्रति
पंचप्राण समाविले तइं पुरे उच्छ्वास हे वाहती;
तत्तेजें भरल्या अमूप हृदया नेत्रीं इथें दर्शन
हेलावे हृदयाब्धि स्पर्शुनि तया या लोचनीं जीवन !

त्याच्या स्पंदानिं गोडशा तनुवरी रोमांच हे खेळती
येथें अक्षरमालिका मुखिं; तिथें सद्भावना लाजती !
आलापे जइं पंचमांत हृदयीं तो या श्रुती डोलती
क्षोभे जो हृदयेश भालफलकीं रेखा किती नाचती !

हो कार्यक्षम जीव श्रीहरि मनीं घेतां समाधिस्थिती
घेई जागर मंदिरीं हरि यदा या लोचनां विस्मृति
लाभे येथ प्रतिकृती, घडतसे अभ्यंतरीं जी कृती,
जीवात्मैक्य विशेष हें दिसतसे नेत्रां नव्या या रिती

ब्रह्माण्डाधिप बैसला हरि असा हृत्पिंडसिंहासनीं
अद्वैतामृत वर्षुनी खुलविली भावाढ्य ही मेदिनी



३२. कुमुद

[श्रीयुत लालजी पेंडसे. जन्म सन १९००. यांचें 'प्रेमबद्ध पराक्रम' हें एक खंडकाव्य प्रसिद्ध आहे. हे लेखनव्यवसाय व समाजसेवा करीत असतात. दादरच्या कविमित्र-मंडळाचे हे सभासद आहेत.]

१. काव्य-निर्मिति

[चाल—हा चंद्र किती साजिरा०]

कविता ग, करावी कशी ? । पुसे आइशीं । सुरुचिरा बाला
तच्छ्रवणें कविच्या मोद मनाला झाला. १

ही माहित नाहीं तुला । कवीची कला । शर्मदे बाले,
स्वस्वरूप तुजला खरेंच नाहीं कळलें ! २

उद्यानीं विहरावया । जासि जेधवां । पाहुनी लतिका
आनंददंग तूं समरस होसी त्यां कां ? ३

खोंविती लता नव तुरा । बिंदिबिजवरा । मधुर सुमनांचा ।
खोंविशी शिराग्रीं गुच्छक तूं पुष्पांचा ! ४

तो लुब्ध अली या फुला । मोहवी भला । झडप जैं घाली
तूं भुक्त दृष्टिनें बघसी गंमत न्यारी ! ५

करुनि ही कृती अभिनवा । पुन्हा या भवा । नेणसी कांहीं
कविताच जगीं या तव रूपें विभु नटवी. ६

चंद्राची रुचिरा प्रभा । तुझी सौरभा । जोडि ही धन्या
कवि-हृदय-निकुंजीं बहर येइ नव सुमनां. ७

प्रभुचीच सुरम्याकृति । काव्यनिर्मिति । श्यामले बाळे !
प्रत्येक कृती तव साक्षात् कवन सुरेलें. ८

२. विखुरली सुमन-माला !

विखुरली सुमन-माला !
कुणि पाप्यानें तिजवरि घातला घाला ! ॥ ध्रु०॥
त्या वनोपवनिंच्या वेली
मोगरी, गुलाब, चमेली
फिरफिरुनि फुलें वेंचिलीं
गुंफितां जीव थकला । विखुरली सुमन-माला ! १
काशि कुठें किती हिंडलें
कांटेहि किती बोचले
वरतुनी मेघ गर्जले
क्षिति मुळिं न वाटली मला । विखुरली सुमन-माला ! २
"आठ" मास वाट पाहिली
जीवास झुरणि लागली
कधिं फुलेल प्रसुनावली
येतां न बहर तो तिला ! । विखुरली सुमन-माला ! ३

---

३. ?

तया स्वातंत्र्य कसलें जो । जगाला भाळला मोहें
मला ना स्वार्थ ना बंधन् । कुणी ना आडवें मजला !
न माता, बंधु, भगिनी वा । पिता, दारा, तनय कोणी
न वांच्छा, भोग, वैभव वा । मला बांधूं शके पाशीं !
जगाचा मोह तो कसला । जगाला त्यागिलें ज्यानें
निसर्गाशीं सदा लीला । करी त्या दुःख तें कसलें ?
जगीं मी धन्य कीं झालों । स्वदेशा देह अर्पुनियां
तयाच्या कारणीं लागो । झिजो वा नाशही पावो !

३३. गजानन गोविंद तानवडे

[जन्म इ० सन १९०१. हे हल्लीं सातारा जिल्ह्यांतील पिंपोडें गांवीं शिक्षक आहेत.]

१. अजिंक्यतारा पाहून—

[शिवशाहीच्या उशाला तिष्ठत असलेला अजिंक्यतारा पाहून कोणास असें वाटणार नाहीं ?]

अजिंक्यतारा म्हणतां हलती हृदयाच्या तारा,
अजिंक्यतारा बघुनी रडतो अजुनी सातारा ।

* * *

महाराष्ट्राच्या विजयश्रीनें हा तारा फुलला !
महाराष्ट्राच्या विभवश्रीनें हा तारा हंसला.
महाराष्ट्राच्या पुण्याईनें पावन हा झाला,
महाराष्ट्रानें अजिंक्य केलें अजिंक्यताऱ्याला !
सह्याद्रीच्या कडेकपारीमधला इतिहास,
पुसा जाउनी ठाउक आहे अजिंक्यताऱ्यास.
या ताऱ्यावर तारा हंसली मराठि नशिबाची,
या ताऱ्यावर सूत्रें हललीं हिंद-स्वराज्याचीं !
आज काय पण सर्वचि गेलें नांव मात्र उरलें,
अजिंक्यपण ! छे ! गतविभवाचें मढें मात्र ठेलें !
ते तट मोठे, बुरुज तयांचे दगडाची छाती,
हाय हाय ! आजला तयांची झाली का माती ?
भग्न राज्यलक्ष्मिचे असले भेसुर अवशेष.
भेसुर दिसती, रडत बोलतो तिथला इतिहास !
अजिंक्यतारा उभा अजुनिही साताऱ्याजवळी.
गत विभवाची स्मृती होउनी अश्रु आज ढाळी!

* * *

अजिंक्यताऱ्या, तुला पाहुनी मम मन बावरतें,
पूर्वस्मृति जीवास जाळिते, काळिज थरथरतें !

---

२. देहाची ढाल

[ज्या नरवीरानें पावनखिंडींत देहाची ढाल करून शिवछत्रपतींचें रक्षण केलें त्या पुरुषश्रेष्ठास हीं स्मृति-सुमनें वाहिलीं आहेत.]

हा ऐक शब्द बाजीचा–कर्तव्य करित मरणार ॥ ध्रु०॥
पुण्याई शिवरायाची–पाठीशीं तिष्ठत होती ।
धर्ममाय महाराष्ट्राची–पाठीशीं झगडत होती ।
विभवश्री रायगडाची–आसपास चमकत होती ।
या अशा दिव्य तेजांत ।
बाजीचा झगडे हात ।
करि समरीं काटाकाट ।
तरि हेंच वदतसे वाचा–'कर्तव्य करित मरणार' । १
शिववाच्या शब्दासाठीं–ही काया न ठेविन मान ।
हिंदवी स्वराज्यासाठीं–हा प्राण करिन कुर्बान ।
देहाचि करुनि तरवार–शत्रूस उभाच चिरीन ।
अस्थींच्या नलिकेमधुन ।
रक्ताच्या बिंदूमधुन ।
नाडि-नसा-धमन्यांतून ।
हा शब्द उठे शूराच्या–'कर्तव्य करित मरणार' । २
देहाची करुनी ढाल–शिवराज-रक्षणा सजला ।
लढण्याची सीमा झाली–शत्रू न पुढें तिळ सरला ।
बाजीच्या पुण्याईचा–तट अडवा अरिला झाला ।
तरवारी बोथट झाल्या ।
बंदुकिच्या गोळ्या थिजल्या ।
अरि-वृत्ती षंढा बनल्या ।
सांगतो तईं सकलांतें–'कर्तव्य करित मरणार' । ३

हा शिवरायाचा वीर।
छातीवर झेलित वार।
रणिं गाजवीत तरवार।
वीरवाक्य घोषित बसला–'कर्तव्य करित मरणार'। ४

व्यक्तीच्या स्वार्थासाठीं–शिवशाहि न जन्मा आली।
जातीच्या स्वार्थासाठीं–ही बोलत नाहीं बोली।
हिंदवी स्वराज्यासाठीं–शिवशाही जन्मा आली।
त्या अलम् स्वराज्यामाजी।
वीर एक झाला बाजी।
पोवाडा गातिल गाजी।
बोलुनी गीत गानांत–'कर्तव्य करित मरणार'। ५

शौर्याची करुनी शर्थ–बाजिराय लढतां पडला।
राष्ट्राचें हें रणक्षेत्र–भूषवीत इतिहासाला।
भूभाग महाराष्ट्राचा–वीरानें पावन केला।
रणतीर्थ महाराष्ट्राचें।
सह्याद्री–शार्दूलाचें।
अजुनीही घुमतें साचें।
त्या वीर-मुखांतिल बोल–'कर्तव्य करित मरणार'। ६

३४. रघुनाथ दत्तात्रेय सरंजामे, बी. ए., एल्एल्. बी.

[जन्म सन १९०२. यांचें उच्च शिक्षण पुण्यास फर्ग्युसन कॉलेजमध्यें झालें हे हल्लीं वऱ्हाडांत उमरावती येथें वकील आहेत. "झिम्मा" या कवितेमुळें महाराष्ट्राचें लक्ष यांचेकडे वेधलें. आधुनिक तरुण कवींत यांनीं चांगला नांवलौकिक मिळविला आहे.]

१. आईवेगळ्या मुलास पाहून—

कुठें खेळाची हौस तुझी भारी?
कुठें हंसण्याची मधुर तव लकेरी?
कुठें हट्टानें गोड तुझें खाणें?
कुठें बागडणें अंगणीं मजेनें? १
कोण हौसेनें न्हाणि तुला आतां?
कोण लाविल हे केश उडूं जातां?
कोण गालातें तीट तुझ्या लावी?
मुका प्रेमानें कोण तुझा घेई? २
तुझे अस्फुट स्वच्छंद मंजु बोल
कौतुकानें ते कोण ऐकणार?
तुझ्या खेळाची रोज नव नवाई
पुरविणारी ती कुठें मायबाई? ३
सांज-काळीं पाहोनि तुज भुकेला
जेवुं घाली बोलोनि गोड बोला,
अशा मायेनें घांस भरविणारी
जिवाभावाची आज कुठें आई? ४
कधीं जेव्हां तुज स्वस्थता नसावी
बाळ-गोळी तुज सांग कुणीं द्यावी?
खंत दुखण्याची कोण सुखें सोशी
कोण रात्रीं जागेल उशापाशीं? ५

तिन्हीसांजा तिकडून घरीं यावें
करीं तुजला त्यांच्याच कीं बघावें,
अशा आशेनें कोण उभी राही
इथें आतां वात्सल्यशून्य गेहीं? ६

तुला आईनें गोड गीत गावें
हस्त-कंकण-रव ज्यांत खुलुनि राहे;
अशा थाटें पाळणा मंद हाले
तुझे यावे मग नीजसरी डोळे; ७

माय नाहीं ती म्हणुनि आज काय
झोंप गेली, आनंद लया जाय?
चढे पांडुरता, दीन वदन झालें
तसे डोळेही खोल किती गेले! ८

" वेळ झाली बघ गाय-वांसरांची,
नको खेळूं वाटेंत " सांगण्याची
कुणा चिंता ती आज विठाबाई?
प्रभो! दीनांची तूंच माय बाई! ९

---

२. मायभूमीची हांक

पहा पहाग, हांक कुणाची कोण उभा दारीं
अपरात्रीचा अवचित आला झोंक शिलेदारी! १

शिवनेरीचा, शिवरायाचा काय हुकुम आला
काय कुण्या किल्ल्यावर चढला शत्रूंचा घाला? २

रायगडावर शिवरायाजी हरिसम वावरतो
सिंहगडावर भगवा झेंडा जोंवर फडफडतो! ३

तोंवर दक्षिण-राज-लक्ष्मिला कोण हात घाली
कुण्या मोगली सरदाराची काळ-दशा आली? ४

गनिम मावळी, बादल-बिजली-चंचल समशेर
तान्हाजीचा सूड उराशीं, आम्ही लढणार ! ५
अफजुल्याचा, खानाचा त्यां काय विसर पडला
धडक् मराठा-सैतानासीं त्राता मग "अल्ला"! ६
सूरतचा सौदागर गोरा, काय फिरंगी तो
खांदेरीची स्मृती बुजाली म्हणुनी फुरफुरतो? ७
सावंतांची विजापुरीं कां लहर पुन्हा फिरली
बीज मराठा अस्सल असुनी मति भ्रष्टुनि गेली ! ८

❀ • ❀ ❀

शिवरायाच्या अवताराचे आम्ही परिवार
शपथ भवानी-मातेची तिळ नाहीं हटणार ! ९
शिवशाहीच्या सौभाग्याचा कुंकुम-तिल लाल
रक्षण त्याचें करण्या देऊं रक्ताचें मोल ! १०
महाराष्ट्राचे चाकर आम्ही वैभव दौलतिचें
दिगंत होण्या इमान अमुचें खड्गाग्रीं नाचे ! ११

❀ ❀ ❀

शिवरायाचा, मायभूमिचा ऐकुनि संदेश
गर्हिवरला यशवंत मराठा सोडि सुखें पाश; १२
अखंड सेवा मायभूमिची परंपरा शूर
शूर मराठे सरदाराची बाला मनधीर ! १३
वीरकुळीं जन्माला आली, वीरकुळीं पडली
जाधव वंशज यशवंताची अर्धांगी झाली. १४
तिचा जिव्हाळा, सुखशयनाला सोडि उभा राहे.
सज्ज समर-जयघोष ऐकण्या समरांगण बाहे १५
या वीराची वीरपत्नि ही यशवंती, डोले
—आनंदानें जैशी कोकिल शुभसमयीं बोलें. १६

❀ ❀ ❀

गोमातेची लाज राखणें, हिंद-जीवनाची
जबाबदारी आर्यस्त्रीच्या मंगलसूत्राची ! १७
म्हणुनि तिचा तो, जिवलग राणा रणांगणीं जातो
शिवबासाठीं, देशासाठीं तिळ तिळ जिव तुटतो ! १८

* * *

सजवी ती मग नाथाला, ते सरनौबत सजले
पट्टा, ढाल, सिल नवाजखाणी कमरेला हाले. १९
लखलखतो जिरिटोप शिरीं किनखापी अंगरखा
सरज्याचा,† उमराव बिनीचा लढणारा बांका. २०
प्रणाम करुनी कुलस्वामिनी देवी अंबेला
जोडीनें मग या दोघांनीं गौरीहर पुजिला. २१
इतुक्यांतचि तो उठे तान्हुला जाधव-कुल-बीज
माय-पित्याला प्रसन्न पाहुनि मावळली नीज ! २२
धांव घेतसे जिरिटोपाला, पितृकरीं विलसे
आनंदानें मंगल कालीं वीरकणी हांसे. २३
अथवा समरांगणीं लढाया पित्यासवें जावें
उत्सुक ऐसा किशोर हरिचा धांव घेत आहे ? २४
दृश्य रुचिर पाहोनि मुकें हें माय मनीं धाली
हातीं पंचारती घेउनी दोघां ओंवाळी. २५

* * *

प्रेमळ स्त्रीच्या सहवासाचें सुख संसाराचें
बंधन मोहक जीवांशाचें अपत्यस्नेहाचें— २६
सोडुनि सारा मायावी हा प्रीतीचा पाश
सदैव जागे कर्तव्याला देशाचा दास ! २७
धन्य दिव्य हें, धन्यचि ललना, धन्य बीज शूर
मायभूमिच्या यशोधनाचें "हिरवे" नरवीर ! २८

* * *

† शिवाजीचा.

टांच देउनी स्वार भरारी, जणु चंचल तीर
रणीं चालला शिवरायाचा आवडता फार ! २९
स्वातंत्र्याच्या प्रसन्न, मंगल, शुभ प्रातःसमयीं
जीव असे निपजले जिथें ती भूमी पुण्यमयी ३०
त्या भूमीला, त्या देशाला, त्या शिवरायांना,
प्रणाम माझा महाराष्ट्राच्या मावळवीरांना ! ३१

॥ हर हर महादेव ॥

---

३. झिम्मा

" झिम्मा खेळूं ये,
झिम्मा नाचूं ये,
आकाशींचे तारेसंगें झिम्मा खेळूं ये "
दुर्दैवाचे प्रेमी जीव
आकाशींचे तारेराव
त्यांचेसंगें स्वैररंगीं—झिम्मा खेळूं ये !
चवथीची चंद्रकोर
हळू चाले सुकुमार
नाचऱ्या या पोरीसंगें—झिम्मा खेळूं ये !
सप्तऋषींमधें सती
वैसलीसे अरुंधती
लाडक्या या आजीसंगें—झिम्मा खेळूं ये !
चांदण्याच्या चंद्रज्योती
हिमगिरी चकाकती
हांसऱ्या या ज्योतीसंगें—झिम्मा खेळूं ये!
काळ्या मेघामार्गें जाऊं
वीज नाचे, पैज लाऊं
लाजऱ्या या पोरीसंगें—झिम्मा खेळूं ये !

अंधारी ही रात्र काळी
कोणी पाहीना मुळींही
एकटीच अंतराळीं–झिम्मा खेळूं ये !
दक्षिणेचा झंझावात
रानफुलें उफाळत
झंझावातीं दोघे रंगूं–झिम्मा खेळूं ये !
पेटे वन चंदनाचें
झोत झाले गगनाचे
ऐशा दिव्य झोतासंगें—झिम्मा खेळूं ये !

❀ ❀ ❀

बोलावूं का साऱ्याजणी
यमुनेचें उडे पाणी
पाण्याच्या या मोत्यासंगें—झिम्मा खेळूं ये !
जाई जुई वेलीखालीं
आकाशींच्या पोरीबाळी
आणि तूं मी एकमेळीं–झिम्मा खेळूं ये !

❀ ❀ ❀

कांहीं केल्या कांहीं कोणी
येथें घरीं येत नाहीं
एकटी कां गात गाणीं–झिम्मा खेळूं ये ?

❀ ❀ ❀

" असो आपुल्या अंगणीं
तुळशीच्या वृंदावनीं
तुझ्या माझ्या प्रीतीसंगें—
झिम्मा खेळूं ये " !

३५. रामकृष्ण वासुदेव कामत

[यांचा जन्म इ० सन १९०२ सालीं झाला. यांच्या कांहीं कविता काव्य-रत्नावलि, मनोरंजन, प्रमोद वगैरे मासिकांत 'श्री' या नांवानें प्रसिद्ध झाल्या आहेत.]

१. त्वरा करीं राधिके, कृष्णजी कुंजवनीं आला !

[भूपाळी]

श्रीकृष्णाचा मंजुल वेणूनाद कर्णीं आला । राधिके । नाद०
त्वरा करीं राधिके, कृष्णजी कुंजवनीं आला ॥ ध्रु० ॥

मध्यरात्रिचा समय शांत, हा चंद्र नभीं चढला ॥ राधिके ॥ चंद्र०
श्रीकृष्णाचा दूत जणूं हा बोलावी मजला ॥ १

शीतांशूपरि फेंकुनि अपुल्या कोमल करजाला ॥ राधिके॥ कोमल०
तप्त करी तनु, दुजा भासतो कृष्णसखा मजला ॥ २

शांत जाहलें विश्व सर्व हें, जल, तरु, खग, सारे ॥ राधिके ॥ जल०
आम्हां परि हें मंजुळ-वेणू-नाद-लुब्ध बनलें ॥ ३

मंद सुगंधित वायू वाहे, शांतवीत तनुला ॥ राधिके ॥ शांत०॥
कृष्णसख्याचें श्वसन खरोखर भासतसे मजला ॥ ४

फुलें कोंवळीं टाकुनि तरुंनीं सुमन-मार्ग रचिला ॥ राधिके ॥सुमन०
सुमनसायकें सुमनशरांनीं प्राण विद्ध केला ॥ ५

निर्मल ज्योत्स्नेमाजी बनली निर्मल ही अवनी ॥ राधिके ॥ निर्मल०॥
निर्मल प्रेमें गाऊं निर्मल कृष्णकथा गानीं ॥ ६

ऊठ झडकरी, चाल राधिके, आळवितो कान्हा ॥राधिके॥ आळ०
विलंब होतां चढेल कोपा वक्र करुनि नयनां ॥ ७

आठवतो ना काल पूर्विचा लटक्या रोषाचा ॥ राधिके॥ लटक्या०
किती कोप तो दाखवि, बाई निष्ठुर तो साचा ॥ ८

पदारविंदीं वंदन करितां सर्व रोष गेला ॥ राधिके ॥ सर्व० ॥
ठावें तुजसी सर्व राधिके, चाल उशिर झाला ॥ ९

ऐक पुन्हा हा संकेताचा मंजुळ ध्वनि आला ॥ राधिके ॥ मंजुळ०
त्वरा करीं राधिके, कृष्णजी कुंजवनीं आला ॥ १०

---

२. अपुरी कविता

[कै० बालकवींच्या अपूर्ण कविता वाचून ही कविता लिहिली आहे.]

अर्पाया कविता प्रियेस विमला माला फुलांची नवी
नानारंग सुगंधयुक्त सुमनें गुंफीत बैसे कवी
एकामागुनि एक शब्द-सुमनें ओंवी सुवृत्तीं गुणीं
'झालें कार्य बहू' म्हणोनि विरमे, संतोष पावे मनीं
घेई पुष्प सुगंधि तो पुनरपी गुंफावयाला करीं
ये कर्णीं सुरदुंदुभी, म्हणुनियां तें कार्य सारी दुरी;
जाया उत्सुक होय जीव बहु तो, माला गळे भूवरी
पुष्पें तीं पडलीं तशींच—पसरे तद्गंध वायूवरी

गेला जीव उडोनि उंच गगनीं तो ऐकतां स्वर्धनी
वेडी ती कविता प्रिया, अजुनिही गेली पहा गुंगुनी
आशा, प्रेम, नवीन वैभव अशा गुंतूनि मोहांतरीं
देवी रंगवि रम्य भाविफलकीं चित्रें किती स्वांतरीं
वायूनें पसरे सुगंध, सुमनें तैशींच चोंहीकडे
माला ती अपुरी धुळींत पडली-कोणीं रचावी पुढें ?

३६. वासुदेवाग्रज

[श्री० मल्हार बाळकृष्ण शिंदे. जन्म १९०२. हे राजाराम कॉलेजमध्यें बी. ए. च्या वर्गांत आहेत. 'हंटर' पत्रांतून यांचें 'संक्रांतीची भेट' हें काव्य प्रसिद्ध झालेलें आहे. यांची वरीच कविता प्रासंगिक आहे. यांनीं 'आर्यपद्यपंचदशी' नामक लिहिलेलें पद्य पुस्तक ना० दादासाहेब करंदीकरांना फार आवडलें. सद्गुरु श्री० बाबासाहेब गर्दे यांनीं इ० सन १९२३ मध्यें यांच्या मस्तकीं कृपेचा वरदहस्त ठेविल्यानें त्यांची भक्तिमार्गाकडे प्रवृत्ति वळली.]

१. श्रीवाग्देवतास्तवन

पंचचामर— अफाट विश्व देखिलें विषण्ण चित्त जाहलें
'अस्ति नास्ति' मी समान या जगांत वाटलें
लहानथोर तारका नभांत शोभती जशा
अनंत बुद्धिवंत मूर्ति दाविती द्युती तशा १

चामर— जी चिदात्मशब्दवृत्ति अंकुरास पावली
तीच तूं सरस्वती प्रशांत मूर्ति माउली
शुद्ध कीर्ति हेंच अंब, शुभ्र वस्त्र नेसुनी
बैसलीस तूं स्वभक्त-चित्त- केकिवाहनीं २

ब्रह्ममोदमंदहास शोभतो तवाननीं
चार वेद हें तुझें कराब्ज वाटतें मनीं
ज्ञानतंत्रि दंड हा स्वकीय हस्तिं घेउनी
मोहिसी परात्परा अतर्क्य कीर्ति गाउनी ३

हें चराचरादि विश्वगोल तूंचि निर्मिले
चालने तुझ्याच ते स्वकीय कर्मिं गुंतले
या अनंत गोलकांत फार सूक्ष्म रेणु जे
सेविती सदा कितीक ते तुझीं पदांबुजें ४

बुद्धिमंत जीव होति ते तुझ्या कृपाबळें
शास्त्रपुस्तकें विनिर्मुनी सुकीर्ति पावले
भूतपंचकास जाणते तसेंच जे बुध
शोध लाविती अनेक ते चमत्कृतिप्रद ५
पाहुनी अतर्क्य कौतुका तुझ्या महामती
स्तब्धबुद्धि होउनी सुविस्मयास पावती
अंब, या अशा त्वदीय कीर्तिलागिं गावया
शक्त मी नसे मुळींच मंद-धी म्हणूनिया ६
व्यास, जैमिनी, तसेच वाल्मिकी महामुनी
पावले सु-कीर्तिला बहू कवित्व गाउनी
ज्ञानदेव, रामदास, भक्तराज तो तुका
एकनाथ, नामदेव मुख्य संतमालिका ७
आर्यभूमिवाटिकेंत ही प्रसूनमालिका
गुंफुनी गळयांत घालुनी करीसि कौतुका
कालिदास, बाण, माघ, हर्ष, दंडि, भारवी,
पुष्पगुच्छ हा त्वदीय मानसासि रंजवी ८
अन्य सत्कवी कितीक जे विदेशिं जन्मले
ते तुझ्या दुज्या विभूषण-स्थलास पावले
यापरी तुझें स्वरूप रेखटूनि हृत्पटीं
शारदे, तुझ्या पदांबुजास घालितों मिठी ९
काजव्यासमान मी, कवीश-तारकागणीं
स्फूर्ति दे सरस्वती मला प्रसन्न होउनी
होतसे पदच्युती तसेच बोल बोबडे
पाहुनी अशा मुलांस पाळणें तुझ्याकडे १०
प्रास, वृत्त, छंदही नको, प्रसाद एकला—
देइ, अंब, हाच छंद लागला असे मला

अज्ञतांबुधींत दीपगेह शारदे, मला
तूंचि होसि, वारि मद्विमोहतांधवृत्तिला ११

'थोर घांस घेइ बाल हा, लहान तन्मुख'
वाटलें तुला असें, तरी करूनि कौतुक
कोड पूरवी बघूनि अंब, भाव नेटका
या गती दुजी तुझ्याविणें नसेचि बालका १२

भक्तहृत्सरोवरीं सदैव तूं मरालिका
क्रीडसी म्हणूनिया कमी न कांहिं बालका
प्रेमयुक्त दास वारि हा सदा झरा झरा
मस्तकीं तुझ्या स्वकल्पना तरंगचामरा १३

३७. बळवंत हणमंत पळशीकर, बी.ए., एल्एल्.बी.

[देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. जन्म सन १९०२. सन १९१८ सालीं 'कोकिलेस' ही कविता 'उद्यान' मासिकांत पहिल्यानेंच प्रसिद्ध झाली. ती कै० गोविंदाग्रजांना फारच आवडली. तेव्हांपासून आजपर्यंत 'रत्नाकर', 'मनोरंजन', 'विस्तार', 'यशवन्त', 'काव्यरत्नावलि' इ० नियतकालिकांतून कविता येत आहेत. गतवर्षी रा० वासुदेवराव फडणीस यांच्या साहाय्यानें ती० स्व० नानासाहेब फडणीस, काव्यरत्नावलीचे तपोवृद्ध संपादक, यांच्या अध्यक्षतेखालीं 'चंद्रशेखर मंडळ' काढलें असून त्याचे हे मुख्य चिटणीस आहेत. 'वृंदावन' या खंडकाव्याचें लेखन सुरू असून लौकरच तें पुरें होईल असें वाटतें. कांहीं वाङ्मयात्मक गद्य लेख व गोष्टीही मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.]

१. वात्सल्य

" अशोकाच्या झाडावर
कोण गाई गोड गीत "
झोंपवाया बाळ तान्हा
माता गाई आंगणांत. १

बुलबुल बोले बोल
" तान्हुल्याला काय देऊं ? "
" तुझ्या कंठांतील गूज
बाळा पढवी तूं आज " २

कळया फुलें नाचवीत
स्वच्छंद तो येता वारा
माय बोले " समीरणा !
नुक्ता झोंपला रे कान्हा " ३

चुंबुनिया त्यास हळू
वारा कुजबूज करी—

विस्कटीतो केश त्याचे
शोभा पाही मग खरी ४
रूप पाहुनी तें माय
हृदयाशीं बाळ धरी
वात्सल्य हें पाहायाला
चंद्र उभा डोक्यावरी ५

---

२. एक प्रश्न

प्रेमलतेच्या दोन कळ्या
होत्या आजवरी निजल्या
वसंत आले किती तरी
परी न फुलल्या आजवरी
उदासवाणी
मुकींच गाणीं
म्हटलीं त्यांनीं
'मुक्या मनाची मिताक्षरी!
होती त्यांची खरीखुरी! १
तऱ्हेतऱ्हेचीं फुलें किती
सभोंवतालीं हीं फुलती
इंद्रधनूची नव कांती
रंगविती धरणीवरती
वाऱ्यावरती
डोल डोलती
रंगुनि चित्तीं
रंग उधळिती परोपरी
कलिकाद्वय नच फुले तरी! २

वसंत ये परि प्रणयाचा
आज गडे अवचित साचा
जादूचा कर तो त्याचा
जॉ न लागला नवलाचा
निमिषीं खुलल्या
खुलुन लाजल्या
लाजत हंसल्या
हंसऱ्या तैशा सदा कळ्या
राहतील का फुललेल्या ? ३

---

२. शारदा-सूक्त

विश्वमोहिनी हंसवाहिनी निजजनवरदायिनी
प्रणाम पहिला त्वत्पदकमलां अमृतनिस्यंदिनी १
देविं शारदे ! विश्वकदंबे ! अद्वय चिन्मंगले !
श्रुति-स्मृतींनीं आदि जननि तूं म्हणुनी तुज वंदिलें ! २
अव्यक्तांतें व्यक्त करिसि तूं या अवकाशान्तरीं
अगाध तव महिमान, विधाता तुझी न पावे सरी ३
दिव्य वैखरी पालविसी तूं भुवनीं सुरसुंदरी
यथार्थ कवनीं तुला वर्णिती कविजन वागीश्वरी ४
सारस्वत तव पिके पाउलीं जयशाली माउली
वाङ्मय मिरवी तव कृपेची अनंत बिरुदावली ५
उषा अभिनवा प्रतिप्रभातीं नटते नीलांबरीं
निराकारिणी तेवि विहरसी भुवनीं हृदयेश्वरी ६
प्रतिभारूपें दाविसि जेव्हां स्वरूप तूं सुंदर
शरत्प्रभेची शोभा तेव्हां विलसे वदनावर ७
चैतन्याची चारु चित्कला दिससी गुणशालिनी
क्षणैक तळपे कृष्णघनान्तरिं जैसी सौदामिनी ८

अनंत तेजोवलयें निर्मिति नयनें तव चंचल
नवरस पैंजण पायीं तुझिया रुमझुमती मंजुल ९
कोवळीक तव पहा लाजवी शिरीषपुष्पाग्रती
रंगमाधुरी दिपवी सुंदर सुरेशभवनास ती १०
ॐकाराचा मनोहारिणी वीणा धरिसी करीं
सौंदर्याची असंसि एकली निरुपम भूषा खरी ११
परी नटविती परोपरींनीं तुजला वाग्देवते
अनर्घ्य रत्नाभरणीं प्रतिभाशाली कविसन्मते ! १२
उदारचरिते ! महन्मंगले ! भक्तवत्सले ! तुला
हिमकण प्रेमें तुला वाहिले क्षमा करी याजला. १३
अमरत्वाचें ध्रुवपद भक्तां लसत्सरसिजानने
अर्पुनि करिसी या विश्वाची अमोल मणिभूषणें १४
नको मला तो मान परी तूं करांगुली कोमल
हृद्वीणेवरि फिरवुनि रिझवी अविरत भूमंडल. १५

---

४. तारकेस

हृदयमोहिनी
मोददायिनी
नाचत चंचल येसि गडे ! १
नवं तेजोन्वित
किरणें फेंकित
विश्वा नूतन रंग चढे २
तूं स्वर्गाची
नंदनवनिंची
असली शोभा खरीखुरी ३
रजनी देवी
म्हणुनि तुला ही
जपते इतुकी परोपरी ! ४
निळ्या नभावर
तव मार्गावर
तिनें उधळिलीं पहा फुलें ५
शशितेजाचें
जरतारीचें
निशाण पुढती रोंवियलें ! ६
मेघांवरतीं
जडवुन मोतीं
शेज गुंफिते तव रजनी ७
वात्सल्याचें
मांगल्याचें
गीत गातसे ती वदनीं ८

त्या गीताचे
सूर तियेचे
वातावरणीं जों घुमले ९
पूर्वस्मृतिचे
सुगंध साचे
मनोमंदिरीं दरवळले १०
निशादेविचा
धवल कान्तिचा
पदर धरोनी चंदेरी ११
क्षितिजावरतीं
तव सांगातीं
मीहि विहरलों परोपरी ! १२
वेंचुनि आपण
काळोखांतुन
नक्षत्रांचे दिव्य मणी १३
स्वर्गगेच्या
अक्षयतेच्या
सूत्रीं दिधले गुंफोनी १४
फेनपुंज जे
जमले ताजे
त्याच फुलांचे तुज झेले १५
मेघांमागें
लपतां रागें
रिझवाया ते किती दिले ! १६

नंदनवनिंच्या
ध्रुवद्रुमाच्या
शाखेवरतीं हिंदोला १७
सप्तर्षींचा
किती मजेचा
फिरला गरगर गे अपुला १८
शान्तिरसाची
मूक रवाची
अद्भुत वीणा वाजवुनी १९
मधुर गुलाबी
भावतरंगीं
गुंगविली सारी अवनी २०
पूर्वेवरले
विकसित झाले
कोष जेधवां अरुणाचे २१
घेउनिया ते
अपुल्या हातें
वदन उजळिलें तिमिराचें २२
तोंच जाहला
वियोग अपुला
कारण परि तें मज न कळे २३
तेव्हांपासुन
तुझियावांचुन
स्नेहाविण मी दीप जळे ! २४

३८. किशोर

[श्री० शंकरराव बळववंतराव चव्हाण, बी. ए. जन्मः १९०३, कोल्हापूर संस्थानापैकीं जांभळीं हें कवींचें स्थायिक गांव. स्वराज्यानंतर हातची तरवार गेली आणि नांगर धरावा लागला. नांगर सोडून हातीं लेखणी धरणारे यांच्या वंशांत हेंच पहिले होत! कवींच्या मातुलाच्या साहाय्यानें बी. ए.पर्यंत शिक्षण झालें. हल्लीं ते कोल्हापूर दरबारांत वरिष्ठ प्रतीचे नोकर आहेत. मागील वर्षीं यांचा 'काव्यकिशोरी' नामक काव्य संग्रह प्रसिद्ध झाला.]

१. लावण्यकलिके!

लावण्याच्या स्वर्गसंपदे, मोहनमुग्धे कलिके!
अशी साजिरी कुठें मूर्ति तव वाऱ्यावर ही झुके? ॥ ध्रु०॥
तव सुविरचिल्या कुंतलिं विचरे भांगाचा हा फणी
भव्य भालिची फणा पसरुनी दावी कुंकुम-मणी
लाल अमोलिक वदनमंडळा किती शोभवी तरी!
कुणया जिवाचें उजळणार हा महद्भाग्य सुंदरी?
अभिमानें ज्यातें सदा वानिसी मनीं
तव कवण असा या लाल मण्याचा धनी?
मज सुभाग्य त्याचें गमतें इंद्राहुनी!
हेवा वाटे मनीं राजसे! प्रीतियोग-साधिके!
अशी साजिरी कुठें मूर्ति तव वाऱ्यावर ही झुके? १
सहज ओळती भुरके कुरळे कुंतल गालावरी
सलज्ज मखरीं फुलवंती जशि मधु मुख शोभा धरी!
सैल बांधिलया बुचड्यावरतीं विलसे सुमनावली,
मेघावर जशि इंद्रधनूची शोभा ही राजली!
कचभार घनांतरिं भांग, न, बिजली गमे!
मुख सराग वळता इकडे तिकडे क्रमें
किति नेम सुंदरा कुंतलिं ती चमचमे!

कुण्या कुंजवनिं कृष्ण शोधिसी दडला का राधिके !
अशी साजिरी कुठें मूर्ति तव वाऱ्यावर ही झुके ? २
लाल कुसुंबी मधुर अधर तव वदनपुष्प पाकळ्या
हास्योन्मीलित पावुन दाविती रदन-दवा आंतल्या !
हंसतां संध्यारम्य घनांचें अधर-वलय शोभते;
नक्षत्रांचें विश्वविभवमुखिं कृष्णासम दावितें !
तूं सांध्य देवता गमासि तशी कामिनी
स्मित मुखीं विलसतां अधर विलग पावुनी
उघडिसी संपदा-सुदंत-मुक्तामणी !
दिव्यशोभने ! सुरुचिर वदने ! कवण हृदयतारके !
अशी साजिरी कुठें मूर्ति तव वाऱ्यावर ही झुके ? ३
हिरव्या भरणीं नटुन चालतां गमसी मज सुंदरी।
गर्द हिरवळींतून जातशी प्रीतिसुधेची झरी !
सुरम्य निर्मल दिव्य झरीच्या कपोलसैकत-तिरीं
गोड विलसती दोन खळ्या या भरुनी नव माधुरी !
जणुं मूर्त दाटले प्रीतिसुधेचे झरे
नवजीवन द्याया तयीं सुधा पाझरे !
त्या पायीं प्रणयी कवण जीव परि झुरे !
प्राशिल ओष्ठें सुधा अशी कीं, भाग्य कुणाचें निकें ?
अशी साजिरी कुठें मूर्ति तव वाऱ्यावर ही झुके ! ४
पैठणि शालू हिरवा नेसुन अशी चालतां जनीं
किती लाजुनी घेसी भरजरि पदर ओढओढुनी !
वदन तयें क्षण दिसतें लपतें अभिनव शोभा खरी !
हिरव्या पानाआडिल सुम जणुं पवनें केली करी !
तव दर्शन लोलुप पथिक-भृंग हे किती
हे खिळले या सह-सौरभ सुमनांप्रती !
ओढणी लाविली जिवा किती ना मिती !
कृतार्थ जीवन परी कुणाचें होइल वद मदनिके !
अशी साजिरी कुठें मूर्ति तव वाऱ्यावर ही झुके ! ५

मोहन यौवन ! फुल्ल तनूची पुष्करिणी रसभरें !
तींत विकसले वुंद गेंद, छे ! कमल मुकुल साजिरे !
तिष्ठत बसले मधु सेवाया भृंग दोन त्यावरी;
तृष्णोत्कंठा कधीं पयोधर वारणार हे तरी !

कीं प्रणयि युगुल हें देहाच्या मंचकीं
पहुडलें; गांठिली वरी तंग कंचुकी
छे ! नासिक-शुक हा उभवी निज चंचु कीं
हिरव्या पदराखालीं लपल्या दों डाळिंब-भ्रमें !
झुके साजिरी कुठें मूर्ति तव वाऱ्यावर ही रमे ! ६

क्षितिजावरतीं ठळक चांदण्या दोन दिशेला जशा
मधु तेजाळा कुड्या चमकती मनोज्ञ श्रवणीं तशा !
नासिकिं कलत्या चमकीवरची हिरकणि आकर्षका
लुकलुकते जणुं गगनीं तेजें रुचिर शुक्रतारका !

वरि सहास्य बघतां रमण-हृदय चांदणी !
तूं शीत सुगंधित गमसि रातचांदणी !
—मिळणार कुणा हें दिव्य विभव आंदणीं ?
तूं स्वर्गींची मूर्त चारुता शुचिता ताशि बालिके !
अशी साजिरी कुठें मूर्ति तव वाऱ्यावर ही झुके ! ७

नार-कपोलीं गुलाबलाली बघती जन कौतुकें !
पादतलींही तुझ्या राजली अपूर्व परि सारिके !
रम्य रक्तिमा तसा शरीरीं ठायीं ठायीं चढे
रंगविनोदीं जणूं उडविले गुलाल गोटे गडे !
तव दों पदतल हे वरित किती रक्तिमा !
जणुं गमसि पाहतां फेकित अपुली कमा—
अरुण बिंबावरी उभी उषा सत्तमा !
सौंदर्याच्या सारसंपदे ! हृदय-राग-रंजिके !
अशी साजिरी कुठें मूर्ति तव वाऱ्यावर ही झुके ! ८

बहुविध कलिकाभारें लवली गमे तुझी तनुलता !
शालिन्याची मुग्ध चातकी मधुर दृष्टि तशि नता !
रदन-कुंद हे हारीं, गुलाबकलिका खालीं वरी !
चाफेकळि नासिका पोशिली सुरसें लोचन-सरीं
या डोलत वक्षीं कमल कळया आमुदीं !
या नखाग्रिच्याही सुरक्त कालिका पदीं !
छे ! मूर्तच्च कालिका गमसी तूं, परि कधीं—
कळी खुलुन तव होसि फुलवती ? प्रियतम कस्तूरिके !
अशी साजिरी कुठें मूर्ति तव वाऱ्यावर ही झुके ! ९

---

२. कापसाचें शेत

कापसाचें शेत माझें हो फुलोनी शुभ्र सारें,
वाटती हे कीं नभींचे खालिं आले सर्व तारे !
हेच आम्हां होत लोकीं दौलतीचे दिव्य ठेवे;
याविना तेजाळ मोतीं वा हिरे ते काय व्हावे ! १
फुल्ल झालया कापसाच्या या अशा शेतांतुनी जी,
हिंडतांना साभिमानें कल्पना हो गुंग माझी !
भासते कीं, चालतोंसें तारकामेळ्यांतुनी या
जेविं चाले अंबरींचा हांसरा तो चंद्रराया ! २
फुल्ल झालें शेत ऐसें डोलतांना मंद वातें
हा जणूं हेलावतो क्षीरोदधी कीं मूर्त वाटे !
खोप माथीं त्यांत शोभे, मेढ मागें टेंकण्यासी
शेषशायी विष्णु जेवीं शोभतो कीं या निवासीं ! ३
ये उषादेवी शुभांगी रंगुनी कीं सुप्रभातीं,
आणि हर्षें वेंचुनीया तारकांचे नेइ मोतीं !
तेविं माझी येउनी शेतावरी ती प्रीत राणी
वेचुनी आणील सारें पीक गेहा गात गाणीं ! ४

मूर्त ऐशी संपदा स्वर्गीय नेमें येत गेहीं,
आणि माझी हृत्सखी ती हर्षुनी वेडीच होई !
येइ भावें एक लक्ष्मी कीं दुजीतें भेटण्या ही !
हेंच सालोसाल देवा, मागणें ना अन्य कांहीं ! ५

३. तारापतन.

होतें खेळत रम्योद्यानीं प्रेमीद्वय जगतीं;
गेला टाकुन पति परि येतां कठोर दैवगती !
नाथास्तव मग भिरभिर हिंडे वनीं जनीं बाला !
प्राणविसावा परि न कसा तो दृष्टि मुळीं पडला !
विरहव्याकुला हताश बाला होउन त्या कालीं
नाथास्तव मग वेडावूनी हाय ! पुरी गेली !
वाटे तिजला वेडामाजी पाहुन परि यावा
स्वर्गीं जाउन एकवार तो जीवींचा ठेवा.
हरप्रयत्नें तारायें म्हणुन नभीं चढुन
हळु हळु फिरवी सभोंवार निज लुकलुकते नयन !
सखा जिवाचा परि न तिथेंही दृष्टिपथीं आला !
नैराश्यें तों खिन्न सुन्न अति जीव तिचा झाला !
वियोगिनी मग पति शोधाया उडी अशी घाली,
अहा ! पुनरपी पद्मा पहा ही आतां पाताळीं !
हाय ! परी ती दुष्ट जगाची लागुन तोंच झळ
राख होउनी मधेंच पडली तारा तेजाळ !

* * *

दैव अरेरे ! असें साधुनी दुस्मानी दावा
हतभागी जन कुठेंहि जावो करि पाठपुरावा ! !

३९. कुसुमाकर

[श्री० वसंत कृष्ण हेवळे. जन्म सन १९०३. यांचें प्रवेशपरीक्षेपर्यंतचें शिक्षण नाशकास होऊन पुढील शिक्षण जोधपूर व मुंबई येथें झालें. ते मुंबई विश्वविद्यालयाचे बी. एस्सी. आहेत. ते हल्लीं मुंबईस असतात. त्यांची कविता प्रामुख्यानें प्रफुल्लता, प्रमोद व सुमन या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाली आहे.]

१. महाराष्ट्रशारदेस —

[अभंग]

येतां सायंकाळीं । रजनी माउली
विश्वें उघळिलीं । तारापुष्पें ! १
तैशी प्रातःकाळीं । उषा ये हांसरी
निसर्ग उधळी । पुष्पराशी ! २
दिव्य तीं सुमनें । प्रेमें तुज देणें
इच्छिलें कवीनें । होणें कैसें ? ३
पुष्पांची अंजली । रानीं गोळा केली
आतां तुजवरी । उधळीतों ! ४
रंगरूप नाहीं । वासही न कांहीं
परि प्रीतीपायीं । गोड होवो ! ५

---

२. फूलपांखरें !

[शार्दूलविक्रीडित]

— १ —

आई ! बागडतीं फुलांवर पहा हीं पांखरें गोजिरीं
जातों त्यां धरण्यास तोंच उडुनी जातीं किती सत्वरी !

स्वच्छंदें मजला फुलांमधुनिया त्यांच्यासवें खेळणें
आई ! आवडतें, तसेंच मजला बागेंत कीं राहणें

— २ —

रात्रीं गोड फुलें नभांत फुलतीं–येतीं न तीं मोजण्या
जातीं ना फुलपांखरें परि कशीं त्यांच्यासवें खेळण्या ?
होवोनी फुलपांखरूं, वद मला, कां मीच जाऊं वरी ?
—अश्रू हे परि पूस !—सोडुनि तुला जाणार नाहीं दुरी !

---

३. काव्यमय सृष्टि !

[सुनीत]

ईशा ! त्वां गगनीं किती विखुरल्या नक्षत्र-गीतावलि
सृष्टी ज्या अवलोकुनी प्रतिनिशीं केव्हांहि ना भागली !
काव्यें दोन महा तशीं विरचलीं कीं " सूर्य " " तारापती "
'आम्ही कोण कवी ?–कविश्वर खरा तूं एक !' हें दाविती.
तैशीं नित्य नवीं अनेकविध हीं मेघांबरीं गोडशीं
गीतें कीं–न कळे–असंख्य गगनीं चित्रेंच रेखाटिशी !
हीं उत्तुंग प्रचंड शैलशिखरें स्वर्गांत डोकावती
वृक्षश्रेणि, तरंगिणी–सुकवनें त्याभोंवतीं डोलती !!
पुष्पें बालक-बालिका मधुर हीं काव्यें तुझीं भासती
संसारा खुलवावयाच रचिलीं कीं चालतीं बोलतीं
बुद्ध, ख्रिस्त, परोपकार–रत जे, गांधी महात्मे असे
त्यांच्या जीवनिं तेंवि दिव्य गमतें संगीत तूझें वसे !!
सृष्टी काव्यमया दिसे चहुंकडे जी मोहवी मन्मना
माझें जीवन हेंहि काव्य करणें ईशा ! तुला प्रार्थना

४०. पं. मा. कामतकर, बी. ए.

[जन्म १९०५. यांच्या कविता मनोरंजन, काव्य-रत्नावली इ० मासिकांतून येत असतात. हल्लीं हे दुसऱ्या एल्एल्. बी.च्या परीक्षेची तयारी करीत आहेत. यांनीं पुष्कळसे विनोदी गद्य लेख लिहिले आहेत.]

१. जा सगळें विसरून

प्रेमले, जा सगळें विसरून । जा सगळें विसरून !
ढगाआडचें ऊन कोवळें
गेलें हाय पळून । प्रेमले, जा सगळें विसरून !
मुग्ध मनानें चित्र रेखिलें
गेला रंग उडून । प्रेमले, जा सगळें विसरून !
गातां गातां मोदभरानें
गेली तार तुटून । प्रेमले, जा सगळें विसरून !
जागेपणचें स्वप्न गोड तें
चित्तीं जाय विरून । प्रेमले, जा सगळें विसरून !
आस लावुनी वाढविलेली
गेली वेल सुकून । प्रेमले, जा सगळें विसरून !

* * *

ऐक गडे, एकदां स्मरोनी
जा मग मज विसरून । प्रेमले, जा सगळें विसरून !

---

२. निवेदन

वाटे तो सहवास सौख्यद तुझा चंद्राहुनी शीतळ
संसारांतिल यातना विसरवी सान्निध्य तें केवळ.
भाग्याचा दिन आठवे प्रथम मीं तूंतें जधीं देखिलें
दृष्टिक्षेप करोनि मंगल तुवां दीनास उद्धारिलें.

झाली ओळख आपुली मग कशी एकाहि बोलाविना
त्याचें गूढ मला निरंतर पडे; तैसेंच कां त्वन्मना ?
त्वन्नेत्रीं नव हर्ष जो विहरला जी खेळली मोहिनी
त्या योगें मम चित्त तूं हरुनिया नेलेंस ना साजणी ?

जे जे भाव तुझ्या मनीं विहरले, अस्ताप्रती पावले
ते ते सर्व सखे, निरागस तुझ्या दृष्टींत मीं वाचिले
विश्वाचें मधु चित्र मोहक तुझ्या नेत्रांतुनी पाहिलें
माझें एकच सौख्य सुंदर तुझ्या नेत्रांत सामावलें !

तेजाच्या कणिका जधीं विखुरल्या नेत्रांतुनी आपुल्या
तेव्हां सौख्यद सर्व विश्व गमलें आशा मनीं रंगल्या !
माझें चित्त सखे, तुला उमगलें; मीं जाणिलेंही तुझें
नाहीं धीर अजून होत विमले, बोलावया स्पष्ट तें !

४१. विनायक सदाशिव सुखटणकर

[हे प्रसिद्ध गोमांतकस्थ कवि आहेत. यांच्या स्फुट कविता व गोष्टी मासिकांतून येत असतात. यांनीं गेल्या वर्षीं 'वासंती' नामक मुलासाठीं काव्य-संग्रह संपादन प्रसिद्ध केला आहे. शिवाय 'गोमांतकांतील गीतें' लवकरच प्रसिद्ध करणार आहेत. प्रख्यात 'देवदासी' चित्रपटाचे हेच लेखक आहेत.]

१. पुष्पविकसन करी प्रभो !

नभीं दृष्टि खिळवोनी। भावें विनम्र होवोनी।
कुणा आळवते मनीं। लता इथें ? ॥
अहर्निशा प्रार्थुनियां। त्या अंबरींच्या राया।
ध्यास धरी मिळवाया। काय सांगा ? ॥
चारुं पर्णांपल्लवांनीं। किसलय तंतु यांनीं।
असे तनु सुशोभूनी ! सारी तिची ! ॥
आप्तबंधु आसमंतीं। नाना तरु ते वेष्टिती।
सुख देती व रक्षिती। सदा तिज ॥
वायु गाई गीतावली। स्वर्ण रविकर ल्याली।
फुलपांखरांसी केलि। ऐशीं सुखें ॥
दैवें जरी तिज प्राप्त। तरी राही असंतुष्ट।
काय दुजें सुख श्रेष्ठ। वांछीतसे ? ॥
" मेघवाहना कृपाळा। सिंचुनीयां झणीं जळा।
करीं माझ्या जीविताला। कृतकृत्य ! ॥
क्षुद्र सुखें सारीं दुजीं। तुच्छ मज प्राप्त जीं जीं ! ।
परी तळमळ माझी। एकासाठीं ! ॥
मदंतरीं राहे सुप्त। मज अदृष्ट, अज्ञात।
पुष्प; करोनी स्फुरित। दावीं मज ! ॥
जरि पुष्प नुमलें। या डोळां ना दिसलें, ।
तरि जीवित नासलें। साच माझें ! ॥

तुझ्या जलधारांविण। आयुर्हेतु तो गांठून।
श्रेष्ठसुख मिळविन। कैसें देवा?" ॥
ऐशी करोनी प्रार्थना। सदा भाकोनी करुणा।
करी दयार्द्र वरुणा। लता जधीं ॥
जलधारा नभांतून। मग विपुल वर्षून।
श्रेष्ठ मनोरथ पूर्ण। होई तिचा! ॥
तिचें पुष्प प्रगटून। दैवी गंधा पसरून।
टाकी वनीं त्या मोहून। चराचरां ॥
हृद्पुष्पासी पाहून। जणुं ब्रह्मानंदीं लीन।
मग्न सौख्यीं चिरंतन!। नाचे लता! ॥

❀ ❀ ❀

हृद्पुष्पाचा विकास,। लतेपरी एक ध्यास!।
सुखें सारीं दुर्जीं भास। वाटे मज! ॥
परी जाईं मी भागून। अजचरी अळवून।
किती होसी बा निर्घृण। परमेशा? ॥
तव कृपाधारांविण। आत्मपुष्पविकसन।
कैसें येईल घडोन। सांग प्रभो? ॥
त्यांचें सिंचन मजला। देईं देईं रे वत्सला।
बघसी अंत कासयाला। लेंकराचा? ॥

---

२. बार्डोली-विजयाचा सुवर्ण-दिन

[६ ऑगस्ट १९२८]

["—हिंदुस्थानांतील गरीब शेतकरी म्हणजे हिंदी राष्ट्राचे पायच होत!"]

—स्वामी रामतीर्थ.

माते, तूं अपुल्या अधिष्ठित सुखें होतीस ज्या मंदिरीं
त्याची फांकलि हेमदीप्ति जधिं त्या कंगाल द्वीपांतरीं

लोभें तेथुन लीन दीन अतिथी द्वारीं तुझ्या पातले
भोळी तूं—फसवूनिया तुज पुढें स्वामी तुझे जाहले !
भाग्यस्थान तुझें हिरावुनि निकें, तेथून ओढूनियां
देती लोटुनि तूज घोर विपिनीं दुर्भोग भोगावया
तेथें ते तव ऐंद्रजालकृतिनीं बुद्धि, स्मृति भ्रंशिती
कायाही करिती पुरी तदुपरी दुःशृंखलाबद्ध ती !
'दादा' ज्येष्ठ तुझा सुपुत्र परि ये धांवोनि कालान्तरीं
त्वत्सेवारत होइ भ्रांतिपटला वारी तुझ्या सत्वरीं
येती पुत्र तसे महाशय दुजे 'गोपाळ' 'बाळा' परी
कांहीं छेदुनि बंध, आणिति तुला ते चेतना नंतरी !
घेई त्वत्पद तो पुढें स्वहृदयीं त्वत्पुत्र 'सत्याग्रही'
तोडाया पदशृंखला प्रगमना जी तूज ये आडवी
सांगे आज अहा ! सुवर्णादिन हा, " ती तूटली शृंखला ! "
माते, आक्रम सौख्यधामपथ तूं आतां जवें आपुला !

४२. शांताबाई हेबळीकर

[या कवयित्रीचा जन्म इतिहासप्रसिद्ध विंचुरकर घराण्यांत झाला. वैधव्याची आपत्ति यांचेवर बालवयांत आली. तेव्हांपासून ईश्वरभक्तींत काळ घालवीत आहेत. यांच्या कांहीं कविता 'त्रिदल' काव्यसंग्रहांत आलेल्या आहेत. यांच्या बहुतेक कविता भक्तिपरच आहेत.]

१. तुझी कृपा म्हणजेच सुख

[द्रुतविलंबित]

तुजकडेच विभो ! मन धांवतें
सुख कशांत मला नच वाटतें
सतत चिंतन हें हृदयीं तुझें
मज न याविण कांहिं कळे दुजें
जपुनियां तनुला जरि पोशिलें
घृतपयादिक पौष्टिक भक्षिलें
मिरविली करुनी तनु पुष्ट ही
नच गमे मजला सुख अल्पही
निशिदिनीं वसनें जरिचीं तरी
विविध वापरलीं किति मीं तरी
तनुस शोभविण्या बरिं भूषणें
तव कृपेविण सर्व परी उणें
सु-गज वा हय वा रथ यांवरी
बसुनि मी फिरलें कितिही तरी
मिळविली जनिं थोरवि मीं जरी
तरिहि सार्थकता न मना वरी
तनुस भस्म सु-शुभ्रहि चर्चिलें
श्रवणिं, कंठिं, शिरीं मणि बांधिले

व्रत-उपोषणही नियमादरें
तरि अहर्निश चित्त कसें झुरें?
कितिक योग-विशिष्ट तपांतरीं
तनुस कष्टविलें बहुतांपरी
सकल तीर्थजलें अवगाहिलीं
तरिहि शान्ति मना नच लाभली
निरखुनी सकला सुख-संपदा
हृदयवृत्ति विचित्रचि हो तदा
तव न दर्शन जोंवरि हो नरा
भ्रमण जीव करी सुख ना जरा
सुकृत थोर म्हणोनिच लाभली
तव कृपा सदया, मजला भली
तुजविणें मज आश्रय बा, नसे
व्यसनपार करी न कुणी कसें!

---

२. वेणु-नाद

[शार्दूलविक्रीडित]

प्रीतीचा तव वेणु-नाद पडुं दे कर्णांवरी राजसा!
मोहीं गाउनि सुस्वरें विनवितें बन्सीधरा! मानसा।
स्वर्गींचा मधु सौख्य-सिंधु सखया! लोटून दे भूवरी
ही संपेल निशा हृदन्तरिं, शिरे प्रेमांशु तो नंतरी॥
सृष्टि प्रेममयी बनेल अवघी वेडावुनी हर्षुनी
प्रेमाचे स्वर छेडि कुंजवनिं तूं प्रीतीजलें न्हाउनी।
ओष्टीं वेणु धरीं, अधीर बनले-झाली पुरी वंचना!
प्रेमाची मम पूर्ण आस घडतां, पर्वा कुणाची मना॥

४३. दिनकर विनायक देव

[जन्म सन १९०२. यांच्या कविता काव्यरत्नावलि, रसवंती, आनंद, ज्ञान-प्रकाश वगैरे ठिकाणीं "कवि सखा" या नांवानें प्रसिद्ध झाल्या आहेत. हे भोरचे रहिवासी आहेत.]

१. पौर्णिमेचा चंद्र

मंद समीरण
करीत गुंजन
सुखवी तनमन
संधिकालच्या छटा विखुरल्या चोहिंकडे गगनांत!

टेकडीवरी
प्रशांत भारी
निःशब्द दरी
फक्त वासरूं चुकलें रानीं करि हंबारव एक.

तों पूर्वेला
चंद्र उदेला
फुलला झेला
बालमनांच्या आनंदाचें व्यक्त रूप दिसलें!

माझे लोचन
स्फुरति विलोभन
कांचनमय घन
उतावळीनें उठून वाटे कवळावें हस्तांनीं!

रजनी नारी
तिलकपिंजरी
रेखुनि भाळीं
चार चांदण्या, निधे महालीं चांदीच्या तबकांत!

विलास मधुतर
विकसे रतिभर
उणा न रति-भर
दगडांमधुनी फुलें उमलतीं बाग फुले विश्वांत !

ढगाढगावरि
तेज रुपेरी
सांडे भूवरि
कौमुदिचे हे लोट टाकिती वाटे विश्व भरून !

ही हिमकांती
दे एकांतीं
हृदया शांती
नखलुनि नाना दुःखें निघतीं नाजुक शीत करें !

---

२. रांगोळी विकणारीस—

रांगोळी ही नको तुझी गे, होइ चालती इथून
गेले कानहि माझे किटून ॥ ध्रु० ॥
कठोर कर्कश अवाज भरला साऱ्या पेठेमधून
इमारति पडती कीं ढासळून ?
कानाचे अन् सुजाण मोठे भ्याले तुजला बघून.
घालती बोटें कानांमधून.
काय तुला ठाउकें, निघालया शाळा बहिरे-मुके
शिकती श्रवणें वदणें जिथें
झपाटलीं पाहुनी मुलें तुज रस्तोरस्तीं किती
अजुनि कां लाल ओठ दाविशी ?
हें कृष्णरूपडें झांक तुझें गोजिरें
थांबीव कोकिळे गान अवेळीं पुरें
गोठ्यांत बावरीं गाय, म्हैस, वांसरें

रांगोळी ही नको तुझी मज होइ चालती इथून
गेले कानहि माझे किटून ?
दोन प्रहरची वेळ जाहली भिकार दारीं झडे
वाजवी पोटाचे चौघडे
दिवस एक सुट्टिचा कुठें ही पाठ लावि भूमिला
तोंच तव कंठशोष चालला
कुणास व्हावी ही रांगोळी कोणाची योग्यता
कुणाला येते ही चित्रितां
भालिं तिलक कुंकुमी, केशरी गंध अम्हां रानटी
तुझी कां रांगोळी गोमटी
कशास करिसी घसा कोरडा पैशा पाटी विकून
वृथा श्रम घेसी देसी फिरून
नच निद्रा रात्रीं ढेकुण घेती छळून
हिचि वटवट झाली सकाळ गेली सरून
येऊनि दुपारीं पडलों येथें कुठून
तोंच पातलें भयनादाचें डिंडिम हें कडकडून
जाहलों जागा मी खडबडून
रांगोळी ही नको तुझी मज होइ चालती इथून
गेले कानहि माझे किटून

४४. नागेश पांडुरंग फडके

[जन्म १९०४. यांनीं गुजरात विद्यापीठाची 'भाषाविशारद' ही पदवी मिळविलेली आहे. हल्लीं हें माहीम येथें रहात असून यांचा व्यापारविषयक व्यवसाय आहे. यांची 'माझा हिंदुधर्म व इतर कविता' आणि 'धर्मवीराची गर्जना' हीं दोन काव्यपुस्तकें छापून प्रसिद्ध झालेलीं आहेत. हे दादरच्या कवि-मित्र-मंडळाचे कार्यकारी सभासद आहेत.]

१. तेव्हां आणि आतां

काळाला दरडावुनी गवसणी तेव्हां नभा घातली
आतां पौरुषहीन दीन बनलों लाचार श्वानांपरी !
केलें साहस श्री तदा मिळविली सर्वस्व संतर्पुनी
आतां प्राप्त सुखीं परी रमुनियां कीं धन्यता मानितों !
घेतां नांवहि आमुचें धडधडे छाती रिपूंची तदा
होतों स्तंभित संप्रती परिसुनी त्यांच्या वृथा वलगना !
तैं रानींवनिं देशभक्ति भरली, फुर्फूरती अश्वही
गेला तो रविकाल रम्य, भयदा आतां निशा पातली !
आल्या उग्र किती निशा अजवरी ऐशा; तयांतूनही—
धैर्यानें पथ काढिला, मग अतां भीती कुणाची असे ?
व्हा ! व्हा ! स्वार, उठा चला तुडवुनी कांटेकुटे काननीं—
विघ्नें येति तयां सुखेंच गणुनी सारी फिरा मेदिनी !
जेव्हां दौड सरूनिही बल उरे, झाली परीक्षा पुरी
तेव्हां येतिल मागचे दिन पुन्हा या मातृभूमीवरी !!

२. किति दीस...!

[पति मोहिमेवर जाऊन बरेच दिवस झाल्यानंतर—]

" किति दीस निघून्शान् ग्येल कवा तरि बाई !
लइ येळ चालली ये वक्तीचि लढाई ! !
माण्सानं कुठवर एकाकी राह्याचं ?—
त्यें म्येलें इक्तं तकड न कळायाचं ?
तरि बरं छवुकडं माझं गोजिरवानं—
त्यापायिं ठेविला जीव-दिलं द्येवानं !
तुझं रूप कसं रे थ्येट तिकुडच्यावानी—
गहिरिबी नजर ती मुरुत आणित्यें ध्यानीं ! !
ढब चालायाची बोलायाची येक
पोशाख दाविती न्यारा उमदा झोंक !
खुलतिया डोइवर इवलि पगडि पिळदार !
धोतीर कांसुनशान् सोभ्ये शिल्लेदार !
अंगामंदीं कुडतं जुनंच आलं कामीं—
कमरेमंदिं हलती कट्यार छोटी नामी !
छे दिरुष्ट माजिच बाळा लागायाची—
कां बगावि पारख बळंच वोंगाळाची ?
ख्येळून यासवं मनिंचि हौस पुरवावी—
हीं कोड-कवतुकं तवां कशीं सादावीं ?
रमवून हांसवुन जपिन जिवापल्याड-
गा ! तुला पांखरा चारिन चारा ग्वाड ! ! "

वात्सल्यि हृदय आईचें-रंगलें
पटपटा मुके प्रेमाचे-घेतले !
ये पान्हा घट्ट उराशीं-लावलें !

" हो सारं खरं पन्-आतां कसली बोली ?
अगबाइ ! वाजलं कवाड् सवारी आली ! ! "

४५. देवीदास विनायक अडावदकर

[जन्म १९०४. यांचें मॅट्रिकपर्यंतचें इंग्रजी शिक्षण खामगांव येथें होऊन कॉलेजचें शिक्षण नागपूर येथें हिस्लॉप-कॉलेजमध्यें झालें. काव्यस्फूर्ति 'अलंकार-चंद्रिका'कार श्री० गणेश मोरेश्वर गोरे, बी. ए. यांचेपासून झाली. हे नागपूरच्या 'महाराष्ट्र-भाषा-संवर्धक-मंडळा'चे एक आद्य संस्थापक व चालक आहेत. ते सध्यां वऱ्हाड-मध्यप्रांतांतील शिक्षणखात्यांत इंग्रजी शिक्षक आहेत.]

१. सौदामिनी

लालसा रंग; भरदार—
नेसली वस्त्र जरतार।
सजविली साज शृंगार।
थाटला कृष्ण-दरबार। नाचते नाचरी पोर; ॥ १

कुंडलें कानिं चक्‌चकित।
कंकणें करीं रुणझुणित।
मणिहार गळां घळघळित।
लखलखाट फांके फार। नाचते नाचरी पोर; ॥ २

हलकेंच उठुनि हळुवार।
काटिं खोंचुनि ढळता पदर।
लटकोरि लागुनी फार।
करि हसित, टाकि पद नार। नाचते नाचरी पोर; ॥ ३

मागची पुढें जाउनी।
हलकेंच उडी घेउनी।
अंगास मुरड देउनी।
तळपते लहर अनिवार। नाचते नाचरी पोर; ॥ ४

गरगरां नयन फिरवोनि।
थरथरां अधर स्फुरवोनि।
मणियुक्त बाहु पसरोनि।
चरिवरी फुलविते ऊर। नाचते नाचरी पोर; ॥ ५

अभिनयासहित मोहन ।
कड्कडित तान घेउन ।
उन्माद गातसे क्षण ।
हरि चित्त चंचला नार । नाचते नाचरी पोर. ॥ ६

---

२. चंद्रकलेस—

यक्षकन्यके । फिरसि स्वैर कॅंवि इथें ॥ ध्रु०॥
रूपोत्तम, हंसत वदन ।
गौर काय, भर यौवन ।
एकलि पाहुन । घेइल घेरुन । तुजसि कुणि इथें ॥ १
घोरत ही किर्रं रात ।
भिववी ती प्राणिमात्र ।
निर्भय होउन । सदना सोडुन । भटकसी कुठें ? ॥ २
अफाट, दूर उंच गगन ।
निर्जन तें गहन-विजन ।
विजनवासी । उडुं आकाशीं । जासि भिउनि गे ! ॥ ३
शांत निशा, शांत दिशा ।
सकल सृष्टि शान्ति-वशा ।
क्रंदन करिती । तुजसि छळिती । हीं दिवाभितें ॥ ४
कलपद्रुम-कळि रुचिरा ।
मुग्धा, तुज चित्तहरा ।
विश्व खोटें । छळिल मोठें । परत सदनिं गे ॥ ५

४६. के. नारायण काळे, बी. ए.

[जन्म १९०४ रत्नागिरी जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत. चिपळूण येथील युनायटेड इंग्लिश स्कूलमध्यें दुय्यम इंग्रजी शिक्षण झालें. सन १९२८ सालीं सेंट झेविअर कॉलेजमधून बी. ए. ची परीक्षा इंग्लिश भाषा ऐच्छिक विषय घेऊन दिली. आरंभींच्या यांच्या कविता 'भावशर्मा' या नांवानें प्रसिद्ध झाल्या. हे 'रत्नाकर' मासिकाचे कांहीं दिवस संपादक होते. हल्लीं मुंबईस चित्रपट कंपनींत डायरेक्टर असतात.]

१. विरोधाभास—?

[गजल—'फुरकत मे वो नही कजा' या चालीवर]

तूं बोलल्याविना मी नाहींच बोलणार,
बोलाविल्याविना ना पाऊल टाकणार;
पुसल्याविना स्वयें तूं नाहींच सांगणार,
पाहून रीत तूझी, तैसाच वागणार !
लहरी मनास तूझ्या मी कोणत्या उपायें—
रिझवूं शकेन, याची ना कल्पना मना ये;
माझ्या तुझ्यांत कोठें कांहींच साम्य नाहीं;
व्यामोह हो मनाला परि प्रीतिच्याच पायीं !
तूं बाह्य वैभवाला होशी भुलून चूर,
सौजन्य अंतरींचें मज तेंच एक प्यार;
हें सृष्टिसिद्ध जेथें वैधर्म्य राहताहे—
प्रासाद प्रीतिचे कां बांधी तिथें विधी हे?
जे जीवभाव माझे, तुज येत वीट त्यांचा,
प्रेमादरार्थ त्यांच्या तव उत्सहे न वाचा;
प्रिय जे तुला कुणी, त्यांपासून दूर दूर—
मी राहतों, मला ते नाहींत मानणार !

वैचित्र्य हें असोनी पहिल्याच दृष्टिपातें—
मच्चित्तभूमिमाजीं तूं प्रेम पेरिलें तें,
वाढून होय तेथें तो भव्य वृक्ष आजं,
माझ्या मनास वाटे, हें खास देवकाज!
झालीस या जिवाची जर तूं कधीं धनीण,
होईल आपुलें का आयुष्य सौख्यपूर्ण?
कोडें मना सुटेना, कांहीं न होत बोध;
भिन्नत्व सत्य हें कीं, आभास हा विरोध?

---

२. एका आसन्नमरण बालविधवेची मृत्यूची मार्गप्रतीक्षा

दो नयनांची अचल लावुनी अवकाशीं राखणी—
पाहत्यें वाट तुझी निशिदिनीं;
गडगंज संपदा भरली आहे इथें,
कितितरी स्थान हें पडलें आहे रितें,
तरि आप्तजनां मी अडगळशी वाटत्यें,
जीवितनाथा! आतां मज हो माहेरीं जाचणी,
येउनी झडकरि न्या येथुनी १
नयनीं गोळा प्राण जाहले, क्षणा क्षणा मोजुनी—
प्रतीक्षा करित्यें तव बैसुनी;
केधवां कोठुनी अवचित तूं येशिल,
कलपना न याची मजलागीं बिलकुल,
या प्रलय-मारुतीं ऐकुं न ये चाहुल,
दिनरात्री मी म्हणुन कंठित्यें आलोचन जागुनी—
ना तरी जाशिल कीं परतुनी! २
माझ्यासाठीं विलंब नच हो म्हणुनी शृंगारुनी—
बैसलयें काया यालागुनी,

होउनी शुभ्र-शुभ नाजुक वसनावृत,
वधुवेष लेवुनी वाट तुझी पाहत,
मी काल कंठिल्यें वस्त्रांचल मोजित,
किती यापरी दिवस दवडिले गणती नाहीं मनीं–
परि न तूं येशी जीवितधनी ! ३

शिणगाराचा नूर चालला हळु हळु मग उतरुनी–
गेलें चंपक-सुम वाळुनी;
पाहुनी वाट तव डोळे मम भागले,
कीं गुलाब गालीं करपुनियां चालले,
औत्सुक्य भेटिचें हृदयिं अमित दाटलें,
दनिसहाया ! निज यश-वसनीं घ्या मज अवगुंठुनी–
विरूं द्या मजसिं दृढा लिंगनीं ! ४

दिशादिशांना व्यापुन वससी गमतें चौहींकडे,
परि न तव दर्शन नयनां घडे;
तव चरणधूलि मज दिसते संध्या-तमीं,
सळसळति हवेंतुन तव वसनें रेशमी,
येशील आज ही ऐकियली वातमी,
दिन-रजनीच्या मधुर संगमीं गूढ तमीं येउनी–
न्या मज वारुवरी बसवुनी ! ५

---

३. सांत्वन

ये बैस लाडके मजजवळी ॥ ध्रु०॥
सहानुभूतीशून्य जगीं या
वणवण फिरसी कां तूं वायां ?
विफल श्रमविसि कोमल काया
वृथा निराशा पदरीं पडुनी लाभ नसे तिळ मुळीं १

क्षुब्ध गारसे वारे सुटले,
अशुभ सुचविती घुबडें कोल्हे,

स्वैर चालवी पिशाच चाळे, –
मांगल्या या समयीं थारा नाहीं या भूतळीं २
रंगीबेरंगी वस्त्रांनीं
नटुनी फिरती तुझ्या मैत्रिणी,
तिरस्कारिती परि तुज हंसुनी
जाउं नको तूं कधीं त्यांमधीं त्या थोरांच्या मुली! ३
तुज इतरांचें भाग्य न बाले!
हीन दीन तूं द्रव्यकुलबलें,
मोहक नच तव रूप शोभलें—
कालसांवळी होशिल केवीं प्रिय तूं भोळी खुळी ४
दारिद्र्याचे लेख लिहियले—
जरि मम भाळीं विधिनें असले—
त्वत्प्रेमें तरि हृदय दाटलें—
अंतर तुजला म्हणुन मरेतों कधीं न देइन मुली! ५
पानामागें कळी कोंवळी
तशी लाडके! तूं या कालीं—
मातृप्रेमावरणाखालीं—
खुशाल पहुडुनि रहा काळजी हृदयीं कां लागली? ६
सुखदुःखाच्या गोष्टी नाना—
सांगूं आपण परस्परांना
उपयोजूं नित नव्या कल्पना
काव्यानंदीं त्या संवादीं विसरूं जगता मुळीं! ७
रूप गुणां तव पुरें खुलूं दे
मंदानिल मधु गंध हरूं दे
सद्रसिकां डोलूं दे मोदें—
सहृदय कोणी करील तुज मग धारण कंठस्थलीं! ८

४७. अनंत काणेकर, बी. ए., एल्एल्. बी.

[जन्म सन १९०४. यांच्या कविता 'रत्नाकर'मधून प्रामुख्यानें प्रसिद्ध झाल्या. हल्लींच्या नवोदित शाहिरांमध्यें यांच्यापासून पुष्कळच आशा करण्यासारखें आहे. हे विनोदी कविताही चांगल्या लिहूं शकतात.]

१. रानगीत

चल ग सजणे, रानामधें;
चाफ्याचं फुल तुझ्या कानांमधें !

उठे चंद्रमा झाडिंतुनी,
बावरशी कां तूं सजणी ?
रानवटीं हिरवी झाडी,
डोंगरमाथीं हीं उघडीं,
चल फिरुं घालुनि गळा गळे,
रोमांचाचे फुलवुं मळे !

" कोण ग बाई चावट हा,
पानांच्या जाळींत पहा ! "

चंद्र ग बघतो जाळितुनी,
बावरशी कां तूं सजणी,
ओसाडी बघ पुष्करणी
बसलि कशी जळ झांकळुनी:
दोघांचें मुखबिंब गडे,
जाउनिया पाहूं तिकडे,

" कोण ग बाई चावट हा,
पांडुरका पाण्यांत पहा ! "

डुले कवडसा जळांतुनी,
बावरशी कां तूं सजणी ?

पदर आडवा बांध झणीं,
कर गुंफूं कमरेमधुनी.
"'हूं हुं' करुनियां चावट हा,
कानोसा कुणि घेत पहा!"
वायु ग फिरतां तृणांतुनी,
बावरशी कां तूं सजणी?
बावरुनी गेलिस बाई,
चांफा मुळिं फुलतच नाहीं!
चल तर सजणे जाउं घरीं;
"नका साजणा राहुं तरी!"

---

२. चांदरातीं खाडीच्या किनाऱ्यावर—

निळ्या नभावर गिरिराजींची काळिभोर आकृती
उमटली चांदण्यांत मोडती
कांठच्या नारळि ज्योत्स्नेंतुनि रंगती;
नस्तांत झपूर्झा ऊर्मी या खेळती;
कांठास शुभ्रशुभफेनहार अर्पिती!
नौका काळ्या 'डबक डुबुक' या जळावरी डोलती;
मर्मरत ऊर्मि तयां चुंबिती!

— २ —

बाळवंटिं पसरल्या वालुच्या लहरीलहरी किती!
हिऱ्यासम कण मधुनी चमकती!
युगयुगें घेउनी लोळण पायावरी,
गिरिकडे कशाची सागर विनती करी?
गंभीर न बघतो वळुनि मुळीं हा गिरी!
दुःख गिळुनियां अंतरिं सिंधू फेंसाळे परि वरी;
हांसतो निराश जणुं वरिवरी!

— ३ —

चराचरावरि शुभ्र रुपेरी मोहन हें पसरलें,
मोहनें जीवभाव भारले !
अस्मान वर्षतें शीत धवलता अशी;
नसनसांत थरके लहर थंड गोडशी;
कुणि जवळ बसावें बिलगुनिया छातिशीं !
चांदरातिच्या कौंदणांत दिक्काल विसरुनी असें,
पडावें स्पर्शसुखीं धुंदसें !

— ४ —

दिव्य कुणी यक्षिणी येउनी सौंदर्यक्षण असा,
अक्षयीं ठसविल का गोडसा !
चांदणें असेंच्या असें फुलुन राहिल !
गिरिपदीं स्थिरावुन राहिल सिंधूजल ! !
वक्षावर माझ्या मान तिची निश्चल ! ! !
भावि युगें विस्मयें पाहतिल कौरिव लेणें असें,
'म्हणतिल झालें तरि हें कसें ?'

---

३. सांवल्यांचें गाणें

तेजाचीं आम्ही बाळें
रूप जरी अमुचें काळें !
लहान वा कोणी मोठीं,
ससेमिरा अमुचा पाठीं !
जनीं स्मशानीं कुटेंतरी
अशीं तरळतों पिशापरी.

* * *

मेघांच्या काळ्या पंक्ती
निळ्या नभीं जेव्हां फिरती
राक्षसरूपांना धरुनी
सिंधूच्या पृष्ठावरुनी
मंद मंद आम्ही फिरतों
निळ्या जळा काळें करितों !

❀ ❀ ❀

पीतारुण संध्या बघुनी
वंदन दीर्घ करूं पडुनी
मग येई रजनीमाई
पदराखालिं आम्हां घेई.

❀ ❀ ❀

चांदण्यांत अमुची माया
भुताटकी गमते हृदया
पांढुरक्या तेजांतून
कुठें कुठें बसतों दडुन
पांढुरक्या वाटेवरुनी
एकलेच फिरती कोणी,
लपत छपत पाठुनि त्यांच्या
फिरत असूं आम्ही वेड्या !

❀ ❀ ❀

पानांचें पसरुनि जाल
आणिक पारंब्या लोल
वट कोणी ध्यानस्थ बसे,
मंद अनिल त्या डुलवितसे;
मग अमुचीं रूपें डुलतीं
बाळांना बागुल दिसती !

❀ ❀ ❀

जुनाट हे पडके वाडे
पर्णहीन त्यांतिल झाडें
धवल चंद्रिका रंगविते,
आम्ही मग त्यांतील भुतें !
जर का कुणि चुकुनि आला
वाटसरू रात्रीमधला,
बघुनि विकट अमुचे चाळे
चरकुनि तो मागेंच वळे !

* * *

प्रेमस्थळ अमुचें एक;
त्यासाठीं विसरुनि भूक
दाहि दिशा मागुनि फिरणें
जीवाभावानें जपणें;
ही अमुची वेडी प्रीत
झिडकारा, मारा लाथ !

---

४. *बेगमेच्या विरहगीताला शिवाजीचें उत्तर

मज पाहुनी तुवां गे। लिहिलेंस बेगमे, तें
अडखळत वाचुनीया। आनंद होइ मातें
तें 'नाथ' आणि 'स्वामी'। मज सर्व कांहीं उमजे;
'इश्की', 'दमिश्कि', 'दिल्नूर',। कांहींच गे, न समजे !
जरि या मराठमोळ्या। शिवबास बोध व्हावा,
तरि फारशी-मराठी। मज कोश पाठवावा.

---

* 'बेगमेचें विरहगीत'-माधवजूलियन्-शलाका, पान १३.

४८. मुकुंद मोरेश्वर लोंढे

[जन्म सन १९०४. महाराष्ट्रांतील प्रसिद्ध कवि कै० मोरो गणेश लोंढे यांचे हे चिरंजीव होत. १९२४ मध्यें हे मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाले; परंतु घरच्या गरिबीमुळें यांचें पुढील शिक्षण झालें नाहीं. यांस लेखनकलेचा व चित्रकलेचा फार नाद आहे. हे पूर्वी 'अर्भक' नांवाचें एक सुंदर हस्तलिखित मासिक चालवीत असत. हे हल्लीं प्रायव्हेट हायस्कूलमध्यें शिक्षक आहेत. यांनीं लहान मुलांकरितां केलेल्या कविता फार सुरस आहेत. यांच्या स्फुट कविता 'चित्रमयजगत्', 'मनोरंजन', 'आनंद', 'उद्यम', 'अरुण माला', 'भारत-मित्र', 'खेळगडी' वगैरे मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत.]

१. कुंजविहारी

कुंजविहारी । वाजीव बांसरी प्यारी ॥ ध्रु० ॥

कुंजामध्यें विहरत असतां
इकडे तिकडे बघतां बघतां
राधा कोठें मुळि नच दिसतां
'राधा प्यारी । कां बोल खरेंच मुरारी ?' १

कुंजवनामधिं फिरतां फिरतां
शोधित तुजला राधा येतां
कुंजविहारी मुळि नच दिसतां
'कुंजविहारी । कां खरंच तुला प्रिय भारी ?' २

चुंबन बांसरिचें जो घेतो
मोदानें जो रमुनी जातो
जगताला नादें मोहवितो
कुंजविहारी । वाटतो मला प्रिय भारी ३

बांसरीस करपाशीं धरितो
मोदानें निज मुखीं लावितो

ऐसा श्रीहरि तुज आवडतो
कैसा भारी। भुलवितो तुलाच मुरारी ४

प्रेमानें तुजपाशीं रमतो
वाटे मज तुज थापा देतो
खोटें प्रेम तुजवरी करितो
तया प्रिय भारी। गे असे बांसरी प्यारी ५

---

२. असे का तीच ही भूमी ?

[चाल—गज्जल]

जिथें धेनू मुदें चरती। जिथें त्या पाळि गोपाळ
जिथें चिंता नसे कांहीं। असे का तीच ही भूमी ? १

जिथें शिवराय होवोनी। मुदें पाळीत धेनूला
जिथें सुख जाहलें सर्वां। असे का तीच ही भूमी ? २

जिथें नृप जाहले मोठे। जिथें संपत्ति हो फार
जिथें धर्मीय अवतरले। असे का तीच ही भूमी ? ३

जिथें योद्धे किती झाले। जिथें ते भूवरी लढले
जिथें स्वातंत्र्य तळपविलें। असे का तीच ही भूमी ? ४

जिथें स्वातंत्र्यसूर्याचा। उदय झाला असे वाटे
जिथें नर वंदिती भूला। असे का तीच ही भूमी ? ५

जिथें द्रव्याचि ना किंमत। जिथें देहाचि ना किंमत
जिथें स्वातंत्र्य तें प्यारें। असे का तीच ही भूमी ? ६

जिथें कवि कालिदासादी। तसे ते वाल्मिकी आद्य
जिथें स्फूर्तिप्रति दिधलें। असे का तीच ही भूमी ? ७

जिथें ते पूर रक्ताचे। जिथें त्या शूर वीरांचें
जिथें अरि चळचळा कांपे। असे का तीच ही भूमी ? ८

जिथें साध्वी किती झाल्या। जिथें त्याही सती गेल्या
जिला त्यांनींच भूषविलें। असे का तीच ही भूमी? ९

जिथें ते मावळे वीर। जयां नव्हतीच दरकार
जिथें मृत्यू न त्यां भिवदी। असे का तीच ही भूमी? १०

---

३. चांदोबा

[चाल—उडुनि जा स्वैर०]

कैसा आई। चांदोबा चालत येई ॥ ध्रु० ॥

धांवत मी येथुनियां जातां
पुन्हा परतुनी मागें बघतां
दिसतो तो मग धांवत येतां
धराया बाई। मज शिवेल वाटे बाई १

धांवत येतां न दिसे कोठें
ढगाआड तो लपला वाटे
लपंडाव तो खेळे थाटें
मजशीं आई। धांवत तो मोदें येई २

चांदोबा तूं खालीं येरे
खेळूं आपण मोदें बारे
विनवुं तरी मी कितिदां तुजरे
आई आई। सांग गे तया तूं आई ३

४९. भालचंद्र वासुदेव केळुसकर

[जन्म १९०७. यांचें इंटरपर्यंत शिक्षण झालें आहे. हे वऱ्हाडांत बाळापूर येथें नोकरीस असतात.]

१. डांकवाल्यास—

चिंताग्रस्त कुणाची आई
दारीं जेव्हां तुजला पाही
पत्रासाठीं धांवत येई
म्हणतां नाहीं—बा लाज कशी तुज नाहीं? १

अधिर कुणाची होउनि भार्या
धांवत सोडुनि ये गृहकार्या
बघुनिही उत्सुक ऐशी आर्या
म्हणतां नाहीं—बा लाज कशी तुज नाहीं? २

चोरटि प्रेमें असती मोठीं
पत्रच रूपें ज्यांच्या भेटी
म्हणुनि सारखी तुजवर दृष्टी
अशांना नाहीं—बा लाज कशी तुज नाहीं? ३

गांवोगांवीं अर्ज करीती
नोकरिसाठीं तिष्ठत बसती
पदवीधर ते तुज अधिं पुसती
तयांना नाहीं—बा लाज कशी तुज नाहीं? ४

उधळा विद्यार्थी मजसम तो
पैशासाठीं वाट पाहतो
चंचल नयनें तिष्ठत बसतो
म्हणशि त्या नाहीं—बा लाज कशी तुज नाहीं? ५

५०. विष्णु भिकाजी कोलते, बी. ए.

[जन्म १९०८. यांचें प्रवेश-परीक्षेपर्यंतचें शिक्षण मलकापूर व खामगांव येथें झालें व बी. ए.पर्यंतचें शिक्षण नागपुरास मॉरिस कॉलेजमध्यें होऊन ते बी. ए.ची परीक्षा १९२९ सालीं नागपुरास विश्वविद्यालयांतून उत्तीर्ण झाले. हल्लीं ते नागपूर येथें लॉ व एम्. ए.चा अभ्यासक्रम करीत आहेत. त्यांची कविता प्रामुख्यानें काव्यरत्नावलींतून प्रसिद्ध झाली आहे.]

१. आशेस—

झाली धन्य जगीं तूं जन्मुनियां सौख्यदायिनी आशे !
हृदयांदोलनचपले ! लोकत्रय बांधिलें तुवां पाशें
गोड गुलाबी स्वप्नें किंवा तुजमाजि दिव्य जो चटका
आस्वादनीं तयाच्या भासे इहलोक सर्व हा लटका.
तूं भाग्य अभाग्याचें, आशे ! कांचन अकिंचना जगतीं
तूं प्रेम विरहि तरुणां, तुजविण अन्या नसे तयांस गती.
स्वातंत्र्य बंधयुक्ता विलास गे ! तूं वियुक्त रमणीचा
आनंद दुःखितां तूं कीं पुत्रचि गे ! अपुत्रनरमणिचा.
नवपुत्रवती माता घालुन तुज पाळण्यांत हिंदविते
निज भावी सौख्याचें चित्र जणूं ती तयांत डोलविते.
आशे ! विरहीगण हा तंतूंचा तव करूनियां दोला
झोंके घेइ तयावरि भूपाळ्या गात गात प्रेमाला.
मीही तुजवरि टांगुनि अपुला बहुमोल जीव हा आतां
भिक्षेस्तव आलों; दे भिक्षा; तुजविण नसे कुणी त्राता.
जगतीं तुझीच आशा, तुजविण कोणी जगीं न मज आशे !
झाली सर्व निराशा, इतरत्रहि बद्ध जी करी पाशें.
साम्राज्यांत तुझ्या ने, आलों आलों तुला अतां शरण
दाखव मज मधु स्वप्नें, किंवा दे त्यांतची मला मरण.

परि नीरस जीवनिं या मातें कधिंही पुन्हा नको ढकलूं
सर्वज्ञे ! न कळे मज हृदय कसें हें तुझ्यापुढें उकलूं.

---

२. कौतुक कोण करी ?

दीन हृदय सुंदरी—
तयाचें कौतुक कोण करी ? ॥ ध्रु० ॥
चंद्रमिषें कविहृदय उघडलें
विश्व झोपलें परी
तयाचें कौतुक कोण करी ? १

रानफुलें वनिं सुगंध उधळिति
पर्वा काय तरी
तयाचें कौतुक कोण करी ? २

वेडा गणुनी निर्धन कविला
सर्व लोटिती दुरी
तयाचें कौतुक कोण करी ? ३

शुद्ध तसें हें प्रेम आपुलें
आहे जरि अंतरीं—
तयाचें कौतुक कोण करी ? ४

निर्धन आपण, खोट्या जगतां
मार लाथ सुंदरी !
तयाचें कौतुक कोण करी ? ५

चाल, जाउं गे ! वनीं कुठें तरि
दिरून वाऱ्यावरी
तयाचें कौतुक कोण करी ? ६

---

३. संगमोत्सुक

— १ —

होता तेवत शुक्रदेव गगनीं फेंकीत मंद प्रभा
स्वर्गांच्या वलयांत दाट जमली तारावलीची सभा;
आले मंजुल गीत गात गगनीं सप्तर्षिचे पुंजही
झाले स्नान करून शुद्ध नभिंच्या गंगेत जे सर्वही.

— २ —

सृष्टीला मधु गीत गात सरिता अंकीं तिच्या झोंपल्या
रानाला निजवीत निर्झरतती गुंगावया लागल्या;
झांकोनी अवघ्या महीस अपुल्या निद्रा सती अंचलीं
ब्रह्मानंदनिमग्न होउनि अहा! डोलावया लागली.

— ३ —

या ऐशा समयीं कुणी निज गृहीं सौंदर्य-सौदामिनी
कांतेतें दृढ बाहुपाशवलयीं सप्रेम आलिंगुनी;
ओष्ठींची मधुरा सुधा रमणिच्या ओष्ठींच कीं चाखुनी
स्वसौख्यीं रमला असेल हृदयीं अत्यंत आनंदुनी.

— ४ —

येतां नाजुक कल्पना हृदयिं या माझ्या अशी प्रेमले!
तीं हास्यें, तव ते विलास अवघे ध्यानींमनीं घोळले;
अन् देवि! तव संगमोत्सुक अशा सद्भावना जागल्या
दुर्दैवें परि हाय! हाय! अपुल्यामध्यें नद्या घातल्या.

५१. ना. मा. संत

[जन्म सन १९०८. हे फर्ग्युसन कॉलेजमध्यें इंटर सायन्सच्या वर्गांत शिकत आहेत.]

१. प्रीतीचीं कवनें

प्रीती हाय ! दिवंगता नच अतां तीतें पुनर्जीवन
तीच्यावांचुन विश्वमात्र तृणवत् दिङ्मूढ हें जीवन
माझा तो अधिकार काय कुठला मी व्यास ना वाल्मिकी
आलया गोड ऋचा समाधित तरी प्रीती तुझ्या मन्मुखीं १

त्यांची ही सुमसंहिता तव पदीं वाग्दत्त अस्वीकृत
तूं सेवेस उपेक्षितां मग फळें कैचें तिचें स्वीकृत
हेटाळील कुणी करीलहि कुणी निर्भर्त्सना साजुक
द्वेषाग्नी करपून टाकिल कुठें तज्जीवही नाजुक २

तीची मी अवहेलना मग करी या लोचनीं पाहवी ?
स्वीकारी हृदयांत त्याहुन तुझ्या वैश्वानरा हा हवी
जिव्हेनें जरि घेतलास हृदयीं राहील हस्ताक्षर
होऊनी परिपूत जाइल अणी स्वर्गांतही साक्षर ३

मेघें यक्षप्रियेस यद्यपि नसे संदेश सांगीतला
तेव्हां कार्यसमर्थ तूंच म्हणुनी अग्ने ! तुला बाहिला.

---

२. बोलाविते मजला कुणी !

थांबा क्षणीं हळु लांबुनी
बोलाविते मजला कुणी !
हृदयांतुनी
त्याचा ध्वनी
हा नाद तो मग भारुनी

थांबा क्षणीं हळु लांवुनी
बोलावितें मजला कुणी !
मम चांदणी
क्षितिजांगणीं
उगवेल हो जरि या क्षणीं
थांबा तरी इथुनी दुरी
मज बाहते कुणि वैखरी !
ताज्या कळ्या
ज्या वेंचल्या
फुलण्यास ह्या क्षणिं लागल्या
थांबा तरी इथुनी दुरी
मज बाहते कुणि माधुरी !
तुझियावरी
हृदयेश्वरी
जिव गुंतला प्रणयें जरी
थांबे तरी इथुनी दुरी
कुणि बाहते मज बांसरी !
बंदींतुनी
कंटाळुनी
हा चालला वेहोषुनी
आत्मा वरी कोणा तरी
गुंगावया दिव्यावरी !

५२. कमलाकर

[रा० वामन. शेंडे, जन्म १९०९. हे चाफळ येथें शिक्षक आहेत.]

१. तो सज्जनगड ढांसळला

[समर्थांचा सज्जनगड !! समर्थांच्या वेळेचा सज्जनगड !!! आज या विसाव्या शतकांत, त्याचा बुरुज ढांसळलेला पाहून, चालू परिस्थितीचा विचार करतांना मनांत दुःखाचें वादळ उठल्याशिवाय कसें राहील !...]

इतिहासीं गर्जुन ठेला । तो सज्जनगड ढांसळला ॥ ध्रु०॥
महाराष्ट्र-शीर्ष मुगुटाचा । तेजस्वी अविचल तारा
श्रीसमर्थ शिवरायाच्या । प्राणाचा पंचप्यारा ॥
महाराष्ट्र-भूमि वीरांच्या । छेडि जो हृदयिंच्या तारा
तो अलंकार राष्ट्राचा
तो अलंकार शिवबाचा
तो साज रामदासांचा
हाय ! हाय !! कैसा गळला । तो सज्जनगड ढांसळला ?

पसरोनी नव चैतन्या । ठायिं ठायिं ते बनवीले
धर्माला उद्धरणारे । देशाचे रक्षणवाले
देशाच्या स्वातंत्र्याला । अर्पिती रणीं शिरकमळें
दुष्टास सुष्ट बनवाल
दगडांना ईश्वर केलें
स्व-स्फूर्तीच्या दिव्य-बळें
त्या समर्थ राजगुरूंचा । तो सज्जनगड ढांसळला २

धर्माच्या उद्धारार्थ । राष्ट्राच्या स्वातंत्र्यार्थ
म्लेंच्छांच्या उच्छेदार्थ । गोब्राह्मणप्रतिपालार्थ
ज्या शूर वीरसिंहांनीं । सोडिला निरंतर स्वार्थ

वीरांच्या शूरपणाचे । घडविले दगड ते सारे
हृदयाच्या पावित्र्यांत । रुतविले तयांचे फेरे
ज्या दिव्य तटीं पुण्याचें । स्वच्छंद खेळतें व
कांहो तो तट हादरला ?
कांहो तो तट डळमळला ?
कांहो तो तट गडगडला ?
हदरला, भंगला पडला । तो सज्जनगड ढांस

देहांतुनि आत्मा जातां । कीं तेजहि याचें जैसें
सोनेपण कीं सोन्याचें । नाहींसें होतां जैसें
चमकतां नभीं जी तारा । आदळतां खालीं जै
पूर्वीचें वैभव जातें
जड प्रस्तरपण त्यां येतें
यापरिच्च जाहलें येथें
सज्जनगड नामें उरला । तो सज्जनगड ढांस

सज्जनगड चढवायाचें । सामर्थ्य आमुचें नाहीं
तो बुरुजहि बांधावयाची । योग्यता आमुची न
ज्यांनीं तें केलें गेले । तच्चरितें आतां ध्यावीं
लिंपितां कशाला भिंती ! ! !
पापांचा कर्दम हातीं
घेउनियां, तो या जगतीं
परळीचा किल्ला झाला । तो सज्जनगड ढांसल

५३. दामोदर अच्युत कारे

[जन्म १९०९. हे मडगांव येथील 'हिंदु' पत्राचे उपसंपादक आहेत.]

१. दर्शन !

शुक्राची उगवे प्रभात-समयीं जैशी नभीं चांदणी
पूर्वेला मधु मंजु तेज पसरी, घे चित्त आकर्षुनी,
दिक्प्रांताप्रति आसमंत अपुल्या स्वर्गीयतेनें भरी !
होतां गे ! तव मूर्ति-दर्शन मला भासे तसें अंतरीं !
पावित्र्या उधळीत जासि निघुनी देवी ! प्रदेशांत या
या वातावरणीं सुगन्ध भरिसी निःश्वास सोडूनियां !
वाटे भूमिहि होतसे पुलकिता तूझ्या पदस्पर्शानें !
हा आश्चर्यविमूढ भक्त तव गे निःस्तब्ध येथें बने !
देवी ! पाहिं मुखा तुझ्या टक जरी लावून वेड्यापरी
शंका भीति मनामधें लवभरी आणूं नको गे परी
पावित्र्यद्युति जी मुखावरि तुझ्या देवी ! दिसे फांकली
त्या तेजोवलयींच दृष्टि खिळुनी माझी असे राहिली !
आहे सुंदरता मुखीं तव, परी ती स्वर्गदेवीपरी !
लोभाची मग कैशि मानव-मनीं येईल स्पर्धा तरी ?
जाती अस्थिर सर्वही विरुनियां हीं भावनांदोलनें
चित्तीं आदरभावनेविण नुरे कांहीं तुझ्या दर्शनें !

---

२. गोमन्तदेवी

स्मरुनी गोमन्तदेवि ! मूर्ति सौख्यदा
प्रेमभरें हृदय भरे, नमन तव पदां ॥ ध्रु० ॥

गोमन्तदेवी–गोमन्तकभूमि. दूधसागर–दूधसागरचा धबधबा.

सम्राज्ञीपद तुझेंच गमत सृष्टिचें
सिंहासन सह्याद्री, खालिं गालिचे-
अंथरिले हरित-धवल गवत-वालुचे
या प्रभावळींत भव्य पहुडशी सदा ! १

नारळि-तरु देवि ! तुला छत्र नित करी
दुग्धधार धरित दूधसागरहि शिरीं
सिन्धुलहरि चुम्बिति तव चरण वारिवरी
वैभव तव अनुपमेय; अतुल सम्पदा ! २

पुष्पगुच्छ करिं, कर्णीं आम्रमंजिरी
रजतशुभ्र निर्झर पदिं तोरड्यांपरी !
सरोमुकुरिं निरखिसि निजरूपमाधुरी
उचित प्रसाधन-साधन राशिच्या पदा ! ३

उज्ज्वल नव तव हिरवा शालु हा किती
बहुरंगी रम्य फुलें त्यास खुलविती !
देवालय-कळस तुझे मुकुट भासती
शोभति किति रवि-शशि-करिं तळपती यदा ४

तव महिमा गाति नद्या सतत वाहुनी
वायु यशःसौरभ तव नेइ वाहुनी
विंझणवारा करिती तरुहि डोलुनी
सकल करिति तव सेवा गौरवास्पदा ५

तव सेवा-कार्य घडो मजहि अल्पसें
अंकित तव रूप असो हृदयपटिं असें !
जीव-सुमन तव पूजेस्तवचि हें असे,
जाणिव ही देवि ! वसो हृदयिं सर्वदा ! ६

५४. गजानन लक्ष्मण ठोकळ

[जन्म १९०९. मूळगांव अहमदनगर. हल्लीं हे नाशिक येथील कॉलेजांत शिकत असतात. यांच्या कविता वाचून हे पुढें चांगले नामांकित कवि होतील अशी अपेक्षा करावयास हरकत नाहीं.]

१. एकटी

तुझ्यावीण हिंपुटी-सख्या मी राहुं कशी एकटी ?
गोड गोड मज वचनें देउन
निघून गेला आपण येथुन
कितीतरी दिन गेले लोटुन
पत्रहीं न शेवटीं-सख्या मी राहुं कशी एकटी ?
झुंजुरकें दिसतांच उठावें
काम पारुसें उरकुन घ्यावें
नंतर पाणोठ्यावर जावें
घागर घेउन कटीं-सख्या मी राहुं कशी एकटी ?
सडणें, निसणें, झाडसारवण
कामांतच दिन जातो संपुन
वाढवतें हीं पाणी घालुन
परसांतिल रोपटीं-सख्या मी राहुं कशी एकटी ?
पडते जेव्हां खाटेवरतीं
आठवणींना येते भरती
दिसूं लागते डोळ्यांपुढतीं
यशी तव गोरटी-सख्या मी राहुं कशी एकटी ?
नको नको हें जिणें वाटतें
अळेंबळें मी घास लोटतें
कसाबसा हा काळ कंठतें
पाहुन तव अंगठी-सख्या मी राहुं कशी एकटी ?

छातीवर दुःखांचे डोंगर
झेपुन धरतां खचली कंबर
उघडॅं झालॅं मजला अंबर
पडलॅं मी संकटीं–सख्या मी राहुं कशी एकटी ?

नांव तुझॅं घेतांच मनोहर
डोळ्यांतुन ये पाणी दरदर
पेटली सख्या हृदयीं खडतर
विरहाची आगटी–सख्या मी राहुं कशी एकटी ?

वाट किती मी पाहुं आपुली ?
माया कां हो पातळ केली ?
ओकी ओकी मजला झाली
ही अपुली खोपटी–सख्या मी राहुं कशी एकटी ?

जीव वाहिला तुझ्याच पायीं
विलंब लावूं नकोस कांहीं
राया केव्हां संपणार ही
अपुली ताटातुटी ?–सख्या मी राहुं कशी एकटी ?

घाम केधवां येउन पुसशिल ?
विडा प्रीतिचा केव्हां घेशिल ?
केव्हां करशिल गोष्टी गुलगुल
गळ्यास मारुन मिठी ?–सख्या मी राहुं कशी एकटी ?

---

२. मोटेवरलं गाणं

दिवस तापतो डोईवरतीं अगिन् पाखडीतसे
शेत हें जसॅं तापलॅं शिसॅं
वारा पडला, निचही चालली अंगाची काहली
समदी पैरण घामेजली

इरभळ मोटा वढूनशानी बैल टाकती कसे
उसासे भरभर भाते जसे
ही मोट अली वर खेंच्यूं द्या सौंदर
मग भरल सारं थारोळं भरभर
दंडांतुन पाणी जाइल सर सर सर
भरत चाललं वाफं आतां लइ थोडं न्हायलं
गड्यांनो, उचला तर पावलं
साफ नांगरुन शेत त्यावरी औतहि चालीवलं
जोंधळं मगशानी पेरलं
साबरफणिचं काटंकुंपण सभोंवार घातलं
कुठं तर केकताड वाढलं
होतां कोंबडसाद घालतों बैलांना दावण
चालते मोट तवांपासुन
असं होतां येतिल कोंब कोवळं वरी
पोपटी दिसल मग शेत पाचुचं परी
कोळपून करुं या तण गवताचे दुरी
लहडतील ताटांना कणसं मग शालूची जवां
देऊं देवाजीला दुवा
घेउन गोफण करील राखण बसून माचीवरी
आमची पोर लाडकी सरी
निंदुन-टाकिल सगळी हरळी टहाळ वंक्यांतली
जिवाची धनीण माझ्या भली
अन् सोन्या-पवळ्याहो, आपण असंच पाणी भरूं
मशागत उभ्या पिकाची करूं
या इकडं हिरवं शिवार सळसळ करी
त्या तकडं वंबी कवळं दाणं धरी
कल्तील जराशीं उनं अशा औसरीं

येतिल हुरडा खायाला मग खेड्यांतिल सोबती
बस्तिल चिंचेच्या खालतीं
झगरं पेटवुन कणसं भाजूं लागल हुरडा किती
खरपुस चटणीच्या संगती
तुम्हांलागुनी खाया देइन बरं का ठेवुन सई
मायंदळ ताटं गुळचट लई
पल्याड माचीवरून आली हांक कुणाची पण—
शिदोरी शिरीं कारभारिण!
शिवळाट उतरतों खांद्यावरचं अतां
पाजतों पलिकडं पाणि पाट वाहता
या हिरव्या कुरणीं चरा, जिवाला जता
जातों आतां भूक लागली, दोन घांस जेवतों
तिच्याशीं गोड शब्द बोलतों.

---

३. भिकारीण

या दीनेची कींव येउंद्या कांहीं
भिक्षा मज घाला माई !
हें ऊन किती कडक तावतें बाई
अंगाची फुटते लाही
या तीन दिसांपून खायला कांहीं
शीतही मिळालें नाहीं
मी कितीतरी फिरल्यें दारोदार
घेऊन कडेवर पोर
कंठांत गुंतले प्राण
जाहला जीव हैराण
भीक मागण्याला त्राण

कांहींच बरें आतां उरलें नाहीं
मज भिक्षा घाला माई !
ज्या दिवशीं हें कुंकूं माझें पुसलें
मज अभाळ उघडें पडलें
दो महिन्यांचें सवें घेउनी बाळ
वणवणल्यें रानोमाळ
मीं आजवरी वांचविलें बाळाला
चिंचेचा खाउन पाला
पण अतां फुटेना पान्हा
वांचवा लाडका तान्हा
देखवे न याची दैना
तिळतीळ तुटे माझें काळिज बाई
मज भिक्षा घाला माई !
दो दिवसांचा शिळा वाळला तुकडा
चालेल अम्हांला वाढा
तो चावुनियां बाळाला भरवीन
पदराखालीं निजवीन
कां माई हो, अशा लावितां दार ?
नाहिं मी पुन्हा येणार
बाळा, चल पुढतीं जाऊं
कोंविलवाणें नच पाहूं
हा मुकाच घे तुज खाऊ
चल भीक आतां आपण मागायाला
देवाच्या जाउं घराला !

---

४. बंदिवान

उत्तुंग डोंगर वांकडे ओलांडुनी जावें पुढें
जेथें कडे चोंहीकडे, रस्ता अडे, कोडें पडे !
एकीकडे झाडेंझुडें, दरडींत भालु ओरडे
फोडी पशू डरकावण्या, ऐकून तें छाती उडे !
किंवा मला विक्राळशा दरियामधें ढकला कुणी
ठेंचाळती लाटा जिथें खडकास कर्कश गर्जुनी
घोघाउनी फेंकीतसे वारा ढगांचेझुबके
वासूनिया जबडे खडे नक्र कृतांतासारखे !
किंवा मला अवसेचिया रात्रीं नभीं द्या झोंकुन
तेथेंच मी काळ्या ढगा पकडून लोंबत राहिन
या बाजुला बिजली सुटे, त्या बाजुला उल्का फुटे
तारा तुटे, पेटे नभीं ! झळ लागुनी कांटा उठे !
दैना मला ही पत्करे बेड्या परंतु या नको
वैतागलों या जीवना दारूण ही बंदी नको !

५५. सदाशिव रघुनाथ पंतसचीव, बी. ए.

[हे भोर संस्थानचे युवराज असून यांच्या कविता 'त्रिदल' या काव्यग्रंथांत प्रसिद्ध झालेल्या आहेत हल्लीं हे यूरोपमध्यें प्रवासासाठीं गेले आहेत.]

१. गवाक्षांतील सुंदरीस !

शून्यमुखीं बघशी गगनीं ।
मज सांग सांग तव काय मनीं ॥ ध्रु० ॥
पायापाशीं बसे शाहिर
हृद्वीणेवरि धरितो सूर
राग आळवी तुझा निरंतर,
बोल त्याशिं तूं मधुवचनीं
मज सांग सांग तव काय मनीं ! १

तव विरहीं अशनाला टाकी,
अश्रू जमले नेत्र-तटाकीं,
ध्यास लागला तुझाच देखी,
दया येउं दे विलासिनी !
मज सांग सांग तव काय मनीं ! २

निःश्वासांनीं रचिलीं गीतें
नटलीं प्रीतीच्या संगीतें,
तुझ्याच वर्णियलें कीर्तीतें,
रुसवा कां हा फिरफिरुनी ?
मज सांग सांग तव काय मनीं ! ३

वायु वाहतो तुझ्याच कवना,
भृंग गुंग त्वत्स्वरूपगाना,
केली कविनीं तुजवर रचना,
रोष असा कां दासजनीं ?
मज सांग सांग तव काय मनीं ! ४

२. हृदयार्पण !

मदन-वदन मन सुखवित माधव हा येई
पैंजण-रव करि छुमछुम, चित्त-वेध होई १
चरण-क्वणत ठुमक ठुमक हंसत येत पाहीं
पद-रुणझुण श्रवण-सुभग सतत काण यई २
अलि-रुंजनिं, किंकणि-रविं, ताल-पदीं गाई
अरुण-वर्ण वसन खुलत लेववितें पाहीं ३
बघुनि कुमुद-रमण-वदन मन विलोल होई
भ्रमर-पुंज वदन-कंज-मधु-विलुब्ध येई ४
चित्त-मुकुल हो प्रफुल्ल, गगनिं शशी पाहीं
कल-हंस-ध्वनि वनिं हा तुजकारणिं होई ५
तव पद-रत विनत होत राधिका तुझी ही
हृदय-कमल कुसुमशरा ! चरण-दलीं वाही ! ६

---

३. वर्तुलनर्तन

कौमुदींत नाचती अंगना
वर्तुल धरिती पथ क्रमतांना
पदन्यास-रत रती भासती
एकसमयिं रति अनेक दिसती ! १

मूकपदाक्षेपण जणुं चाले
अवकाशीं संगीत मिसळलें
द्वाविंशश्रुति स्रवती तेथुनि
श्रुतिगोचर स्वर-कलाप मिळुनी २
कोमल कर करांत गुंफुनी
हृदय-पेड एकत्र विरचुनी

गाति भावना-गीत अंगना
भ्रुकुटि-भंगिं सोडिती शरांना ३

पदास पद मिळती तालांत
मनास मन मिळतें प्रेमांत
सौंदर्याचें वर्तुल फिरतें
फिरतें फिरतें क्षण न विरमतें ४

चांदरात-जलनिधी पसरला
शुभ्रमेघ-नौकांनीं भरला
नर्तन-वर्तुल त्यामधिं फिरतें
जगत्प्रेम त्यामधिं गुरफटतें ! ५

५६. सौ० सरोजिनीबाई पंतसचीव

[या युवराज भाऊसाहेब पंतसचिव यांच्या पत्नी. यांच्या कविता अत्यंत गोड व प्रेमळ असतात. यांच्या कविता 'मनोरमा', 'यशवंत' इ० मासिकांतून प्रसिद्ध होत असतात.]

१. धांवा

[चाल—हा कर्मयोगि अवतार, लोकमान्यांचा०]

मम परिसुनियां धांवा। यदुवरा ! धांवा ॥ ध्रु०॥
क्षणभरि बाजुस ठेवा पावा
भानरहित मी झालें देवा !
सांभाळी जीवा। यदुवरा ! धांवा १
भवनगरीची मी वाटसरू
चुकलेलें हें दीन वांसरूं
सुपथ त्यास दावा। यदुवरा ! धांवा २
उरलि न इच्छा धन-दौलतिची
मानपान वा इतर सुखाची
प्रेम एक ठेवा। यदुवरा ! धांवा ३
पतितपावना ! मजसि उद्धरा
जगतिं न उरला आतां थारा
सार्थ करा नांवा। यदुवरा ! धांवा ४
विसर तुझा मज कधिं न घडावा
तव कारणिं हा देह पडावा
इतुका वर द्यावा। यदुवरा ! धांवा ५

२. आळवणी

[चाल—चंद्र चवथिचा०]

हृदयरंजना !
प्राणजीवना !
चरण-कमल दाखवुनी रिझवि मन्मना १

नाहिं आसरा,
जीव बावरा
होय जलावीण जसा मीन घाबरा २

मधुर बांसरी
वाजवी हरी !
अधिर ऐकण्यास सख्या ! फार अन्तरीं ३

प्रेम दाविसी
हृदय चोरशी
भुरळ पुरी घालुनियां पाडिशी फशीं ४

धीर राहिना
पळभरी मना
व्याकुळ मी, दर्शन दे त्वरित मोहना ! ५

वंचना पुरे
राग सोडिरे !
तृषिता मी प्रेम-मेघ काय ओसरे ? ६

५७. वा. भा. पाठक, बी. ए.

[हे पुणें येथील म. ए. सोसायटीच्या हायस्कूलमध्यें शिक्षक आहेत. यांच्या कविता निरनिराळ्या प्रचलित मासिकांत येत असतात. कांहीं कविता 'वासंती' व 'बालशारदा' या काव्यसंग्रहांत आलेल्या आहेत. आधुनिक तरुण कवींमध्यें हे चांगले होतकरू कवि आहेत.]

१. हे दीप लागले चोहिंकडे

हे दीप लागले चोहिंकडे
अंधार कशाचा बोल पडे ?

असति न तारा या लुकलुकत्या
मिणमिणत्या वा जळत्या पणत्या
निरंजनांतिल वाती विझल्या
तळपतात हे तर सूर्य खडे
अंधार कशाचा बोल पडे ?

असेल सारें जग हें दुबळें
म्हणून तव मन निराश झालें
उज्ज्वल तव का विचार सरले
जणुं हिऱ्यामोतियांचेच सडे
अंधार कशाचा बोल पडे?

होउन अश्वावर तूं स्वार
साधाया जगिं येसि शिकार
सावज न दिसे उडव भरार
चौखुरावरी अपुलें घोडें
अंधार कशाचा बोल पडे ?

तीन हात तव नाहीं काया
नउ हात दिसे पडली छाया
नसत्याची ही असती माया

त्यामुळें तुझा का जीव कढे ?
अंधार कशाचा बोल पडे?
जा तूं आधीं काबिज गड कर
जरिपटक्यानें शोभिव मग शिर
तशांत उडलें राया तें तर
तर तुला स्वर्गिंचें राज्य घडे
अंधार कशाचा बोल पडे ?
इंदु दिसेना कितीहि सुंदर
एक पक्ष परि सोडी अंबर
भुलेल भुलणारें त्या अंतर
रविवीण परि न दिन एक घडे
अंधार कशाचा बोल पडे ?

---

२. तूं आणि लोकभ्रम

ध्यान लागुनी तुझें होतसे माझें चित्त उदास
जन वदती कीं यास लागला कर्तव्याचा ध्यास
प्रेम तुझें ज्यावर तीं बसतों वेंचित पुष्पें बागीं
भास जगाला-कीं देवाची अति आवड यालागी-
सहवास न मज रुचे जनांचा प्रिय वाटे एकान्त
निसर्ग-गोडी जग वदतें तर यास असे अत्यंत
प्राणावरचें संकट होतें तुझें निभावुनि नेलें
तेव्हांपासुनि 'जन-हितकर्ता' हें मज नांव मिळालें!
तुझ्या चिंतनीं पूर्ण निमाले राग-लोभ जरि माझे
लोक बोलती निर्विकार मन झालें आहे याचें !

* * *

गाणीं आहें गात खरोखर तुझिया प्रेमरसाचीं
सर्व बोलती 'धन्य असो तर याच्या कल्पकतेची !'

---

३. 'स्त्री आणि पुरुष'

वेली आणि फुलांतलें वसतसे देहीं तुझ्या मार्दव
मी तों राकट चालतां पदतलीं संचूर्ण होती शिला
उच्छ्वासावरतीं तुझ्या विहरतो पुष्पांतला सौरभ
सेवायास तयास सज्ज जमतो भौंतीं अलींचा थवा
लागे भव्य गिरीस नित्य वणवा श्वासानलें माझिया
माझा वास न साहुनी निवसती गिर्यंतरीं श्वापदें
शोभें लास्य तुझ्यापुढें मधुर तें देवांगनांचें सदा
दैत्यांचें घनघोर तांडव परी माझ्यापुढें चाललें
आले मंगलभाव एकवटुनी जेव्हां विधीच्या हृदीं
वाटे त्या समयास मूस तनुची त्यानें तुझ्या ओतिली
सर्वांगें असुरासवें झगडतां क्रोधानलें पेटलीं
त्याच्या हातुन तेधवां उतरली माझी कठोराकृती.

* * *

इंदूची पण बोलतेस महती वाढे रवीच्यामुळें
घेतों यास्तव मी सदैव तुजला कक्षेमधें आपुल्या.

५८. चंद्रकेतु

[श्री० शंकर लक्ष्मण थोरात. जन्म सन १९०५. हे इंदापूर येथें शिक्षक आहेत. पुणें ट्रेनिंग कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षेंत सन १९२४ सालीं यांचा पहिला नंबर आला होता. प्राथमिक शिक्षकांच्या उपयोगाकरितां 'शिक्षक' मासिकांतून यांचें "अध्यापनदीप" म्हणून एक पुस्तक प्रसिद्ध होत आहे. त्याशिवाय बालवाङ्मयांत भर घालण्यासाठीं "रामाची कथा" हें पुस्तक त्यांनीं प्रसिद्ध केलें असून लवकरच "पांडवांची कथा" हें त्यांचें पुस्तक प्रसिद्ध होणार आहे.]

१. शब्द !

या विश्वामाजीं बहुविध दृश्यें दिसती
देखतां भावना हृदयीं नाना उठती
कल्पनानिलाचे प्रचंड सुटतां झोत
शब्दांस गुंफिते स्फूर्ति-देवि कवनांत
हृदयांत उमटतां ठसा बाह्य सृष्टीचा
तो बंध तुडवुनी येई हृत्प्रांताचा
भांडार वसे जें सरस्वतीच्या निकटीं
प्रकटवी स्फूर्ति तें विश्वाच्या या हाटीं
कवि, शिलपकार मग उभवी नव काव्याचे
प्रासाद रम्य ज्या अधिष्ठान शब्दाचें
नच शब्दमहति ही व्यर्थ गातसे गीतीं
ब्रह्माण्डा व्यापी 'शब्दब्रह्म' तें अंतीं
उपनिषद् गाइचें दुग्ध शब्दपात्रांत
दोहिलें प्रभूनें ब्रह्म असें जें मूर्त
मुनि व्यास वाल्मिकी शौनिक शुक जे झाले
शब्देंच तयांनीं ईशातें गौरविलें

श्रीज्ञानेशाची ओवि वाणि तुकयाची
शब्दांत वसतसे रचना ब्रह्माण्डाची !
जें साधन भगवद्गुणगानाशीं होतें
त्या 'शब्दब्रह्मीं' काव्यदेवता रमते !

---

२. गोफण-गुंडा

[फुलवेली]

गोफण-गुंडा । हा स्वातंत्र्याचा झेंडा
भरास शाळू आला सारा । पक्षीगण उडतसे भरारा ।
देत न कोणी त्यांना थारा
निघे हाकारा । घेतात फेर चौफेरा १
कणसांमाजीं दाणे भरले । सुवर्णमणि ते शोभुं लागले ।
आसमंतिं तत्तेज फांकलें
नेत्र भुकेले । रंगुनी दंग मन झालें २
सुवर्णमणि ते भक्षायाला । तेजरसीं त्या पोहायाला ।
पक्षीगण जो धांवत आला
नसे त्या धीर । जणुं सुटले सौं सौं तीर ३
पक्षी आतुर मणि भक्षाया । दक्ष शेतकरि ते हांकाया ।
वेळ न दवडी कोणी वायां
निघे हाकारा । घेतात फेर चौफेरा ४
मायभूमि हें शेत आपुलें । सुवर्णकणसांनीं तें भरलें ।
सुवर्णभूमि नांव शोभलें
विलया गेलें । पक्ष्यांनीं तें भक्षीलें ५
दूरदेशिं हे वसती पक्षी । पिकल्या शेतांना नित लक्षी ।
धन्या न भीती, धान्या भक्षी
उडती स्वैर । चोर ते परी शिरजोर ६

शेतकऱ्या तूं जागा हो रे। गोफणगुंडा हातीं घे रे।
हाकाऱ्याची त्या नच क्षिति रे
काढुनी बार। घे फेर त्वरित चौफेर ७

धान्य भक्षिती पक्षी सारे। घरीं उपाशी मरती पोरें।
नीज टाकुनी जागा हो रे
करीं घे गुंडा। सत्वरीं उभव तूं झेंडा
गोफण-गुंडा। हा स्वातंत्र्याचा झेंडा ८

५९. सिद्धेश्वर वासुदेव कुलकर्णी

[यांचा जन्म १९०५ सालीं झाला. त्यांच्या कविता 'आनंद' वगैरे मासिकांत प्रसिद्ध होतात.]

१. विनोद-लहरी

[चाल—चंद्रकांत राजाची, कन्या०]

" वाट कुणाची बघतां वहिनी ! उत्कंठित नयनें !
कां हो द्वारीं उभ्या राहिल्या अशा म्लान वदनें ? " १
'थट्टा करितां वन्सं किती हो ! वाट न मी पाहीं
सहज येउनी द्वारासन्निध उभी अशी राही' २
" फेऱ्या तुम्हि या कशास करितां बाहेर नि आंत ? "
'करमत नाहीं म्हणुनी ऐसें वसल्यें मी फिरत' ३
" करमणुकीचा विषयचि तुमचा आतां येईल "
'वन्सं ! थट्टा किती करावी ! पहा काळ वेळ' ४
" म्हणुनच कां तुम्हि वेला-दर्शक घडिघडी बघतां ? "
'छे, कोठें हो ! सहज पाहिलें ! असें काय करतां ?' ५
" वेड्यासम कां राजमार्ग हा बसतां न्याहळत ? "
'जाणारा-येणारांची मी मौज राहि बघत' ६
" मौजेमध्यें मौजेचा तव विषय येइ काय ? "
'थट्टेला या तुमच्या नाहीं मुळिंच हात-पाय' ७
" हातापायांची थट्टा कां रुचते तुज वहिनी ? "
'इश्श बाइ ! हें काय बोलणें ! जात्यें मी इथुनी' ८
" जा. पण द्वारीं येउं नका हो फेरी घालाया
अर्धा घंटा उशीर आहे दादाला याया " ९
'अर्धा वा एकही असो द्या काय मला करणें ?'
" वदन बोलतें; उत्कंठित ना झालीं पण नयनें ? " १०

'फारच मागें आज लागतां काय तुम्हां झालें !'
" मला कांहिं नच; दादाचें पण वेड तुम्हां जडलें " ११
'वेड कशाला लागणार मज ? कांहीं तरि वदतां'
" तुम्हां नाहिं तर कोणाला मग ? सांगा मज आतां १२
पाहिलेंत कां वहिनी ! इकडे मौज कशी होई "
'कुठें.. इश्श...काय हें ! घरांतच्चि जात्यें मी बाई' १३

---

२. स्मृति !

[चाल—निघे दर्शनाला०]

स्मरतो निज-हृदयीं । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ ध्रु०॥

कालिंदीतटिं वंजुलकुंजीं ।
भ्रमरतती ज्यांवरि करि रुंजी ।
शुभ्र सुमें हांसती वरी जीं ।
तोडुनि करिं घेई । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ १

मित्रराज उदयाचलिं आला ।
सुवर्णकांतीमय करि भूला ।
हेमद्वारका गमे मनाला ।
मंगल त्या समयीं । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ २

मंद समीकरण पूर्वेकडला ।
वेलीसंगें करितो लीला ।
मंदलहरि येती तटिनीला ।
काल मोददायी । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ ३

तरुवरतीं खग गाणें गाती ।
भाट सत्य; प्रभुस्तोत्र बोलती ।
वाहे तटिनी मंद मंद गती ।
ईश नमन करुनी । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ ४

प्रेमानें सुमनें तोडोनी !
सप्रीतीनें ग्रथनीं गुंफुनि ।
पंचारतिनें करिं । घेवोनी ।
आलें त्या ठायीं । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ ५
यथासांग तव पूजा केली ।
गळ्यांत तव म्यां माळ घातली ।
तुजवरुनी आरति ओंवाळिली ।
दृष्टि मुखीं लावी । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ ६
मंद हास्य तव वदनीं आलें ।
माझ्यावरतीं नेत्र रोखिले ।
हृद्गत तव मीं तदा जाणिलें ।
अधोमुखी होई । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ ७
बैसविलें कर धरुनी अंकीं ।
स्वकर माझिया गळ्यांत टाकी ।
प्रचलित अधरां देखुनि झाकीं ।
कपोळ निज-हातीं । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ ८
काढि बांसरीचे आलाप ।
ऐकुनि, स्कंधीं आली झोंप ।
न कळे आले केव्हां गोप ।
एकरूप होई । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ ९
गेला कायेंतुनि जीव प्राण ।
स्मरेल मजला मंगल तो दिन ।
विस्मृति त्याची मज घडणार न ।
स्मरतो निज-हृदयीं । तो दिन । स्मरतो निज-हृदयीं ॥ १०

६०. गोदातनय

[श्री० नरहर परशराम महाजन. जन्म सन १९०५. हे इंदापूर येथें शिक्षक आहेत. यांच्या स्फुट कविता चित्रमयजगत्, काव्यरत्नावलि, आनंद इत्यादि मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. यांनीं लहान मुलांसाठीं 'शिवाजीची कथा' व 'बलवान् मारुती' हीं पुस्तकें लिहिलीं आहेत.]

१. 'स—'साठीं

किती वानुं तुज काव्यप्रांतीं नगांत मेरू जसा
तुजसाठीं नच काव्य लिहिलें कवी कुणी न असा ! १
काव्य-देविच्या कंठीं रुळते जी मौक्तिकमाला
मुक्तिमणी तूं कौस्तुभ तींतिल असशी गमत मला २
जनीं, विजनीं, गृहांत, दारीं, नभांत वास तुझा
रूप चिमुकलें अभिमन्यूपरि पराक्रमांत खरा ! ३
तळीं तळवटीं तरूशिरावरि जलांत रे, भ्रमशी
सर्वांच्या परि प्यार जिवाचा झालासें गमसी ४
जिकडे जावें तिकडे दिसते अद्भुत तव करणी
नवरस भोगायाचा दिसशी तूंची एक धनी ५
नवकवितेच्या कल्पकतेचा ठेवा सांपडशी
कवीस, म्हणुनी एक दिलानें त्वन्महिमा गाती ६
धन्य खरोखर, धन्य कवीच्या हृदयाचा झोला
तुजसाठीं हा हृद्पुष्पाचा हार असे केला. ७

२. फुलती कलिका

कलिका फुलते—स्वच्छंदें हंसते, डुलते ॥ ध्रु० ॥

अल्लड बाला मजला गमते
उद्यानीं त्या स्वैर विहरते
निज तेजानें वना नटविते
खेळे खेळ—प्रणयाचा प्रणयिं विलोल १
लचके, हलती केंस भुरभुरे
मुरडे, होती नेत्र किलकिले
हंसते, पडती गालीं खळगे
प्रणयी लीला—सांगुं त्या कशा कोणाला ? २
गालावरली लालि लाजवी-
गुलाबासही जशी मोहवी-
इंदु चवथिचा, मानस भुलवी
मुग्धा बाला—प्रणयाकुल हो वेल्हाळा ३
उषासुंदरी सायंकाळीं
नाथा पाहुनि प्रणयें नटली
गुलाल वुक्का गगनीं उधळी
चित्तीं धाली—ऐशा ती थाटें सजली ४
नाथ जवळि भेटाया आला
थरथर कांपे अंगीं बाला
रोमांचित हो मुखेंदु खुलला
विव्हल झाली—संगमास उत्सुक गमली ५
गुं गुं गुं गुं प्रणयवचानें
बाला खुलवी देउनि वचनें
शतधा घेई मधुर चुंबनें
कलिका फुलली—आलिंगन देती झाली ६

६१. धनाजी गोपाळ गायकवाड

[जन्म सन १९०५. जात मराठा. इंटरमीजिएटपर्यंत शिक्षण झालें आहे. हल्लीं अडावद येथें इंग्रजी शिक्षक आहेत.]

१. चंडोल

[गझल]

उंच गगनीं घे भरारी। ना दिसे काया जरी
नाद येई कर्णरंध्रीं। वृत्ति होते बावरी
ये जरा खालीं असा तूं। पाहुं दे तव रूपडें
भव्य गगनीं ही लकेरी। नाद भरते चहुंकडे
आरक्त वस्त्रां लेउनीयां। देवि संध्या ठाकली
पूर्वभागीं चंद्रमाही। ऐकतो गानावली
उडुगणीं नांवाजलेल्या। सारिका अन् कोकिळा
गायिका गातील गाणें। तूं गवय्या त्यांतला
स्वर्गलोकीं अप्सरांचें। गीत वा गंधर्व त्यांचें
देवता दरबार शोभे। हो 'वाहव्वा' गान साचें
प्रेषिल्या वन-देवतांना। स्वर्गलोकींच्या इथें
गानलुब्धा फार त्याही। गंधर्व त्यांचा तूं इथें

❧ ❧ ❧

तान घेतां उंचशी तूं। ये उमेदी ऐकुनी
निर्जीव माना डोलवीती। गानामृतातें पीउनी
बोल उठतां सृष्टिदेवी। भानरहिता जाहली
शोधिते गानानुरोधें। ओढणी तिज लागली
ऐकवी जो नाद संतत। ना विटे तल्लीनता
घे मधूनी तूं लकेरी। कां अशी शालीनता?
सृष्टिच्या पृष्ठावरी जें। गीत लिहिलें छानसें
उंच जाशी गावयाला। तें दिसे तें नीटसें

मालिकेमाजी वनांच्या । स्वैर गाणें गा तुझें
बेसूर कैशी तार झाली । बोल कां तरि थांबले?
थांबतां गाणें तुझें कीं । वाढवी आस्तब्धता
चेतनाविरहीत सृष्टि । क्षोभवी भेसूरता
दग्ध दुःखी मानसाला । गानमंत्रा टाकुनी
पालटी वृत्तीस तीच्या । शोक तीचा मंत्रुनी
तत्त्ववेत्ता तूं जगाचा । मोदवृत्ती वाणते
स्वैरतेची पूर्ण मूर्ति । आधीनता तुज जाचते
गरगरा गगनांत गिरके । आत्मीयता विसरून घे
मुक्त कंठें आळवीशी । ईशरूपांसारखें
स्वर्गवासी देवतांना । गान रुचलें जेधवां
रत्नराशी तारकांच्या । त्या धरेप्रति फेंकिल्या

---

२. लतिका

[वृत्त–शिखरिणी]

विराजे वृक्षाच्या तनुवरि अहा ! रम्य लतिका
समालिंगी जैशी कुणि दयित-कंठास रासिका
तियेला पाहोनी कवि-हृदयिं जे भाव उठले
तयांनीं हें येथें प्रकट कवितारूप वरिलें
सुमें जीं त्वद्देहीं विकसित अहा ! होति लतिके !
वहाशी तूं देवी ! पतितनुवरी गे स-कुतुकें
पतीच्या वर्णाशीं सदृश तवही वर्ण हिरवा
समानांचा झाला रुचिरतर हा संग बरवा !
किती आहे प्रेम स्वपतिवरि गे भाव-सरले !
स्वपर्णांनीं त्याचे श्रम हरिशि तूं वायु-चपले !
न यावा कीं आतां पुनरपि वियोगक्षण तसा
म्हणोनी त्वां प्रेमें हृदयिं धरिला वल्लभ असा

समालोकोनीयां सुखद तव संयोग नयनें
प्रिया आलिंगी कीं निषदपतिला निर्मळ मनें
गमे मातें कीं तूं मदनरमणी सत्यचि रती
असावी कीं राधा विमलहृदया कृष्ण निकटी
असो तूं कोणी गे ! नमन तुझिया देवि ! चरणीं
समर्पीं मी तूंतें कवनकुसुमें पुष्पजननी !

६२. मधुप

[श्री० गंगाधर कृष्णराव कुलकर्णी, बी. ए., एलएल्. बी. यांचें उच्च शिक्षण फर्ग्युसन व पुणें, लॉ-कॉलेजामधून झालें. हे हल्लीं धुळें येथें वकील आहेत. फर्ग्युसन कॉलेज त्रैमासिक, काव्यरत्नावलि इ० मासिकांतून 'मिलिंद' या टोपण नांवानें यांच्या कविता आलेल्या आहेत. 'कवि आणि फुलें' व 'श्रीअवचित् हनुमान' हीं दोन लहान खंडकाव्यें यांनीं लिहिलीं आहेत. हे संस्कृतमध्येंही चांगल्या कविता करतात.

१. कुणाचें काव्य

हें काव्य कुणाचें ? कोण देतसे स्फूर्ति ?
हीं फुलें कुणाचीं ? कुणीं पसरिली कीर्ति ? १
ह्या हृदयसुमातें फुलवी मोदें कोण ?
ह्या मानस-लहरी उचंबळवि तरि कोण ? २
ही अन्तर्वीणा छेडी कोण मुदें कीं ?
ही विचारतंत्री जोडी कोण तया ती ? ३
ही काव्यकुमुदिनी;–शशांक परि तो कोण ?
या प्रणय-चातका अमृत-अम्बुद कवण ? ४
ही मुकी सारिका;–धनी शिकविता कोठें ?
ही सखी नायिका;–प्रेमळ नायक कोठें ? ५
ही हृत्सारंगी मोहवि जगताहि सारें;
तूं सांथ करिसि त्या;–गायक परि तव कोठें ? ६

* * *

हे विचार मनिंचे जागृत होतां जाण
मन तल्लिन होतें मूढहि जात बनून ! ७

* * *

या हृदयसागरा चंद्रचि तूं दे भरती
दे मानस-मधुपा अरविंदहि तूं प्रीति ! ८

या हृदयपटावरि लिहिशीं प्रेमें जेव्हां
ती विचार-माला दिसे दृश्यपटीं तेव्हां ! ९
किति मुग्ध कृती तव प्रेमहि मुग्ध किती तें !
ही विमल स्फूर्ती बाह्य सृष्टि मग येते ! १०
मग सांग कुणाचें काव्य असे हें साचें ?
त्या म्हणूं कसा मी तुझें असुनिही माझें ! ११
हा 'मधुप' दीन तरि तव पदकमलीं लीन
परमेश ! तुझा प्रिय करुणसागरीं मीन. १२

---

२. तापीवर्णना

[श्रीअवचित् हनुमान् या नांवाचें प्रस्तुत कवीचें एक लहानसें खंडकाव्य आहे. त्यांतील हा उतारा आहे.]

[वृत्त—मंदाक्रान्ता]

वर्षाकाळीं हंसत मिळण्या ओघ ते निर्झरांचे
ज्या माझारीं जलदगतिनें धांवती चंचलेचे;
ऐशीं खोरीं अमित असतीं रम्य जीं यत्-तटाकीं
शान्ता ऐशी तटिनि दिसली पावना स्रोतसा कीं ! १
कांठीं मोठे दरड वरतीं वृक्षराजी मुळीं न
पात्रीं कोठें खडप अथवा सैकता-खंड तो न;
तेथें वाहे विमल सलिलें स्रोत शांतस्वनेचा
त्या 'तापीचा' प्रवितथ जगीं 'सूर्यकन्या', तियेचा ! २
शुद्धत्वानें विमल शिकवी जीं सलीलें मनाला
शीतत्वानें हरुनि सुखवी क्लेशदुःखा तनूला;
शुभ्रत्वानें कलुष हरि जे तोषवी स्वांततेला
शान्ता ऐशी सहज वितरी शांतता हे जगाला ! ३
पावित्र्यानें अवतृत गमे स्रोत मंदाकिनीचा
चंद्रग्रावा वितरुनिच कीं स्रोत वाहे रसाचा !

किंवा वातें पदर ढळतो शुभ्र देवांगनेचा !
शान्ता ऐशी वितरि सुषमा-स्नेह त्या चंद्रिकेचा ! ४
वाटे किंवा विमल रशना केंवि ही भू सतीची ?
किंवा डोले अखिलवसुधाहास्यवीची सदाची !
चाले किंवा धवल-तटिनी स्रोतसी पुण्यगंगा !
शांता ऐशी जगतिं स्रवते पीयुषी तापभंगा ! ५

सद्भावांचा विमल अथवा ओघ हा मंद मंद;
सत्काव्याचा मधुर अथवा वाहतो हा मरंद !
स्फूर्ती देवी सहज फिरतां पातली कीं महीला,
तीच्या गानस्फुरणसरणीं स्यंदिते या रसाला ! ६
स्वर्देवीच्या कबरिमधुनी पुष्पस्रग् ही गळाली !
श्रीविष्णूची सहृदयप्रिया वैजयंती गळाली !
श्रीब्रम्हयाची अविरत इथें हालते वेदवीची !
वारी नोहे प्रकटित इथें कल्पना शंकराची !! ७

केव्हां शोभे जलमणिपरावर्तनें रश्मिजाल !
केव्हां हासे मरुतलहरीकंपि तो वीचिजाल !
केव्हां सूरीं पवनभरणीं गातसें दिव्य गान !
शांता ऐशी विमलहृदयीं जोजवी काव्यगान ! ८

६३. दामोदर महादेव गोविंत्रीकर

[यांचा जन्म सन १९०३ सालीं पुणें येथें झाला. हे हल्लीं लॉ कॉलेजांत एल्एल्. बी. वर्गा व फर्ग्यूसन कॉलेजांत बी.एससी.च्या टर्म्स भरीत आहेत.]

१. अमावास्या

सलील कुतुकें पहात असतां इन्दू भूवरती
तोंच तयाच्या दृष्टिस पडली नलिनी ती युवती
मुग्धा कलिका यौवनयुक्ता बघतां चंद्रानें
विद्ध जाहलें हृदय तयाचें मदनाच्या बाणें
नलिनी प्रेमें जलाशयीं निज विहरत सौख्यानें
विहायसाची शोभा बघतां हरिलें तिज विधुनें
बघुनी विधुला खुदकल् हंसली नलिनी प्रेमानें
फुलली कलिका चोरुन बघते गहिऱ्या नजरेनें
'आजवरी मी इथेंच राहें पाहियलें बहुतां'
अपूर्व मम कां स्थिति ही व्हावी आजचि ह्या बघतां?
'वदे स्वतःशीं असें काय हें मम हृदयीं होत!
"प्रेमानें" तो शब्द स्फुरला नलिनी-हृदयांत
वसंतयौवन-बहरकालिं या मदनाच्या बाणें
विकल जाहलें हृदय सखीचें रमण-दर्शनानें
प्रतिरात्रीं मग वाट पाहि ती सरोवरीं बसुनी
सोत्सुक तरला प्रेमातुर जी आनंदें नलिनी
विधुही प्रेमें तिजला नेमें भेटाया येत
असा चालला क्रम नित्याचा योग न परि होत
परस्परातें सलोल बघतां सदा निशा जाई
संगमसुख नच कधीं लाभता विकल होत हृदयीं

निष्ठुर दैवें दिली न शक्ती तिजसी वर जाया
अदय विधीच्या नियमें खालीं शक्त न कुणि झाला या
मुक्या मनाचे मार सोसुनी एकमेक रडतीं
प्रेमाला कां वदण्याची ती माहित ना रीती !
अनेक गेले दिवस असे ते त्यांचे ह्या स्थितींत
प्रेमानें ती व्याकुल झाली झुरती विरहांत !
इकडे लागे क्षय चंद्राला बघुनी त्या भारी
दुःखित नलिनी नयन-जलातें गाळी कासारीं
अवसेच्या निशिं समूळ झाला चंद्राचा अंत
सवेंच नलिनी म्लान होउनी बुडली सलिलांत
अशीच जगतीं अनेक प्रेमी झुरुनि किती असती
मेली, मरतचि असतिल, मरतिल स्वर्गीं जी मिळती

६४. भवानीशंकर श्रीधर पंडित, बी. ए.

[जन्म सन १९०६. यांचें प्रवेशपरीक्षेपर्यंतचें शिक्षण अजमेर व जोधपूर येथें झालें. पुढील शिक्षण नागपुरास होऊन तेथील विश्वविद्यालयाचे ते बी. ए. आहेत. सध्यां ते एम्. ए. व एल्एल्. बी.चा अभ्यास करीत असतात. त्यांची स्फुट कविता मनोरंजन, रत्नाकर, आनंद, काव्यरत्नावलि इ० नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असते. यांच्या कविता बांधेसूद व हृदयंगम असतात.]

१. हंगामांत !

[राग–देस]

वलज हें हले गे सळसळुनी
कलगान झरी करि झुळझुळुनी ॥ ध्रु०॥
माहुत फुंकी शीळ बनांतुन
अलक चुंबिती मधु हसितानन
अंचल वरिवरि उडे भेदरुन
किति सांवरशिल तो फिरफिरुनी ? १

एकलीच तूं पिकें कापसी,
गवताचे तूं भोर बांधिसि
आणि तयाच्या रचशी राशी
गे ! खपसि इथें तूं गुणगुणुनी २

गुणगुणसी किति मधुरालापें !
करीं सारखें चालें खुरपें
किंकिणि नादति भानच हरपे !
छेडती लकेरी रुमझुमुनी ३

तुझा मनोरम मधुर मधुर स्वन
काय त्यापुढें कोकिलकूजन !
वाटे नीरस अलिचें गुंजन !!
विरमोनी बुलबुल लपे वनीं !!! ४

खुलवी तव छबि कोमल रविकर
तरू उधळिती फुलें मनोहर
पातीं डुलुनी मधेंच सादर
भेटती प्रमोदें कडकडुनी ५
हृदयंगम श्रुतिमोहक गीतीं
नितान्तमंजुळ ताना झरती
खळबळ खळबळ हृदयीं करती
सूर सूर विरघळती श्रवणीं. ६

---

२. तारूं

[चाल—नैयां वही जात०]

तारूं कसें तारुं ? ॥ ध्रु० ॥
फुटकें जरासेंच
माझें मला हेंच लागे पथीं ठेंच
कैसें सुधारूं ?-तारुं कसें तारूं ? १
वेगें पुढें जात
धांवे प्रवाहांत देऊं कुठें हात ?
कैसें सहारूं ?-तारुं कसें तारूं ? २
झोतावरी झोत
झंझाविते वात घोंटाळतें त्यांत
कैसें निवारूं ?-तारूं कसें तारुं ? ३
उलटे, सुधे फेर
गिरगीर चौफेर घेतां कसें स्वैर—
बाजूस सारूं ?-तारूं कसें तारुं ? ४
अंधार या पार !
अंधार त्या पार !! फुटलें वुडीं पार !!!
कैसें हकारूं ? तारूं कसें तारुं ? ५

गात्रीं नसे त्राण
नेत्रीं वसे प्राण लाचार हैराण
सारे उतारू !–तारूं कसें तारुं ? ६

मी हीन, मीन
पायीं प्रभो ! लीन हांक तुझ्यावीण
कोणास मारूं ?–तारूं कसें तारुं ?

---

३. प्रबोधन

[वृत्त–पंचचामर–गज्जल]

उठून एकदां तरी गडे ! जरा पहा बरें
दिशादिशांतुनी कसें यथावकाश झांजरें ! ॥ ध्रु० ॥

खुले निळया नभोंऽगणीं
सतेज शुक्र चांदणी
सुरम्य संधिकालिं या दिसे समस्त साजिरें १

जमें अधांतरीं मुन्हें
चिकाळ दाट पांढरें
तयांतुनी दंवांबुचा विशुद्ध स्रोत पाझरे २

पुन्हा पुन्हा मघापुनी
समित्र कुक्कुटाग्रणी
विराम घेत आरवे उदग्र कर्कश स्वरें ३

सुरालयीं पलीकडे
सताल चौघडा झडे
सुरेल नाद वेणुचा कणाकणांतुनी शिरे ४

निनादणें जसेंजसें
भरास ऐन येतसें
हळू हळू तसें तसें नभास येइ जागरें ! ५

करून कांकडारती
द्विजादि मंत्र गर्जती
पळांत वायुमंडलीं पवित्र घोष तो विरे ६

रचून संघ संगतीं
नभांत मंडलाकृती
मजेमधें भरारतीं करीत शब्द पांखरें ७

चरावयास शाद्वलीं
निघे चतुष्पदावली
विगूढ घुंगरध्वनी पथीं सभोंवतीं भरे ! ८

धरून नाचऱ्या करीं
अभीर गोड पांवरी
तियेस संघ वाजवी स्वकीय कंपिताधरें ९

शिरीं दुधाणि घेउनी
पुरीस येति गौळिणी
सलील मंद नादतीं तदंघ्रि मंजु नूपुरें ! १०

प्रभात-वात संचरे
द्रुमाद्रि डोलती त्वरें
फुलांफुलांवरूनिया प्रसन्न चंचरी फिरे ११

उदे हिरण्यगर्भ हा
प्रकाशती दिशा दहा
करूं तयास ऊठ गे ! नत प्रणाम आदरें १२

६५. गणेश हरि पाटील

[जन्म सन १९०६. हे जातींनें मराठा आहेत. हे हल्लीं फर्ग्युसन कॉलेजांत सीनियर बी. ए. च्या वर्गांत आहेत. यांचीं स्फुट काव्यें मराठी नियतकालिकांतून मुद्रित होत असतात. यांना बाल-गीतें लिहिण्याची आवड असून त्यांनीं मुलांसाठीं सुंदर कवितांचा एक सचित्र संग्रह 'बाल–शारदा' या नांवाखालीं नुकताच प्रसिद्ध केला आहे.]

१. कल्पिलेला कल्पांत

[सुनीत]

तातानें लिहिलीं सुबोध वचनें भिंतीवरी तेथल्या
चित्रें रंगविलीं, तशाच कविता मीं तेथ आलेखिल्या
ताईनें स्व-करें सुरेख विविधा रंगावली काढिल्या
बाळानेंहि बघून हें चिमुकल्या रेघा तिथें ओढिल्या
आला घेउनि कुंचली नर कुणी त्यानें सफेती दिली—
भिंतीला; मग आमुच्या सकलही कारागिरी लोपली
योग्याची मति निर्विकार, गमली ती भिंत तैशी मला
सृष्टीचा पट दृश्यमान मजला ठायीं तिच्या जाहला
सिंधू, शैल, जलप्रपात, तटिनी, विस्तीर्ण तें सैकत,
रम्य द्वीप, दरी, भयाण विपिनें, ज्वालामुखी पर्वत,
निर्मी हे विधि भू-पटीं; उपवनें, प्रासाद, देवालयें,
लेणीं, स्तूप, विहार, दुर्ग, नगरें हीं निर्मिलीं मानवें.
हातीं घेउन काळपूरुष भला तो आपला कुंचला
हें टाकील पुसून, पांडुरकळा येईल या पृथ्विला

२. एकच

ही एक तुझी जळती पणती
उजळील दिवे लाखोंगणती
काळोखाची कभिन्न काळी
छाया जी पडली अवकाळीं
बसेल दडुनी ती पाताळीं
आणील दिवाळी मिणमिणती–
ही एक तुझी जळती पणती १

ही एक तुझी सच्छिल वृत्ति
निर्मील संत सारे जगतीं
मित्रांचा जरि तुटला थारा
ना धन, ना परदार, न दारा
अशा विपत्तित तरिहि उदारा
जमवील भक्त तुझियाभंवतीं
ही एक तुझी सच्छिल वृत्ति २

हा एक तुझा सुत एकुलता
परि वाढवील तव वंशलता
गत बाळांच्या शोकानें मन–
जळून गेलें आशेचें सुम–
होरपळे, फिरुनी तेथें पण
फुलवील सारखी वत्सलता
हा एक तुझा सुत एकुलता ३

ही एक चेतनेची ठिणगी
लाविल आग जागोजागीं
देश अचेतन भडका उडतां
पुन्हा सचेतन होइल पुरता
लढेल स्वातंत्र्याच्याकरितां

भरवील नवें वारें अंगीं
ही एक चेतनेची ठिणगी. ४

३. मंदिल

पाहुनी लाल मंदिल
किति खुलें जाहलें दिल !
हा अजून दावी बाणा निज, कोठला कोण पाटिल? १

जरतारीच्या झिरमिळ्या
बाजूस जरा लोंबल्या
लखलख करुनी, मधेंच भुरभुर उडति कधीं मोकळ्या २

किति कपाळपट्टीवरी
शोभे ती फक्कड मिरी
रुंद तीवरी पट्टा खुलतो लाडभडक कितितरी ! ३

अशि डौलदार बांधणी !
हा मंदिल बघतांक्षणीं
स्मरे 'मराठेशाही' मागिल जिचा जिवाजी धनी. ४

६६. दत्तात्रेय कृष्ण हेवाळकर, बी. एस्सी.

[जन्म १९०७. सर परशुरामभाऊ कॉलेजमधून बी. एस्सी. ची परीक्षा पास झाले आहेत. यांच्या कांहीं कविता 'रत्नाकर' मासिकांत आल्या आहेत.]

१. त्या गोष्टि काव्यांतल्या !!

माझ्या हौस मनांत फार मज कीं वाद्यांतलें कौशल
व्हावें प्राप्त, म्हणूनि बांसरि नवी मीं आणिली मंजुळ
संगें मार्गानिदर्शनार्थ म्हणुनी 'गाईड'ही आणिलें
'सा रे सा नि प ध' अशा टकळिनें सर्वां जनां त्राशिलें
शेजारी म्हणती, " नशीब असुचें ! शेजार याचा अम्हां ! "
माझे मित्र न कोणिही फिरकती माझ्याकडे तेधवां
सर्वांनीं मिळुनी मला विनविलें, " हा नाद सोडा बुवा !
किंवा आपण हें बिऱ्हाड बदला, देऊं तुम्हांला दुवा ! "
सारा वेळहि खर्चुनी मम गती गेली न 'सा री' पुढें
चीजा येतिल त्या कुठून मजशीं ? तों मानसीं मी चिडें !
" कृष्णाची मुरली पडून श्रवणीं धेनूहि वेडावल्या !
खोटें तें अजिबात संशय नको, त्या गोष्टि काव्यांतल्या !! "

---

२. कोडें

कोणी एक सुरम्य बालक निघे शाळेंतुनी खेळुनी
मार्गीं मोफत-वाचन गृह दिसें तेथें शिरे तत्क्षणीं
होते वाचित लोक त्यां बघुनियां त्यानें करीं घेतलें
मोठें सुंदर वृत्तपत्र, जरि तें होतें जुनें कोठलें !
बोटें ठेवुनि वाचतां जन तया, " ही काय पीडा पहा !
जाई येथुनि ! " बोलती कटुवचें त्यांना न त्याची स्पृहा

" वाची मी गृहिं जेधवां, कितितरी आई प्रशंसा करी
यांना कां न रुचे " असें शिशुप्रती कोडें पडें अंतरीं

---

३. एक शंका

" आई ! आइ " म्हणूनि बाळ रडतां, माता जवें धावुनी
पाही तों सुकुमार 'माधव' पडे धोंड्यास ठेंचाळुनी
देण्या हात तयास जात असतां " आऽऽई " असा शब्द ये
मागें पाहि वळून तों चिमुकला 'कान्हा' भुईसी पडे
त्याला सोडुनि धावली जननि ती कान्हाप्रती सत्वरीं
त्यातें घेउनि चुंबुनी पतरली मागें पुन्हा बावरी
दोन्हीही छकुलीं तिला असुनियां प्राणांहुनी प्यार तीं
ऐसा भेद मनांत कैंवि रसिकां यावा तिच्या संप्रती ?

६७. दत्तात्रेय गणेश जयवंत

[जन्म सन १९०७. हे कायस्थ-प्रभुज्ञातीचे आहेत. यांना कविता रचण्याचा नाद वयाच्या १६ व्या वर्षापासून आहे. यांच्या कविता गृहलक्ष्मी, आनंद, वऱ्हाड-शाळापत्रक, तुतारी, ज्ञानसंग्रह, भारतसेवक वगैरे मासिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध होतात. यांची पहिली कविता "हाय! हाय! आई गेली" ही ज्ञातीच्या "कायस्थ-बंधु" त्रैमासिकांत प्रथमच प्रसिद्ध झाली असून अमुद्रित कविता बऱ्याच आहेत.]

१. आर्यभूमीस—

[मंदारमाला.]

हे आर्यभूमी, तुला वंदितों मी सदा प्रेमभावें मनोमंदिरीं
ध्यावेत मी ऊदरीं जन्म तूझ्या सदा, आस ही फार गे अंतरीं
होतीस तूं स्वर्णभूमी म्हणूनी तुला मान पृथ्वींत होता भला
झालीस आतां दरिद्री म्हणूनी त्यजावें अम्हीं काय गे तूजला १

ठायीं तुझ्या पाहुनी दुर्ग हे मोठमोठे, तशा वाहणाऱ्या नद्या
भावी पिढीला "स्व-स्वातंत्र्य होतें" अशी खास देतील ग्वाही उद्यां
हे तोफखाने, भुयारें, मनोरे, समाधी, तशीं दिव्य देवालयें
हे राजवाडे तुझे भव्य,—छे वैभवाचें तुझ्या गीत गातां नये २

बाजी प्रभू, वीर तान्हा, तुझे लाडके पुत्र हे झुंजले संगरीं
कादंबऱ्या, नाटकें, वाचतों बैसुनी आम्हि हे स्वस्थ पंढापरी
कारागृहीं तूं तुझ्यापायिं ही दास्यबेडी असे आज माते जरी
होऊं नको रुष्ट गे माउली तूं, तुला बैसवूं वैभवाच्या शिरीं ३

लाला, महात्मा, पटेलादि श्रीलोकमान्यापरी वीर राष्ट्राग्रणी
घेती सदा जन्म राखावया लाज तूझी, न चिंता करी तूं मनीं
झाला तुझा पुत्र कैलासवासी जरी आज पंजाबचा केसरी
दुःखीत होऊं नको माउली तूं, तुला बैसवूं वैभवाच्या शिरीं ४

गामापरी मल्ल विख्यात जेथें, महात्म्यापरी देशभक्ताग्रणी
तेथें शकावी कशी तद्गुणा गावया आमुची दीन ही लेखणी ?
माते ! तुला हा नमस्कार माझा, करी वास तूं या मनोमंदिरीं
" स्वातंत्र्य " झेंडा उभारून व्योमीं, तुला बैसवूं वैभवाच्या शिरीं ५

२. हाय ! हाय ! आई गेली

[गझल]

तुझ्या या दीन बाळांची तुला कां कींव ना आली ?
अम्हांला सोडुनी आई कुठें तूं चालती झाली ? ॥ ध्रु० ॥
तुझी नामस्मृती होतां अम्हांला लागतो ध्यास
तुझ्यावांचून अन्नाचा गिळावा गे कसा घांस ?
जगीं या एक मायेची अशी होतीस तूं माता
निवारा आज ममतेचा कुठें लाभेल तो आतां ? १
तुझी ती शाल मायेची अम्हांवरि कोण घालील ?
प्रसंगीं धीर देण्याला अम्हांला कोण येईल ?
अवस्था आमुची झाली जणूं दर्यांतलें तारूं
कुणाला यापुढें 'आई' अशा हांका अम्ही मारूं २
यमाच्या क्रूर दूतांहीं कुण्या ठायीं तुला नेली ?
मुळापासूनि उपटाव्या फुलांच्या कां अशा वेली ?
अरे निष्ठूर तूं काळा कसा केलास हा कोप ?
असा कां पायिं तुडवावा बिजाचा कोंवळा रोप ? २
दयाळू पृथ्विच्या राजा बरेंवाईट होणारें
शुभाशुभ दिवस दाखविणें तुझ्या हातींच ना सारें ?
दिनांचा तूंच ना वाली ? प्रसंगीं संकटीं कालीं
कशी मग आमुची आई अम्हांला पारखी झाली ? ४

६७. मोहन

[श्री० गणेश बाळकृष्ण ताम्हणे. जन्म सन १९०७. यांचें प्रवेशपरीक्षेपर्यंत शिक्षण झालें असून ते हल्लीं मुंबईस एका कंपनींत नोकरी आहेत. ते 'भारतसेवक' या मासिकाचे सहसंपादक आहेत. यांचें बालपण कोंकणांत गेल्यामुळें तेथील सृष्टि-सौंदर्याचा यांच्या मनावर झालेला परिणामच यांच्या काव्यस्फूर्तीचा जनक आहे. यांच्या कविता मनोरंजन, केसरी, गृहलक्ष्मी, काव्यरत्नावलि इ० नियत-कालिकांतून येत असतात.]

१. बाळाची शाळा

पांच वर्षें अजुनी न पूर्ण झालीं
तोंच शाळेची तीव्र गदा आली !
सिद्ध होउनियां बाळ हर्षभारें
निघे शाळेला जावया त्वरेनें ! १
कोट पिवळा रेशमी पातलासे
टोपि जरिची वरि वेलबुट्टि साजे
हातिं 'पाटी, पेन्सील' चिमुकलीशी
हौस मोठी शाळेस जावयाची ! २
करी वंदन मातेस प्रेमभावें
हर्ष मातेचा गगनिंही न मावे !
कडे घेउनि चिमण्यास माउलीनें
मुक्यावरतीं घेतले मुके प्रेमें ३
'भाउ, दादा, आणीक ताइ, माई'
येति, सर्वांची उडे एक घाई !
हेतु, 'चिमणा विद्यार्थि' हा पहावा
कौतुकाचा तो विषय त्यांस व्हावा ! ४
" शिक्षणाचा 'श्रीगणेशा' शिकाया
बाळ माझा शाळेस निघे जाया !

मंगलाशीर्वच हाच तया माझा
विपुल विद्या हो प्राप्त बाळराजा !" ५
तात नेई शाळेस बालकाला
'धुळाक्षर'च्या वर्गांत बैसवीला
इतर सारी 'चिमणीच' फौज तेथें
बाल होई हर्षांत पाहुनी तें !! ६

अशा प्रेमळ ममताळु गुरू तोही
अति प्रेमानें शिष्य जवळ घेई
घडा देई पहिलाच 'श्रीगणेशा'
आणि होई आनंद बालशिष्या !! ७

* * *

सुटी झाली शाळेस; घरीं येई
मिठी मारी मातेस; वदत 'आई' !
हर्ष मातेचा गोड वेळचा या
तया उपमा कोणती नसे द्याया !! ८
दृष्ट काढी माउली जीवभावें
किती मातेचें प्रेम गानिं गावें ?
" धडा बाळा घेतला काय आज ? "
पुसे प्रेमें करुनियां माय चोज !! ९

* * *

तिनीसांजा जाहल्यावरी बाळ
घरीं आला खेळूनि बहू खेळ !
जेउं घाली मग माय तान्हुल्याला
–आणि आईच्या कुशीं झोंपिं गेला !

---

२. गानमुग्धेस !

[जाति—अवनी]

छेड एकदांच तुझा कंठविणा बाले !
उधळि गीतपुष्प गडे ! हृदय अधिर झालें ! ॥ ध्रु० ॥

एकदांच गुंजिलें
पुनरपीं न ऐकिलें
म्हणुनि हृदय मंजुळे ! चंचल हें झालें ! १

उसळूं दे भाव दिव्य
फुलव गडे ! गीत काव्य !
गानमुग्ध मानस हें दिव्य रसिं विरूं दे ! २

लाजरी उषा विलोल
या कपोलिं करित खेळ
गालिंचे पुरे प्रफुल्ल हे गुलाब झेले ! ३

कुंजिं कुंजिं भृंगवृंद
सोडुनी सुधामरंद
सेवाया गीतगंध क्षणभरीं थिरावले ! ४

शांत शांत विश्व गोल
देइ पवन मंद डोल
श्रवण्या तव मधुर बोल दक्ष गानकोकिले ! ५

लागे हुरहूर मना
—आणि जीव होत सुना
छेडुनि मधु गानविणा रिझवि त्या मराले ! ६

घे एकच गोड तान
शांतवी मनास खिन्न
अंतराळिं सौदामिनि क्षणभरीं दिसूं दे ! ७

आतां लावी न उशिर
हृदयाची छेडि तार
राहिना मनास धीर झुलवि विश्व सारें ! ८

६९. शालीनदत्त शिदोरे, बी. ए.

[जन्म १९०८. हे मुंबई विश्व-विद्यालयाचे पदवीधर असून सध्यां नागपूर मॉरिस कॉलेजमध्यें एम्. ए.च्या शेवटच्या वर्गांत आहेत.]

१. प्रेम कीं कर्तव्य ?

[एका कवि-मित्राची कर्तव्यपर कविता वाचून]

—आली जणूं तारका अंबरींची
इथें जीवना जोजवी जागवी
मी मी म्हणालों नरी स्वाभिमानें
मनींची अहंता मनीं मालवी
हासे, विलासें विहारांस येई
जणूं कल्पना मेनकेची फिरे
सारे म्हणे संपले भेदभाव
हरीचीच ही भावना संचरे
झंकार वाजे तुझ्या नूपुरांचा
खळाळे जिवाच्या पदीं शृंखला
मासा रडे आरवे दीनवाणी
सखीच्या स्वनें लाजते मंजुळा
लाली उषेची कपोलीं विराजे
रणीं रक्तिमा मायभू रंगवी
कर्तव्य बोले–'सख्या ऊठ धीरा'
इथें प्रेमगानीं सखी लोलवी
आशा तुझ्या लोचनीं हांसताहे
परी दीनता आसवें गाळते
देवी तुझी मंदता मोहघीते
जडावे निराशेंत माता भिते
माते, तुझ्या कारणीं जन्म जावा
धडाडा रणीं गाजती नौबती

कां देवते, पालवूं जीविताला
मनोभाव वीणारवीं डोलती ३
धागा जिवाचा सुटेना तुटेना
करावें कसें-मोह हा नाकळे
माझी मला जीवता आकळेना
कुठें नाकळे वीरता मावळे
भेरी तदा गर्जते केशवाची
जिथें जीविताची लता डोलते
पार्था, तुझी भीषणा भावना ही
कवीची कवाली कशी सांगले ४
आशातरंगीं झिरे जीवगंगा
निराशातमीं सागराला मिळे
कल्लोलते सागराची भरारी
वृथा पेलते, डोलते, कोसळे
मृत्यूंत सीमांत होईल जेव्हां
रमूं तेथवां प्रेमदेवी तिथें
तेथें सुधा आणि वीची तरंगे
जडानें जडाला मिळावें इथें ५
देवी करूं पूर्तता जीवनाची
रणीं ये थरारे जिथें थोरवी
मृत्यूंत नांदी सखे भावनेची
तशी संगराची म्हणूं भैरवी
प्रेमा, नको मोहवूं जीविताला
क्षमा याचितों मंगले देवते
आतां उडाव्या रणीं रक्तधारा
शिवाची भवानी हृदीं तेवते ६

७०. मंजुमाधव

[श्री० माधव रंगनाथ काळे, नाशिक. डेक्कन-कॉलेजमध्यें कांहीं काळ शिक्षण घेतल्यानंतर हे चित्रपट कंपनींत नटाचीं कामें करूं लागले. यांच्या कविता पुष्कळ काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या आहेत.]

१. कोंकिळेस

[चाल—आनबान०]

गोड गोड गीत झणीं गाइ कोकिले ॥ ध्रु० ॥

भृंग गुंग कमलवनीं
घेति तान खग गगनीं
मुखरित वनिं निर्झरिणी
तूंच कां न बोले ? १

सृष्टिगोपिका नटली
ये वसंत-वनमाली
अधरिं तूंच मधु मुरली
मौन हें न चालें २

मंजु गान ऐकण्यास
ये फुलांतुनी सुवास
पवन त्यजुनि मलवास
भानुकिरण आले ३

सुमसेना मदनाची
अधिर उभी केव्हांची
मधुर समरशिंग तूंचि
कां न सुरू केलें ? ४

आम्रतरूवरि मंजरि
परिमलमय हांक मारि
प्रिय सखिवरि आज परी
रोष कां ग बाले ? ५

तूंच वनाची कविता
जननि तूंच संगीता
गमत श्रवुनि कोमलता
फूल जणूं बोले ६
गान सुधा जधिं वाहि
मुदित होति दश दिशाहि
नर्तन करि निर्झरही
वाजवीत वाळे ७

❀ ❀ ❀

सूर परी परिसुनिया
पुलकित कां मम काया ?
क्षण गतसुख आठवुनिया
अश्रुधार चाले ! ८

---

२. जादुगिरी

[चाल—डोळे हे जुलमी गडे०]

"शिरिं घागर पाझरते मार्ग सख्या रोधुं नका
पाहिल ना कुणि बाई ! टक लावुनि पाहुं नका ॥ ध्रु० ॥

लाडिक तव जादुगिरी
फसणारचि मी न परी
छंद पुरे, नाहिंतरी
घरिं जाउनि सांगुंच का ? १

दूर सरा उरलि नाहिं
जन-मन-लज्जा कांहीं ?
सांज झालि अगवाई !
भलभलतें बोलुं नका २

इतरांसम मी न खुळी
पाडुं नका मज भुरळी
ठेंच पुरी अनुभवली !
फिरुनि न करि त्याच चुका " ३

❀ ❀ ❀

हंसुनि परी वनमाली
घुमवी मग मधु मुरली
नर्तनही करि तालीं
नटवरसा गोपिसखा ४

❀ ❀ ❀

न कळत बाला भोळी
तारेसम थरथरली
बिलगुनि बोले डोळीं—
" सोडुनि मज जाऊं नका " ५

---

३. मन असें कासया गहिंवरतें

मन असें कासया गहिंवरतें
स्मरुनि कुणाला स्मृति रडते ॥ ध्रु० ॥

गत जन्मींचें स्वप्न तरंगे ?
चित्र कुणाचें अंधुक रंगे ?
वेडी मति मम त्यांतच गुंगे
अजुनि न ओळख परि पटते १

गोपीसम ही भोळि कामना
शोधुनि दमली दाहि दिशांना
कोठें लपला न दिसे कान्हा
शीळ जरी ऐकूं येते २

कुठें बोचतो बाण नाकळे
काव्य-पांखरूं व्याकुळ झालें
कुणीं निष्ठुरें रक्त सांडलें
रडत बिचारें भिरभिरतें ३

आशा सोडुनि निश्वासाला
हांका मारी मूक कुणाला
धडधड हृदयीं व्यर्थ कशाला
माझें गूढ न मज कळतें ४

७१. कुसुमाग्रज

[रा० गजानन रंगनाथ शिरवाडकर हे नाशिक येथें असतात. त्यांची रचना दिवसेंदिवस अधिक चांगली होईल अशी त्यांच्या कवितेवरून आशा वाटते.]

१. विरही श्यामला

कुणी श्यामला कोंकणबाला वळते वृषभावली
तृणाच्या तुरळक हिरव्या तलीं
मूर्ति सांवळी नजर बावळी सुखांत तारावली
मारते चमक कानिं चौफुली
रानवळीचीं फुलें रानटी एकदोन पांढरीं
खोंविलीं तुरळक केशावरी
पदर दरिद्री सांडे दौलत सौंदर्याची वनीं
तयाचा कोण असावा धनी
ही श्यामलतेची गोंडस बाला अशी
कां नील नभीं नक्षत्र उगवला शशी
कां प्रीति-देविची समूर्त वाराणशी
तरुततींतुनी अथवा चमके चपला सौदामिनी
नव्हे ही नाचत निर्झरिणी
कुंदकळ्यांचा गेंद गुंफण्या सांगितलें इज कुणीं
एक तें तिलाच ठावें मनीं
राइराइतें नजर धुंडिते धुंडित फिरते कुणां
एक तें कळेल कविच्या मना
श्यामल बन्सीवाला सुंदर सुंदर कावा करी
लागली आस एक अंतरीं
थैमान मांडिते थयथय प्रीती मनीं
तोडुनी बंध ती उडे नभःप्रांगणीं

कीं यावरतीं ही चढुन् शोधण्या धनी
साद घातली मनीं जनीं ती विपिनींही घुमली
बाला जळते विरहानलीं.

---

२. रानवासिनी

निळ्या निराच्या पैल तटाला
पाउलवाटहि पडे न डोळां
रानवासिनी रमणी बाला
राहे एक तिथें
रंजन करण्या मधु बोलांनीं
अथवा गाउनि प्रेमळ गाणीं
नवयुवतीच्या मनोदर्पणीं
कुणि न असे तेथें
गोजिरवाणें फूल एकलें
कुण्या शिलेच्या पाठीं लपलें
दिग्देवींच्या बागेमधलें
नक्षत्रच हांसे
जीवन असलें वनबालेचें
कुणां न ठाउक इहलोकींचें
केव्हां झालें परलोकाचें
हुरहुर हीच मला.



७२. चक्रवाक

[श्री० अनंत रावजी शिंदे. जन्म सन १९१०. हे सन १९२६ सालीं प्रवेश-परीक्षा पास झाले. नंतर कांहीं वर्षें मुंबईला कॉलेजमध्यें होते. हल्लीं रत्नागिरी येथें डिस्ट्रिक्ट कोर्टांत नोकर आहेत.]

१. रम्य काय !

रम्या ती विधुवल्लरी चमकतां शुक्रासवें प्रांगणीं,
त्याचें तेज महीवरी विलसतें ती वेळ रम्या जनीं;
एकान्तीं विजनांत बालसरिता वाहे कुठें संतत
प्रातःकाळिं बलाक तींत दिसतां तें रम्य अत्यद्भुत
तारांचीं अति रम्य दिव्य किरणें तैसेंच तें चांदणें,
तो सूर्योदय, ती प्रभाच न कुणा हें आवडे पाहणें;
पुष्पा पल्लवपाश, काव्य कविला, वा बालिकेला फुलें
दृष्टि स्निग्ध, मनोहरा, स्मितमुखी सारें गमे चांगलें
चित्रें रंगविलीं हुबेहुब पुढें तीं चित्रकारें पटीं
सौंदर्यें श्रम, दुःखताप हरुनी संतोष देती अतीं;
वाद्यांचे मृदु नाद मंगल कुठें गाणें प्रभातीं तसें
आनंदातिशयास देत, विलया खेदास तें नेतसें
हीं सारीं अतिरम्य तुच्छ मज हें होई मनोल्हासक
कोपोपाहित बाष्पसिक्त बघतां काम्य प्रियेचें मुख.

---

२. चंडोलाप्रत—

एकच ऐकिव गान
खगवरा ! जीव करी थैमान ! ध्रु०॥
गिरिमाथ्यावर पठार मोठा,
इथें तिथें बघ हा उंचवटा,

खोल दऱ्या चिंचोळ्या वाटा,
तूं आणिक मी यांवांचुनि तें उगाच येइल कोण ? १

दंवरत्नें वसुधेवर गळलीं
शुष्क तृणें हीं चिंब जाहलीं
धूसर प्राची उजळुं लागली
चलाचलांतुनि चैतन्याचें भरलें वारें फार २

तालवृक्ष हे कोठें कोठें
करवंदीचे इवले फाटे
पथिक एकटा मार्गीं भेटे
पवन शीघ्र तो जाई कोठें घेत कांपरी तान ? ३

वनीं पांखरें किलविल करिती
मी खालीं; परि नभांत वरतीं
अस्मज्जीवांची स्थिर वसती
जगावेगळें जिणें आमुचें वाळवंट वैराण ४

अमरपुरीचा तूं शुभ भाट
सुरां प्रत्यहीं गाउनि गीत
गानसुधेचा पाजुनि घोंट
तूंच तयांच्या चैतन्याची अभंग अभिनव खाण ५

उषा निशेच्या संगमकालीं
गाणें सुचतें तुज आभाळीं
माझ्याही तें लिहिलें भाळीं
करिशि मात परि विलक्षण अशी माझ्यावर तूं छान ६

नीलालय तव सारें सुंदर
अरुणराग हा कषाय फार
त्यांत उघडिला नव चौफेर
संमार्जुनियां उषादेविनें केलें अंगण साफ ७

विरल रक्तिमा तिच्या करींचा
फडके क्षितिजावर तो साचा

त्याच्या संनिध तव गीताचा
निर्झर वाहे; त्यांतुनि द्रव हा खालीं येइ प्रशान्त ८
झेलुनि त्यांतिल मंजुळ सुस्वर
संलापाचे यत्न मनोहर
करी सारखे तुझ्याबरोबर
दुर्लभ तें परि, पुरे तेवढें भागवि रम्य तहान ९
उत्सुकता जी मनीं वागते
गान तिला तव ऐकूं येतें
पडसाद असे अलपचि देते
गोठल्याच पाण्यावरतिं तरी मी सद्म कसें रचणार १०
तुझी खरोखर धन्य वैखरी
गमे सुरस ती गीत अप्सरी
चिन्मोदाचा गंधचि विखरी
मर्त्यसुखाचीं माझीं गीतें दुःखोद्गारचि साच ११
उदधीसंनिध फेन अवतरे
मृगामागुनी मृगी वावरे
तव शब्दांनीं भूत संचरे
स्फूर्तिसतीचें तेंवि अंतरीं नाहीं त्यास मितीच १२
जडसृष्टीच्या तुज कंटाळा
स्वर्गसुखाचा घेशी आळा
विचार मानिं हा एकाचि पिकला
मानवमतिला हेतचि असला कसा कळावा गूढ १३
अदृश्य अससी असा अगोदर
जसा भाविकीं मोद निरंतर
मनासारिखें सुचवी उत्तर
विसर जगाचा पडुनि चित्तनीं होई मानस चूर १४
किंवा निश्चल प्रेमल बाला
मधुर रवें हलवी चित्ताला

वर्धविति मनीं प्रणयकलेला
मुग्धा परि करुनियां टाकिते दयिताला बेहोष १५
वा उदयगिरीआड चंद्रमा
तेज फांकुनी दावि आगमा
हर्षद जैसा कमलिनी सुमा
मानस तैसें होई माझें सांनिध्यास अधीर १६
घेइन त्वत्सम लकेर कीं जर
सौख्यसुमांचे कमनीय सर
दृष्टिस पडतिल दारोदार
पृथ्वीवरचा गडद काढुनी टाकिन हा अंधार १७

---

३. वनक्रीडा

प्रभातकाळीं मंद गतीनें अफाट माळावरी
चालली बाला कोणीतरी
हिमकणमार्जित पुष्पें खुडुनी स्वकरें प्रमुदित मनें
फेंकिलीं परडीमध्यें तिनें
रानफुलें तीं विविध वेलिंचीं रम्याकृतिचीं किती
गंधमय होउनि गेली क्षिति
पायीं पैंजण निनाद करिती वेडावति वनचर
सन्निध आलेही रविकर
भव्य निटिलतटिं मौक्तिकसरयुत माळ गुंफिली कुणीं
वेगळा तिच्याच आहे धनी
मृदुल तृणाची शाल पसरली होती वसुधेवरी
शरदिंची शोभा अनुपम खरी
परडीमधलीं फुलें उडविलीं पवनानें दुरवरी
लागली वेंचाया साजिरी
सुमदल निकरासम हस्तांगुलितती तोंच खेळती
बोंचती निशित तृणांकुर अती

कनकमेखला घण्टिकारवा अनुसरुनी मृग तसे
चालती मागुनि वेडेपिसे
कंटकयुतघनविपिननिकुंजीं तऱ्हेतऱ्हेचीं फळें
त्यांकडे प्रफुल्ल मानस वळे
झाडींतुनि तंव फडक् फडक् ती उडे विहंगावली
जिथेंच्या तिथेंच ती थबकली
प्राण जिवाचा तिच्या दिलाचा तिथें कुणी पातला
सुपुष्पें वेंचाया लागला
कबरीमध्यें फुलें खोंवुनी तयेंच त्याच क्षणीं
लागलीं चालूं दोघेंजणीं
दुर्धर गहना तरुराजीनें असंख्य ओलांडुनी
पातला तो ग्रामालागुनी
लग्नसोहळा असा जाहला कुणीं न कधिं पाहिला
भेटण्या ये नित्यचि तो तिला
कवि आणि ती कविता त्याची राज्ञी मनमोहिनी
मांडिती अशाच केली वनीं

७३. गांगेय

[श्री० रामचंद्र भाऊराव साने. यांच्या कविता 'यशवंत', 'आनंद' इ० मासिकांतून येत असतात. कांहीं दिवस हे 'यशवंत' कचेरींत होते.]

१. वाटाड्यास

[प्रवाशानें बरोबर घेतलेला वाटाड्या हा वाटमाऱ्या तर नसेलना ! अशी शंका घेतली तर त्यांत नवल असें काय आहे ?]

सांग मला मार्ग अजुनि राहिला किती ?
तिमिरपटल दाटुनिया वाटते भिती ! ॥ ध्रु० ॥

अधिकाधिक उंच उंच जाउं लागतां
लोपे हळुहळुच तशी हृदय-धीरता
" जाऊं तिथें, तेंच " असें बोट दाविशी
परि संपावीच्च शिखरमालिका कशी ?
हेतु यांत काय तुझा तव कशी मती
चढणीची घाट विकट चढुनि जावया
आलों तव संगें मी सोडुनी भया
इष्टस्थल परि न अजुनि दृष्टिला दिसे
विकट हास्य करुनि रजनि जणुं मला हंसे
चहुंकडुनी शब्दशरें हृदय भेदिती
हिंस्रजीव घोर घोर करिति गर्जना
दुर्दैवाची सुचविति कीं घोर योजना
रव गद्गद् रडति जणूं निर्झरावली
वाटाड्या सांग अतां रजनि जाहली
होइलना तव मजला सफल संगती ?
धीर देत तूंहि मला हाय हांसशी
सदया मज पाडुं नको शेवटीं फशी

शंकित हें मन तुजला करित याचना
इष्टस्थलिं पोंचवुनी निववि लोचना
हृदय ऋणी राहिल हें सांगुं मी किती ? ४

---

२. खिन्नवापी

माझ्या वासगृहा समीप अगदीं ही खिन्न वापी असे
योगायोग तरी बघा कितितरी आश्चर्य दावीतसे
आहे जीवन साम्यता उभयतां आम्हांमधें सांचली
दैवानें म्हणुनीच काय अमुची भेटी इथें घातली
आहे फार जुनी परंतु अवघी ही बांधणी सुंदर
कर्त्यांचें जरि नांव ठाव नुरलें वाटे तरी आदर
माझा आदर हाय तो परि इथें मूढापरी भासतो !
लोकांचा व्यवहार रूक्ष, मनिंच्या भावास या हांसतो !
नेलें निर्मळ नीर येथुनि जिनें प्रेमें सदा वाहुनी
आतां ती जनता मुळीं न बघते हिच्याकडे ढुंकुनी
व्हावें मंजुळ पायऱ्यावरि जिच्या ते नूपुरांचे ध्वनि
माध्यान्हीं परि पारवा घुमघुमे हा आज तेथें कुणी
साऱ्या ह्या नगरांगना अनुदिनीं कूपाकडे धावती
वापीच्या मग खिन्नतेस विजनीं राहील कैसी मिती ?
वापी प्रेमबळें असेल नटली कारागिरी लाभुन
त्याची घेइल कां कठोर जग हें हृद्भावना जाणुन !
" पाणी गोड असेल तें परि भुतें खेतें इथें राहतीं "
सुज्ञांची जरि या ससंभ्रमिं पडे लोकापवादें मती;
मूढांना पुसणेंच काय मग तो त्यांचाच वाचा-मद !
त्याची आंच अरे क्षणांत बनवी सौंदर्य लज्जास्पद !
आली निर्जनता अतां विधिबळें झाली कला निष्फळ
राखी लाज विचारिची तरु पहा झाकूनी पर्णें जळ

वापीचा पडसाद तो घुमवुनी जैसा रडे पारवा,
माझी अंतर-वापिकाहि घुमते काढीत ऐशा रवा !

---

३. दीप

क्षणासाठीं नको दीपा ! अतां त्या मालवूं तेजा
अजुनि लेख हा ऐसा पुरा ना जाहला माझा
मनीं आशा धरूनीया तुझें सान्निध्य लाभोनि
लिहाया बैसलों आहें किती साहित्य घेवोनि
परी या घोर एकांतीं तुझी मंदावली कान्ती
म्हणून भीतिनें दीपा ! भरें नैराश्य मच्चित्तीं
सभोतीं दाट अंधारीं तुझ्यावांचूनिया कैसे—
लिहावे लेख मीं ? दीपा ! करूनी यत्न हा नासे
नभीं नक्षत्र-दीपांची प्रभाही वाटते फोल
अशा या स्फूर्तिच्या वेळीं तुझी ज्योतीच बिन्मोल
जरी ऐसी तुझी कान्ती मिळे या मंद ज्योतींची
पुरे ती, त्यांत संतोषें कराया पूर्ति लेखाची
जधीं मज्जीवनाचा हा लिहूनी लेख होईल
अहा ! अज्ञात अंधारीं विरूनी दीप जाईल !

७४. व्यंकटेश नी. पंडित

[यांचा जन्म सन १९१०. शिक्षण इंटरपर्यंत. व्यवसाय नोकरी. यांच्या कविता रत्नाकर, यशवंत, लोकशिक्षण, मधुकर इ० मासिकांत प्रसिद्ध होतात.]

१. केवळ स्वप्न

[स्वनित]

रावोनी दिवसास पोट भरण्या गेहास मित्रासवें
येतों श्रांत; जसा ढळे वरतुनी या भूवरी तारक
तैसा आस हरून दग्धहृदयें ढाळीत मी आसवें
तों येतें नव अल्प धैर्य बघुनी मद्देवता, तारक
जेव्हां हा सरसावतो चहुंकडे अंधार भू भक्षिण्या
कोणी काळ मुठींत विश्व वळितो वाटे तया पाहुनी
या चित्तीं पसरे तसाच सखये काळोख कोन्यांतुनी
पाही चांचपडून सज्ज न कुणी या हातही द्यावया
येते झांपड तोंच मूर्ति पुढतीं ठाके तुझी सोज्ज्वल
सारोनी पडदे करें वसविती सिंहासनीं देवता
स्वप्नसृष्टिमधील दर्शन अहा ! हें काव्य कीं दुर्बल
वर्णाया मम मोद घे उमजुनी त्यांतील स्वर्गीयता
तेव्हां टेवुनि तप्त मस्तक तुझ्या स्कंधावरी निर्मल
घेतों झोंप परंतु हाय ! सखये हें स्वप्नही स्वप्नची.

---

२. श्रावणांतील झड

रात्रंदिन अभिषेक वरोनी कोण तापसी करी ?
किती ह्या धारा धारा तरी ! १
कोण पिता निष्ठुर झोडपी दुहिता ही गव्हरीं ?
किती ह्या काठ्या काठ्या तरी ! २

कृष्ण कुंभ हे अमूप गळती ताडन त्यांच्यावरी,
किती हे तडेच बिजलीपरी ! ३
नाच असा थैमान चालिती श्रमती ना ह्या तरी
शुभ्र कीं नग्न अप्सरापरी ! ४
कोण असा विरहव्याकुळ हा अन् ह्या स्वर्गावरी ?
किती हे अश्रू अश्रू तरी ! ५
पाहून तया झाडेंझुडपें आक्रंदति खालतीं ?
किती हे 'टपटप' टपती तरी. ६
छम् छम् छडि ही पंतोजीची त्याविण विद्या कशी ?
धान्यें येतिल या भूवरी. ७

---

३. वाटाड्यास

बोल दूर दूर किती गांव तो अजूनी

७५. कल्लूरकर

[श्री० नागोराव जीवनराव कल्लूरकर. जन्म सन १९१०. हे हल्लीं दक्षिण हैद्राबाद येथें इंजिनीयरिंग कॉलेजमध्यें 'अप्पर सबार्डिनेट'चा अभ्यास करीत आहेत. कवि श्री० श्रीकृष्ण वामन गाडगीळ यांच्या सहवासानें यांना काव्याची गोडी लागली व ती त्यांचे मित्र श्री० धोकटे यांच्या उत्तेजनानें वाढत गेली. तसेंच त्यांच्या प्रेमळ आईच्या वात्सल्याची पांखर त्यांच्यावर असल्यानें त्यांच्या कवित्वशक्तीची जोपासना होत गेली. ते हैद्राबादच्या 'महाराष्ट्र वाङ्मय-मंडळा'चे कांहीं काळ चिटणीस होते. श्री० गाडगीळ यांचा 'माझीं फुलें' हा कवितासंग्रह यांनींच संपादलेला आहे]

१. फुलें हीं देशिल का फेंकून ?

फुलें हीं देशिल का फेंकून ? ॥ ध्रु० ॥
तुझ्याचसाठीं उंच डोंगरीं
पठार सारे भयानक दरी
फिरुनि वेंचिलीं फुलें सुंदरी
श्रम सर्वहि न गणून १
आप्तवर्ग सर्वांशीं त्यजुनी
काळ वेंचिला तुझ्या अर्चनीं
रात्रंदिन रमलों त्वद्भजनीं
हें सारें विसरून २
अंकिं लोळुनी सुधा प्राशिली
निशिदिनिं कष्टानें भागविली
जननि तुझ्यास्तव दूर त्यागिली
मानिं न सकल हें स्मरून ३
तुझ्याचसाठीं तुझ्यासारखी
सखी जिवाची होय पारखी
प्रेमविरागी त्वन्मन राखी
तप हें विफल करून ४

गृह, धन त्यजिलें, वैभव त्यजिलें
ऐहिक सौख्या दूर लोटिलें
मन्मनराजिव दुःखें सुकलें
कष्टहि सर्व बघून ५
शुद्ध करुनिया अश्रुच्या जलीं
सुकोत सुकलीं त्वत्पदकमलीं
म्हणुनि अर्पितों भरुनि अंजुली
भक्तिस आव्हेरून ६
रंगहीन सौगंधहि रूप न
जगीं टाकिलें ज्या झिडकारुन
अशां सुमां पदिं करितां अर्पण
क्रूरत्वें कुस्करून ७
पदीं वाहतों भावभक्तिनें
मानस माने तें तूं करणें
वत्सा आश्रय माउलीविणें
अन्य न जागें जाणून ८

---

२. अंगाई

वेलींच्या पदराखालीं। फुलें थकुनी निजलीं
नीज कां न तूज आली?। राजसा रे! १
आकाशिंच्या आंगणांत। सूर्य रांगुनी हो श्रांत
संध्या पालवी झांकीत। निजण्या त्या २
चारा चोंचित घेवोनि। पक्षी येती घरट्यांस
मोद न पावे पिल्लांस। प्रेमानें त्या ३
गाती मंजु मंजु गीत। सृष्टि विरे त्या नादांत
मोद गेला गगनांत। देवापाशीं ४
रंगी डोलत्या ढगाचा। चांदवा ये सृष्टीवरी
रम्य देवाची अंबरीं। खैरात ही ५

गाई रानीं उधळोनी। हंबरोनी गांव कोसी
वासरांस भेटण्यासी। उत्सुक त्या ६
माय-बाळाची ती भेट। डोळे नीवती देखुनी
बघण्यास कां अजुनी। बाळा जागा? ७
माझ्या जीविच्या पाडसा। नीज नीज ना वेल्हाळा
दिवे लावण्याची वेळा। टळली रे! ८
मंगल या सांज वेळीं। हळदी-कुंकवाच्या चाली
ऊठ! लक्ष्मी घरां आली। स्वागतासी ९
यशोदेचा गोविंद। प्राण सखा कौसल्येचा
बाळ राजा तैसा माझा। पंचप्राण! १०
म्लेंच्छांचा विध्वंसक। बाळ जिजाऊमाईचा
बाळ राजा तैसा माझा। पराक्रमी! ११
हंबरडे मायभूचे। बाळा येती काय कानीं
नीज येई न नयनीं। ऐकुनी कां? १२
पारतंत्र्याच्या पंकांत। माय आपुली बुडाली
दिसेना रे! कोणी वाली। बाळा आज! १३
रिपू कांपोनीयां सारे। उद्धरणीं निजकाया
खर्ची घालुनी स्वशौर्या। स्थापी जगीं! १४
'माय' करुनियां मुक्त। कीर्ति डंका रे! गाजवी
नांव वंशाचें फांकवी। दिगंतरीं! १५
मोदें बाळा मीही तदा। धन्य स्वतांस मानून
उतरीन निंबलोण। प्राणाचें हा! १६
झांकिले ग मधुनेत्रें। राजसानें हें ऐकत
गाजवील उद्यां कीर्त। प्रभातेसी १७

७६. दयानन्द जिवाजीराव पटवर्धन

[जन्म इ० सन १९१०. यांच्या कविता ज्ञानप्रकाशामधून प्रामुख्यानें व इतर नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असतात.]

१. चित्रपटावलेखन !

जोंपर्यंत जिवंत काव्यमयता संचारते अंतरीं
तोंपर्यंतच हृत्पटावर तिची मूर्ती दिसे साजरी !
जातां तेथुन ती विरून सहजीं त्या अंतराळामधें
मूर्तीचें प्रतिबिंबही न विलसे-काहूर चित्तामधें !
ऐने सुंदरसे जरी बसविले रेखीव चौबाजुंनीं
गेलें जें प्रतिबिंब तें न उमटें एकामधेंही कधीं !
कीं तें पाहुनियां हुबेहुब तसें चित्रामधें रेखणें
आकांक्षा हृदयीं-परंतु सगळें वाऱ्यावरी बोलणें !
—आली भूवर नर्तनास नटुनी नृत्यांगना यामिनी
आकाशीं तिज काय फेर धरण्या मेघावली धावली
वारा तो तर दंग होउन फिरे त्यांच्यामधें या क्षणीं
तों हें नृत्य सुरेल ऐकुन मनीं हांसें कुणी मोहुनी-
—ही हो कोण सुहासिनी विलसली ? ही वीज मेघांतली
घ्या हो ! काढुन चित्र जोंवर न ही अंतर्हिता जाहली !

---

२. ध्येयदृष्टि

हा भ्रमण एकसारखा करी
आराम परी घे याच घरीं ! ॥ ध्रु० ॥
आज भटकतों हा काश्मीरीं
उद्यां फिरतसें हा पामीरीं !
तिजे दिनीं तर सागरतीरीं
दृष्टि ठेवुनी घरावरी। हा भ्रमण०

कुणी पाहती हिंदुस्थानीं
युरोपामधें बघती कोणी
योगीजन ते निर्जन रानीं
पडे दृष्टिला कुठेंतरी। हा भ्रमण० २

कुठेंतरी हा भ्रमण करितसे
रोज कसा परि इथें येतसे?
घरा न अपुल्या कधीं चुकतसे!
गरुड जसा तो नभांतरीं। हा भ्रमण० ३

वर्तुळ परिघावरी फिरतसे
मध्यबिंदु परि नित्य धरितसे!
उगिच जगाला भुरळ पडतसे
ध्येयदृष्टि ती हींच खरी। हा भ्रमण० ४

७७. माधव व्यंकटेश मंगसुळीकर

[जन्म सन १९१०. स्फुट कविता निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध होत आहे. यांचें 'भिकारीण' नामक लघुखंड काव्य प्रसिद्ध आहे. हे मिरज येथें 'शुक्लेंदुमाला' काढीत असतात. नुकतीच सत्याग्रहांत त्यांना शिक्षा झालेली होती.]

१. दांपत्यविनोद

बाला एक दिनीं वनीं विहरतां पुष्पें स्वहस्तांतुनी
आणी, व्यक्त करावयास अपुल्या प्रेमा पतीकारणीं
वेंचोनी सुम एक सुंदर स्वयें देई स्व-नाथाकरीं
बोले जोडुनि हात घ्या सुमन हें नाथा ! सुगंधी करीं
हातीं पुष्प धरोनि नाथ वदला 'हे लाडके सुंदरी'
देई ! गे करिं पुत्र-रत्न दयिते ! या रम्य पुष्पापरी
लाजोनी वदली तदा प्रियसख्या, 'ही काय थट्टा गडे
जातें मी' वदुनी हळूच बघते चोरून नाथाकडे

---

२. हंसरें फूल !

हें सुमन गुलाबी हंसतें, डुलतें पाही !
जगिं सुखदुःखाची जाणिव याला नाहीं ! १
या ध्येय एक कीं गंध परांना देणें
नच स्वार्थासाठीं या जगिं याचें येणें २
पादिं चुरगळिलें तरि खेद न वाटे कसला
मातींत मिळे तरि, जाणिव मुळिं नच याला ३
कुणि रमणि खुडुनि हें केशकलापीं ठेवी
सौंदर्य खुलविण्या कारण तूंची दावी ४

वाटिकेमधिल तूं शोभसि वैभवि राणा
या इतर लता बघ! करिती तव सन्माना ५
हा पवन वाहतो नेई गंध हरोनी
रसिकांसि तोषवी धन्य असशि तूं भुवनीं ६
तूं हांस असाची खंड न पाडी सुमना!
डोलवोत कवि तुज पाहुनि मोदें माना ७

७८. गंगाधर काशीनाथ आगरकर

१. कला आणि अनुभूति !

—कीर्ति त्याची अप्रतिम चित्रकार

आज आलें हो त्याचिया मनांत
प्रीति म्हणजे काय तें रंगवावें
तिचें दर्शन जगतास करुनि द्यावें !
—म्हणुनि चौकट लांकडी एक केली
तंग करितां पट, कार्ययोग्य झाली
आणि कादुनि साहित्य सर्व त्यानें
कुंचली किति उचलली कुशलतेनें !
—किती चित्रें सरकलीं अंतराळीं
स्वप्नसृष्टीची कळाकुसर तीही
दिव्यतेचे भास ते किती झाले
परी प्रीती कोठेंहि त्या न भेटे !
—तयायोगें खोंचला मनीं फार
निराशेनें व्यापिला हुरुप सर्व
कुशलता ती खरि भावसंगमांत
दिव्य अनुभूती ती न परी त्यास !
—खिन्नतेनें मग नभाकडे पाही
तेथ दिसलें-उमटलें स्पष्ट कांहीं
हृदय अपुलें शोधीत आंत जाई
कुंचली ती भूमीस सहज येई !

---

२. सर्व हें उगाच !

कुणीं यावें देऊनि शिव्या जावें
कुणीं यावें टोंचूनि मला घ्यावें

कुणीं यावें मारूनि लाथ जावें
—परी पोटाशीं कां ग तूं धरावें ?

* * *

प्रश्न ऐसा करतांच तुला आई
नेत्र पाण्यानें भरुनि कां ग येती
कंठ दाटूनी येइ कां अतांच
काय म्हणशी तूं "सर्व हें उगाच !"

---

३. प्रीतिकराचें गाणें

—'गभीर ग तुझे नेत्र
रंग आकाशाचा निळा
आज झाकळूनि गेला ! १
'देहिं चैतन्याची मूस
नभीं प्रकाश-जीवन
गेलें आज ओसरून ! २
'अमृताची तुझी वाणी
करी अर्थपूर्ण जिणें
—रुद्ध विहगाचें गाणें ! ३
'ओठ तुझे गुलाबाचे
कॅवि संधिप्रकाशांत
—निराशेची कळा घेत ! ४
'नको नको त्याची खन्त
'प्रकाश तो नव्हे खरा
सत्यतेचा भास सारा ५

—मायेचें तें कारागार
आज बंध खुले झाले
भाग्य आपुलें आगळें ! ६
—'येथूनिया चालायाचें
खरें सौंदर्यजीवन
—विसरूनि तूं-मीपण ! ७
—'प्रीति माझी तुझ्यावर
नंदादीप गाभाऱ्यांत
—असो तुझे हृदयांत ! ८
—'तुजसाठीं जग नवें
—शोक तुज मोगऱ्याचा
आणि माझे हृदयाचा ! ९
—कॅवि मग त्याची खन्त
रजनीच्या भरतींत
मोगरा ग फुलीं येत !' १०

७९. रामचंद्र के. मानवी

[जन्म इ० सन १९११. हे हल्लीं कोल्हापुरांत बी. ए.च्या वर्गांत शिकत आहेत.]

१. काव्योद्गम

कवी हा बसे होउनी चूर शोकीं;
कुठूनी तयाला स्मृती या जगाची?
दिसे दुःख सर्वत्र त्याला त्रिलोकीं;
कुठें नाढळे पुष्करीणी सुखाची.
पहा, नेत्र उत्फुल्ल त्याचे परंतू;
तयाच्या मुखीं दिव्य कान्ती विराजे;
–क्षणीं रंगला गायनीं, भान नाहीं
–नभीं ऐकण्या येति ते देवराजे.
अहा! काय तें गान! माधुर्य त्याचें
मला पामरा वर्णितां ये कसें तें?
इथें स्तब्ध, तैसें तिथें अंबरींही,
–जगत् सर्वही चित्रवत् भासतें तें
मुदें तोषुनी काव्यमाधुर्ययोगें
पहा, अर्पिती देव कंठीं तयाच्या
नभांतूनि पुष्पांचिया दिव्य माला
–न ज्या साध्य कोणां प्रभावें तपाच्या.
वरी पाहुनी हर्षिता देवराजा,
जरा नम्र झाला कवी; मान खालीं
पुन्हा घालुनी जाहला चूर शोकीं–
मनीं कल्पनाही सुखाची निमाली.

२. तोडुं कसें मी ?

तोडुं कसें मी । वद, गुलाब-सुम हें नामी ? ॥ ध्रु० ॥
झाड पसरलें मोहक कैसें,
फूल तयावरि एकच हांसे;
मोद देइं जें सकलां खासें
तोडुं कसें मी । वद, गुलाब-सुम हें नामी ?
नील-नभीं विधु तारांमाजीं
खेळे जैसा उपवन-कुंजीं
हिरव्या पानीं खुलतें सहजीं
तोडुं कसें मी । वद गुलाब सुम हें नामी ? २
वैजयंतिचा कौस्तुभ तुटला
गगनांतुनि हा चंद्र हरपला
कुठें राहिली शोभा त्याला
तोडुं कसें मी । मग गुलाब-सुम हें नामी ? ३
नवसासायासें सुत झाला
वाल्यीं जरि मृत्युनें चिरडला
पार कुठें मग जनदुःखाला ?
तोडुं कसें मी । मग गुलाब-सुम हें नामी ? ४
वहावयाचें देवा तोडुनि ?
आवडेल कां त्याला हें मनिं ?
जन्मतांच सुखलाभ न देउनि
तोडुं कसें मी । वद गुलाब-सुम हें नामी ? ५
फुलो मुदें हें या झाडावरि
अल्प सुखाचे क्षण सेवो तरि
संपतांच निजकार्य जगावरि
अर्पिल स्वामी-। चरणिं देह-सुम हें नामी ? ६

८०. ज्ञानेश्वर तुकाराम देशपांडे

[हे हल्लीं फर्ग्युसन-कॉलेजमध्यें सी. वी. ए.च्या वर्गांत आहेत. त्यांच्या कविता कॉलेजचें त्रैमासिक, ज्ञानप्रकाश वगैरे ठिकाणीं प्रसिद्ध झाल्या आहेत.]

१. रम्यता आणि प्रेम

आला घेउनि चंद्रिकेस गगनीं शीतांशु, जातां रवी
तेजें पूर्ण विकासुनी धवलता चोंहीकडे फांकली !
आनंदें कुमुदें फुलून सरसीं स्वच्छन्दशीं डोलती
क्रीडार्थ भ्रमती प्रसन्न सलिलीं ही राजहंसावली
चित्ताकर्षक आणि रम्य नयना पाहून दृश्याप्रती
गेलों मी विसरून भान सगळें गुंगून गेली मती
झालों निश्चल आणि शांत बसलों गेला जणूं सोडुन
आत्मा, देह मदीय मानसजलीं हंसासवें खेळण्या !
गेली वेळ किती निघून न कळे त्या मानसा पाहतां
'देवा ! धन्य तुझी असा रमविसी निर्मून ही रम्यता' !
प्रेमानें मधुपां अचानक जशी झांकून टाकी कळी
कोणीं येउनि नेत्र कोमल करें ते टाकिले झांकुनी !
ऐशा रम्य वनीं प्रशान्त समयीं मोहून गेलें मन
आले शब्द परन्तु 'सोड सखये ! कां झांकिसी लोचन ?'

---

२. ओघ आणि मित्रप्रेम

[श्लोक]

निष्पन्न हो ओघ गिर्यन्तरांत
निसर्ग दे जन्म तयांस तेथ
हो मित्र-प्रेमोद्भव हृद्गिरींत
तयाविना संभव कोठिं होत ?

उत्पत्ति होतां निमिषीं तयाची
दृष्या जलें सर्व भरून जाती
हृद्गव्हरें प्रेमजलांत तेवीं
निमग्न होती सुहृदद्वयांचीं
कांटे विषारी बुडती जलांत
मार्गीं तयाच्या जरि कांहिं येत
जें दुःख लोकांत तयावरी ये
हो सौख्य तें प्रेमजलांत लोपे
महत् शिला दूर करूनि ओघ
वाहे जवें तो जणुं कीं अमोघ
विपत् शिला येत जरी समोर
क्षणार्धमात्रें करि प्रेम दूर !
ग्रीष्मातपानें कृश ओघ होई
प्रेमी जनांचा चिरकाल राही
विश्वेश ! माझी विनती तुला ही
मन्मित्र प्रेमास अखंड ठेवी

---

३. एक भयानक दृश्य !

[कृष्णपक्षांतील रात्र ! 'लाईड ब्रिज'वरून पश्चिमेस ॐकारेश्वराकडे नजर टाकिली असतां तेथील भीषणता पाहून क्षणभर तरी मन चलबिचल झाल्यावांचून राहणार नाहीं.]

[चाल—फुलें वेलींचीं०]

घोर अन्धार। ती रात्र भयानक फार ॥ ध्रु० ॥
तमसाम्राज्यें विश्व व्यापिलें
उदक नदीचें श्यामल झालें
भीतीनें जणुं काळें पडलें
भीषण नीर। ती रात्र भयानक फार

दृग्गोचर हो प्रेताग्नि दुरी
रक्तगोल जणुं भासे तिमिरीं
लोचन उघडी कीं मदनारी
दृश्य भेसूर। ती रात्र भयानक फार
क्षणभर घाटे काळ उतरला
संहाराया वसुंधरेला
'जाइल जग हें कवण गतीला?'
काय होणार?। ती रात्र भयानक फार
ऋषीसमाधी तीरावरती
तेथुनि वच हे श्रवणीं पडती
हीच गती या नश्वर जगतीं
नाद गंभीर। उसळला भयानक फार

८१. राजस

[श्री० गणपत सखाराम भोंसले, जन्मः १९११. हे निपाणी येथें इंग्रजी शाळेंत इयत्ता ६ मध्यें हल्लीं शिकत आहेत. यांचें लहान वय व अल्प शिक्षण लक्ष्यांत घेतां यांची कविता हृदयंगम आहे, हें कोणालाही कबूल करावें लागेल.]

१. स्वामिभक्त हिरोजी

[शिद्दीच्या वेढ्यांतून, त्याला फसवून निसटण्याकरितां, श्रीशिवाजीमहाराजांनीं हिरोजीस स्वतःचा पोषाख करून तहाचें बोलणें लावण्यास, त्याच्या महालांत शिवाजी बनून जाण्यास सांगितलें त्या वेळीं त्या स्वामिनिष्ठ सरदारानें महाराजांस दिलेलें उत्तर.]

"कसा जाउं मी? धनी! शिद्दिच्या महालांत आतां
पूज्य या वसना लेवूनी
डळमळती आसनें रिपूंचीं जें नुसतें हलतां
वायुचा झोतच लागूनी १
कशी भवानी धरूं? रंगवी जी भूमातेला
संगरीं रिपु-रुधिरानेंच!
जिच्या बलावर भगवा झेंडा झुलत राहियेला
घालतो स्वैर नभीं नाच! २
जया घातलें पायिं, गाडण्या जबर ठोकरीनें
रसातलिं दास्य-डांकिनीला!
तुडवुं कसे ते चढाव? जें मम शिरस्त्राण लेणें!
लावुं मी पाय कसा त्याला? ३
प्रभा फांकुनी उज्ज्वल ज्याची दिपवित जी गेली
क्षणांतचि दहा दिशांनाही
दिल्लिपतीच्या नयनीं ही जी खिळूनियां ठेली
सुटे थरकांप तयालाही ४

तोच जिरेटोप हा" दाटला कंठही दुःखातें
धजेना जिव्हा वदण्याला
"कसें...लेवुं मी ? मोलाचें हें महा...राज लेणें
आपुलें-सांगा-ना-मजला ? ५

---

२. कांटा

[प्रियकरास भेटावयास आतुर होऊन लगबगीनें आपल्या मैत्रिणीसह निघालेल्या अभिसारिकेच्या पायांत वाटेंत कांटा रुतल्यावर—]

कुठला बाई । कांटा हा रुतला पायीं
कुठुनी आला निष्ठुर मेला !
धरुनी दावा होता बसला
अवचित कीं ग पायिं बोंचला
साधुन आधीं ! या वेळीं अपुली सन्धी १
रक्तहि बघ ग गडे घळघळा
आलें किति हें लौकर, याला
टिपतां टिपतां पुरा रंगला
शुभ्र रुमाल । पुरता ग झाला लाल २
कोमल पायीं या रुततांना
तिळभरही रे खंति तव मना
वाटलीच नाहीं का अधमा ?
दुखवुनी पाय । तुज यांत मिळालें काय ? ३
आतुरतेनें प्राणसख्याला
त्वरें निघालें भेटायाला
हेतू कां नच तुज पाहवला ?
साधिसी संधी । किति दुष्ट घातकी बुद्धी ! ४
असा काय अपराध तुझा रे ?
केला कधिं मीं मेल्या, वद रे !

बोल अभद्रा, कां धरिसी रे
मुग्ध वृत्ती ही ?। दांतखिळी बसुनी जाई ? ५
न बोलण्याचें करुनी ढोंग
दीनाचें कां आणिशि सोंग
मोठ्ठा इकडं दगड आण ग
सुशिलाताई। ठेंचतेच याची डोई ! ६

---

३. बाळा वसंता—

[जाति–मुद्रिका]

सोडून एकटिस मला, गड्या राजसा !
गेलास कुठं वेल्हाळा ? हा जीव जाहला पिसा ! १
घालून न्हाउं मी अतां, निजवुं रे कुणा ?
बसुनिया कुणा शेजारीं, मी घांस भरवुं रे कुणा ? २
ती मृदुल सुखावह शेज गमत कांतिला
छबुकड्या तुझ्यावांचोनी शर-पंजर-शय्या मला ! ३
नाचतां मुलें अंगणीं बघत चन्द्रमा
मी वाजवीत घुंगुरवाळा रिझविल कोण रे मना ? ४
तूं रुसून बसतां कधीं फुगुन बाजुला
उचलून चुंबुं मी कोणा झिडकारित असतां मला ? ५
देतांच थोडका खाउ तदा नंतर
गालाचि खळी खुललेली मी बघूं कुणाची वरं ? ६
ओसाड सृष्टि ही गमे सर्व, चक्षुंला
हृदयाच्या आकाशींचा मम बालरवी लोपला ७
मी सर्व सुखांची माळ गळां घातली
कौस्तूभ हरपतां बाई निस्तेज किं ग जाहली ८
ही पदराखालीं सदा ज्योत चिमुकली
मी जिवापाड जपतांना कुणि फुंकर तिज मारिली ९

हा गुलाब कोमल, करिंच सदा झेलला
मेल्यानं साधुन द्‌वा कुणि कुसकरलें मम फुला १०
मम पंचप्राणांचिया कोंदणांतली
हिरकणी ! चिमुकली, क्रूरा ! रे काळा त्वां चोरिली ! ११
आटतां चिमुकला झरा शून्य उपवन !.
दुडदुडा बाळ ना धावे, गृह भयाण भासे वन ! १२
सौख्याच्या शिखरावरी जरा बैसलें
दुःखांत लोटसी दैवा ! तुज पाहवलें नच कसें ? १३
मम फुलती मानसकळी इन्दु लोपतां
बघ अर्धोन्मीलित झाली फुलणार कशी ग अतां ? १४
मम दुर्दैवाचा रवी उदय पावुन
चंद्रिका प्रभातींची मी जाहलें कांतिच्याविण १५

REFBK-0004240

REFBK-0004240

४२४० ६२

आनंदी

[श्री० अनंत कृष्ण ओगले, कोल्हापूर.]

१. अंगाई.

नीज न ये गाइन मी गीत आजि तुला
उचित समय विश्रांतिस हाचि शिशु तुला ॥ ध्रु० ॥
तात तुझे शूरवीर
माता तव बहु सुंदर
रूप तिचें गुण त्यांचे दिसति तव मला १
हे किल्ले माळरान
धर्मप्रजा नीतिमान
रक्षाया ठेवियला तुजसि एकला २
वाजति ह्या रणदुंदुभि
कर्णकटू मुळिंच न भी
वदती जन सन्निध हा शत्रु पातला ३
तलवारी मोडुनियां
जातिल शर भंगुनियां
ये रिपु जर चालुनियां एक पाउला ४
येइल मग एक वेळ
रणभेरी तुज उठविल
झोंपायाही न मिळे बाळ मग तुला ५
तों वरि तूं नीज गडे
थांबवुनी तव चाळे
अंगाई गाण्याची हौस बहु मला ६

समाप्त

म. ग्रं. सं. ठाणें
विषय व्याख्या
सं. नं २५

श्री

महाराष्ट्र शारदा

सन १९३०

REFBK-0004240

—प्र. के. अत्रे